सोलापूर तरुण भारत

Solapur Tarun Bharat

न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | शनिवार, दि. ०१ ऑगस्ट २०२६ | वर्ष - ४ थे | अंक १०८ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com


# नांदूर मध्यमेश्वर बंधाऱ्यातून विसर्गात वाढ, गोदावरी नदीकाठच्या नागरिकांना सतर्कतेचा इशारा

**नाशिक :** जिल्ह्यात सुरू असलेल्या पावसाच्या पार्श्वभूमीवर नांदूर मध्यमेश्वर बंधाऱ्यातून सोडण्यात येणाऱ्या पाण्याच्या विसर्गात वाढ करण्यात आली आहे. जलसंपदा विभागाच्या नाशिक पाटबंधारे विभागाने शुक्रवारी (३१ जुलै) सायंकाळी ६ वाजता याबाबत सतर्कतेचा इशारा जारी केला आहे.

नांदूर मध्यमेश्वर बंधाऱ्यातून विसर्गात वाढ

नाशिक पाटबंधारे विभागाने दिलेल्या माहितीनुसार, नांदूर मध्यमेश्वर बंधाऱ्यातून यापूर्वी 39,917 क्युसेक पाण्याचा विसर्ग सुरू होता. मात्र, सायंकाळी ६ वाजता त्यामध्ये 9,465 क्युसेकने वाढ करून एकूण 49,382 क्युसेक पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला आहे.



पावसाचे प्रमाण कायम राहिल्यास विसर्गात आणखी वाढ होण्याची शक्यता असल्याने गोदावरी नदीपात्रालगतच्या परिसरातील नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. नदीपात्रात असलेले साहित्य, शेतीसाहित्य किंवा जनावरे तात्काळ सुरक्षित स्थळी हलवावीत तसेच नदीपात्रात जाणे टाळावे, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. जलसंपदा विभागाने स्थानिक प्रशासनास आवश्यक ती खबरदारी घेण्याच्या सूचना दिल्या असून नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

गिरणा, मोसम, आरम नदीकाठच्या नागरिकांना सतर्कतेचा इशारा

दरम्यान, नाशिक जिल्ह्यात सुरू असलेल्या सततच्या पावसामुळे गिरणा, मोसम आणि आरम नदीपात्रातील पाण्याची पातळी वाढली आहे. त्यामुळे चणकापूर, पुनद, हरणबारी आणि केळझर धरणांच्या पाणलोट क्षेत्रात पाण्याची आवक वाढल्याने संबंधित धरणांमधून पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर मालेगाव पाटबंधारे विभागाने नदीकाठच्या नागरिकांना सतर्कतेचा इशारा दिला आहे.

**मालेगाव पाटबंधारे विभागाने दिलेल्या माहितीनुसार,**

गिरणा नदी पात्रात - 1. चनकापूर धरण विसर्ग - ८,८६४ क्युसेक.
2. पुनंद धरण विसर्ग - १५,०० क्युसेक.
3. ठेंगोडा बंधारा विसर्ग – १५,२०० क्युसेक
मोसम नदी पात्रात -4. हरणबारी धरण विसर्ग - ११,००० क्युसेक.
आरम नदी पात्रात - 5. केळझर धरण विसर्ग - ३,५०० क्युसेक पाण्याचा विसर्ग सुरू आहे.

# 40 लाख बांग्लादेशींनी खोट्या कागदपत्रांआधारे भरले 'एसआयआर' फॉर्म; किरीट सोमय्यांचा दावा

**मुंबई :** विशेष संक्षिप्त पुनरीक्षण (एसआयआर) प्रक्रियेअंतर्गत महाराष्ट्रात आतापर्यंत ४० लाखांहून अधिक बांगलादेशी नागरिकांनी खोट्या कागदपत्रांच्या आधारे गणना पत्र (इन्यूमरेशन फॉर्म) भरल्याचा खळबळजनक दावा भाजपचे माजी खासदार किरीट सोमय्या यांनी केला आहे. मशिदींमधून मोठ्या प्रमाणावर हे बोगस फॉर्म भरून घेतले जात असून, महाराष्ट्राच्या मतदार यादीत एकाही बांगलादेशी नागरिकाचे नाव राहू देणार नाही, असा निर्धार त्यांनी व्यक्त केला आहे.



वर्धा जिल्ह्याच्या दौऱ्यावर असताना माध्यमांशी बोलताना किरीट सोमय्या यांनी ही माहिती दिली. ते म्हणाले की, मशिदींच्या माध्यमातून बोगस अर्ज भरण्याची मोहीम राबवली जात आहे. वर्धा जिल्ह्यातील हिंगणघाट येथे स्थानिक रहिवासी नसलेल्या व मूळच्या बांगलादेशी असलेल्या सुमारे आठ हजार व्यक्तींनी गणना पत्रे भरली आहेत. या सर्व संशयास्पद आणि बोगस अर्जांवर भाजपच्या वतीने आक्षेप नोंदवण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

'एसआयआर' अंतर्गत अर्ज भरण्यासाठी निवडणूक आयोगाने ८ ऑगस्टपर्यंत मुदतवाढ दिली आहे. या प्रक्रियेचे काम आता अंतिम टप्प्यात

# कर्जमुक्ती योजनेतून 94 हजार शेतकरी अपात्र

**मुंबई :** राज्य सरकारच्या 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६' अंतर्गत सहकार विभागाने केलेल्या डेटा पडताळणीत ९४ हजार ८३ शेतकरी आयकरदाते असल्याचे उघड झाले आहे. या आयकरदात्या शेतकऱ्यांना कर्जमुक्ती योजनेतून अपात्र ठरवण्यात आले असून, या निर्णयामुळे राज्य सरकारच्या तिजोरीतील १ हजार ८८१ कोटी ६६ लाख रुपयांची बचत झाली आहे. सहकार विभागाने या योजनेअंतर्गत आतापर्यंत ३१ लाख ६४ हजार २८ शेतकऱ्यांच्या माहितीची सखोल पडताळणी केली. योजना जाहीर करतानाच आयकर भरणाऱ्या शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ दिला जाणार नाही, तसेच केंद्र सरकारकडून अशा करदात्यांची माहिती मागवली जाईल, असे शासनाने स्पष्ट केले होते. त्या निकषांच्या आधारे ही अपात्रतेची कारवाई करण्यात आली आहे. दरम्यान, पात्र शेतकऱ्यांच्या कर्ज खात्यात लाभाची रक्कम हस्तांतरित करण्यासाठी शासनाने ७ हजार कोटी रुपयांच्या निधी वितरणास प्रशासकीय मान्यता दिली आहे.

## थोडक्यात

### नद्यांमधील गाळातून निघणारी वाळू आणि माती मोफत वाटणार

**मुंबई :** राज्यातील नद्यांची वहन क्षमता पुनःस्थापित करण्यासाठी आणि पूरनियंत्रणासाठी नदीपात्रातून काढण्यात येणारा गाळ, माती आणि गौण खनिजांच्या विल्हेवाटीबाबत महसूल व वन विभागाने शुक्रवारी नवी मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत. या नव्या नियमावलीनुसार नद्यांच्या खोलीकरणातून निघणारा गाळ व माती शेतकऱ्यांना, तर गाळमिश्रित वाळू घरकूल योजनेच्या पात्र लाभार्थ्यांना ५ ब्रासपर्यंत मोफत उपलब्ध करून दिली जाणार आहे. नदीपात्रातून काढण्यात येणाऱ्या गाळामध्ये माती, वाळू, दगड आणि गोटे यांसारख्या विविध घटकांचा समावेश असतो. या गौण खनिजांचे पृथक्करण करून त्यांची योग्य प्रकारे विल्हेवाट लावली जाणार आहे. यानुसार नद्यांच्या खोलीकरणातून निघणारा गाळ आणि सुपीक माती प्राधान्याने संबंधित तालुक्यातील व नजीकच्या भागातील शेतकऱ्यांना शेतजमिनीच्या सुपीकतेसाठी विनामूल्य दिली जाईल.

### राज्यातील रखडलेल्या 'झेडपी' आणि पंचायत समिती निवडणुका डिसेंबरमध्ये?

**मुंबई :** महाराष्ट्रातील रखडलेल्या २० जिल्हा परिषदा आणि २११ पंचायत समित्यांच्या निवडणुका डिसेंबर २०२६ मध्ये होण्याची शक्यता आहे. या निवडणुका ५० टक्के आरक्षणाची संवैधानिक मर्यादा पाळून घेण्यास राज्य सरकार तयार असल्याचे प्रतिज्ञापत्र सर्वोच्च न्यायालयात सादर करण्यात आले आहे. त्यामुळे राज्यातील उर्वरित स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा मार्ग मोकळा होण्याची चिन्हे दिसत आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांमधील आरक्षणाच्या मुद्द्यावरून सर्वोच्च न्यायालयात सरन्यायाधीश सूर्यकांत, न्यायमूर्ती जयमाल्या बागची आणि न्यायमूर्ती विपुल पांचोली यांच्या खंडपीठासमोर सुनावणी पार पडली. कोणत्याही परिस्थितीत एकूण आरक्षणाची टक्केवारी ५० टक्क्यांपेक्षा जास्त असू शकत नाही, असे खंडपीठाने पुन्हा एकदा स्पष्ट केले. यापूर्वी १२ जिल्हा परिषदांच्या निवडणुका पार पडल्या होत्या, तर आरक्षणाच्या पेचामुळे २० जिल्हा परिषदांच्या निवडणुका प्रलंबित राहिल्या होत्या.

### 'पिंक ई-रिक्षा' योजनेच्या अनुदानात दुपटीने वाढ

**मुंबई :** राज्यातील महिलांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देत त्यांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनवण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या 'पिंक ई-रिक्षा' योजनेच्या अनुदानात राज्य शासनाने दुपटीने वाढ केली आहे. या योजनेअंतर्गत ई-रिक्षा खरेदीसाठी मिळणारे शासकीय अनुदान २० टक्क्यांवरून ४० टक्क्यांपर्यंत वाढवण्याचा निर्णय महिला व बाल विकास विभागाने घेतला असून, यामुळे महिलांवरील कर्जाचा बोजा लक्षणीयरीत्या कमी होणार आहे. यासंदर्भातील सुधारित शासन निर्णय शुक्रवारी जारी करण्यात आला.

शासनाच्या या सुधारित निर्णयाचा मोठा फायदा योजनेच्या पहिल्या टप्प्यातील लाभार्थ्यांनाही होणार आहे. योजनेच्या सुरुवातीला ज्या महिलांनी २० टक्के अनुदानावर ई-रिक्षा खरेदी केली होती, त्यांनाही उर्वरित २० टक्के अतिरिक्त अनुदानाचा लाभ दिला जाणार आहे. हे अतिरिक्त अनुदान महिलांनी रिक्षा खरेदीसाठी घेतलेल्या कर्जाच्या परतफेडीसाठी त्यांच्या बँक खात्यात जमा केले जाईल. सुधारित नियमांनुसार ई-रिक्षाच्या एकूण किमतीच्या ४० टक्के रक्कम राज्य सरकार अनुदान म्हणून देणार आहे.

### मंत्रालयातील कँटीनच्या फ्रीजपेक्षा चपलांचा स्टँड स्वच्छ!

**मुंबई :** मंत्रालयातील उपाहारगृहातील फ्रीजपेक्षा चपलांचा स्टँड अधिक स्वच्छ असतो, अशा शब्दांत मुंबई उच्च न्यायालयाने शुक्रवारी अन्न व औषध प्रशासनाची (एफडीए) कानउघाडणी केली. एफडीए हे सरकारी कँटीन आणि खासगी आस्थापनांना वेगळा न्याय लावून दुजाभाव करू शकत नाही, असे स्पष्ट करत न्यायालयाने निष्पक्ष कारवाई करण्याचे आणि परवाना रद्द करण्याऐवजी सुधारणा नोटीस (इम्प्रूव्हमेंट नोटीस) बजावण्याचे निर्देश दिले.










सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

# रोटरीच्या कार्याचा समाजात शाश्वत परिणाम व्हावा - क्षितिज झावरे

## रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटीचा पदग्रहण सोहळा

**अंबाजोगाई :** रोटरीचा खरा उद्देश हा केवळ सेवा करणे नसून, समाजात दीर्घकालीन शाश्वत सकारात्मक बदल घडवणे हा आहे. असे प्रतिपादन रोटरीचे भावी प्रांतपाल क्षितिज झावरे यांनी केले.रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटीच्या पदग्रहण सोहळ्याचे प्रमुख अतिथी म्हणून क्षितिज झावरे बोलत होते. यावेळी व्यासपीठावर उपप्रांतपाल मेघराज पिंगळे,अंबाजोगाई सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष रमेशराव आडसकर,रोटरीचे नवनिर्वाचित अध्यक्ष शकील शेख, सचिव राधेश्याम लोहिया,मावळते अध्यक्ष प्रा. रोहिणी पाठक, सचिव मंजुषा जोशी यांची उपस्थिती होती.

यावेळी बोलताना क्षितिज झावरे म्हणाले की रोटरीचा खरा उद्देश हा केवळ सेवा करणे नसून, समाजात दीर्घकालीन सकारात्मक बदल घडवणे हा आहे, असे ते म्हणाले. सेवाभाव सर्वोपरी या तत्वाने प्रेरित होऊन प्रत्येक क्लबने आपल्या परिसरातील समस्या ओळखून त्यावर ठोस उपाययोजना कराव्यात. यासाठी शिक्षण, आरोग्य, महिला सक्षमीकरण



आणि पर्यावरण संवर्धन या चार क्षेत्रांवर विशेष लक्ष केंद्रित करावे, असे आवाहन त्यांनी केले. युवा पिढीला रोटरीच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी रोटॅरॅक्ट आणि इंटरॅक्ट क्लब अधिक सक्रिय करण्याची गरजही त्यांनी व्यक्त केली. यावेळी रमेशराव आडसकर,मेघराज पिंगळे यांची भाषणे झाली.

मावळत्या अध्यक्ष प्रा. रोहिणी पाठक यांनी नूतन अध्यक्ष शकील शेख यांच्याकडे तर सचिव मंजुषा जोशी यांनी नूतन सचिव राधेश्याम लोहिया यांच्या कडे पदभार सोपवला. रोहिणी पाठक यांनी गेल्या वर्षी केलेल्या कामाचा अहवाल सादर केला. तर शकील शेख यांनी या वर्षी राबविण्यात येणाऱ्या प्रकल्पांची माहिती दिली. नूतन सदस्य व पदाधिकारी यांचे रोटरी पिन देऊन स्वागत करण्यात आले. रोटरीच्या सहयोग या वार्षिक अंकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते झाले.

वृक्ष पूजन व पॉल हरीस यांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून व राष्ट्रगीताने कार्यक्रमास प्रारंभ झाला. कार्यक्रमाचे संचलन डॉ. प्रिया तिडके, प्रा.वसुधा गडसिंग यांनी केले. तर उपस्थितांचे आभार संतोष मोहिते यांनी मानले. या कार्यक्रमास मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# नगर–बीड–परळी रेल्वे प्रकल्पाला गती द्या : उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार

**बीड, दि. 30 (जिमाका):-** नगर–बीड–परळी रेल्वे प्रकल्प हे बीड जिल्ह्यासह संपूर्ण मराठवाड्याच्या विकासाचे स्वप्न असून, या प्रकल्पामुळे या भागाच्या आर्थिक, औद्योगिक आणि सामाजिक विकासाला मोठी चालना मिळणार आहे. येत्या मराठवाडा मुक्ती दिनापर्यंत (१७ सप्टेंबर २०२६) प्रकल्पाचा पुढील टप्पा पूर्ण करण्यासाठी रेल्वे प्रशासन आणि स्थानिक प्रशासनाने समन्वयाने काम करावे. राज्य शासनाकडून आवश्यक तो निधी उपलब्ध करून दिला जाईल. तसेच स्थानिक अडथळे दूर करण्यासाठी लोकप्रतिनिधींची मदत घेऊन कामांना गती द्यावी, अशा सूचना उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी दिल्या.

बीड जिल्हाधिकारी कार्यालयात आज आयोजित नगर–बीड–परळी रेल्वे प्रकल्पाच्या आढावा बैठकीत त्या बोलत होत्या. यावेळी, खासदार बजरंग सोनवणे, आमदार धनंजय मुंडे, आमदार प्रकाश सोळंके, आमदार संदीप क्षिरसागर, आमदार विजयसिंह पंडीत, आमदार विक्रम काळे, पालक सचिव डॉ. राजेश देशमुख, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहेमान, पोलीस अधिक्षक नवनीत काँवत उपस्थित होते. उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार म्हणाल्या की, दिवंगत अजितदादा पवार यांनी मराठवाड्याच्या विकासासाठी विशेष प्रयत्न करून नगर–बीड रेल्वे प्रकल्पाला गती दिली. हा प्रकल्प पूर्ण करणे हे त्यांच्या विकासदृष्टीचे स्वप्न असून, ते प्रत्यक्षात आणण्यासाठी शासन कटिबद्ध आहे.

# प.पु.डॉ.रामचंद्र महाराज पारनेरकर महाराज यांच्या जन्मोत्सवानिमित्त रक्तदान शिबिरास प्रतिसाद



**शिरूर कासार :** गुरूंच्या पवित्र जन्मोत्सवानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिराला नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने रक्तदान केले. "रक्तदान हेच श्रेष्ठ दान" हा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने आयोजित या उपक्रमात युवक, महिला तसेच विविध क्षेत्रातील नागरिकांनी सहभाग नोंदविला.

शिबिराचे उद्घाटन डॉक्टर रमणलालजी बडजाते, श्रीमान अनिल सेठ डुंगरवाल, श्रीमान घोरपडे काका, डॉक्टर भगवानराव सानप,श्रीमान गोकुळजी पवार हस्ते करण्यात आले. रक्तपेढीच्या तज्ज्ञ वैद्यकीय पथकाने रक्तदात्यांची वैद्यकीय तपासणी करून सुरक्षित पद्धतीने रक्तसंकलन केले.

यावेळी आयोजकांनी सांगितले की, गरजू रुग्णांना वेळेवर रक्त उपलब्ध व्हावे आणि समाजात रक्तदानाबाबत जनजागृती व्हावी, या उद्देशाने या शिबिराचे आयोजन करण्यात आले. उपस्थितांनी अशा सामाजिक उपक्रमांचे कौतुक करत भविष्यातही अशा सेवाकार्यात सहभागी होण्याचा संकल्प व्यक्त केला.शेवटी शाखाधिकारी श्रिमान विवेक पारगावकर यांनी आभारप्रदर्शन केले.सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व कर्मचारी व पिग्मी एजंट यांनी प्रयत्न केले

या रक्तदान शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व रक्तदाते, स्वयंसेवक, वैद्यकीय पथक, मान्यवर आणि सहकार्य करणाऱ्या सर्वांचे आयोजकांनी मनःपूर्वक आभार मानले.

# रामतीर्थ मठात गुरुपौर्णिमा उत्सव साजरी



**बीड प्रतिनिधी, :** रामतीर्थ मठात गुरुपौर्णिमा उत्सव साजरी करण्यात आला,परमपूज्य महायोगी दादा महाराज खडकीकर, यांच्या समाधीस व पादुकेस यजमान श्री प्रकाश शेठ तोतला यांच्या हस्ते रुद्र अभिषेक करण्यात आला, यावेळी दादा महाराजांची शिष्य, श्री आसारामशेठ चांडक, संस्कार जोशी, विजय भाऊ बजाज, बसवेश्वर आप्पा डोंगरे, सौं राधाबाई जाजु, यांच्या हस्ते व

पादुका रुद्राभिषेक अभिषेक आरती करण्यात आला, नंतर महाप्रसाद करण्यात आला, यावेळी मठाधिपती

विद्या गुरु महाराज यांनी आलेल्या शिष्यमंडळ गुरु मंत्र देण्यात आला व भिक्षा मागून , दास प्रभू महाराज वदादा महाराज यांच्या सर्व शिष्य परिवारांना सत्कार्य करण्याचा मार्ग दाखवून दादा महाराजांचे आशीर्वाद सर्व साधक भक्तांना लाभो आशीर्वादा अशी गुरुपौर्णिमा निमित्त दादा महाराज चरणी प्रार्थना, यावेळी आदिनाथराव नवले पाटील, प्रकाश शेठ तोतला, माऊली वासरकर , डॉक्टर योगेश क्षीरसागर , संजय मुंदडा,संतोष गवाळकरलातूर,, बीड परभणी नांदेड संभाजीनगर, सोलापूर धाराशिव आदी दादा महाराजांचा शिष्य परिवार उपस्थित होते, महाप्रसादाचे नियोजन यजमान प्रकाश शेठ तोतला यांनी केले, सर्वांना महाप्रसाद वाटप करण्यात आला, आपल्या अंकात बातमी छापावी ही विनंती

# अंबाजोगाईत संततधार पाऊस : जनजीवन विस्कळीत

**अंबाजोगाई :** अंबाजोगाईत पावसाने गेल्या काही दिवसांच्या विश्रांतीनंतर पुन्हा एकदा हजेरी लावली आहे. सतत रिमझीम पावसामुळे गेल्या दोन दिवसापांसून ढगाळ वातावरण पहावयास मिळत आहे. त्यातच कालपासून पावसाचा जोर आणखी वाढला असून आज गुरुवार रोजी संततधार सुरुच आहे. त्यामुळे शेतातील कामे ठप्प झाली तर काही प्रमाणात जनजीवन विस्कळीत झाले आहे.

अंबाजोगाईत 28 जुलैपासून पावसाचा जोर वाढला आहे. पावसाच्या सरी कमी – अधिक प्रमाणात सुरूच आहेत. अंबाजोगाई शहरासह तालुक्यात गेल्या दोन दिवसांपासून ढगाळ वातावरण असल्याने पिकांवरील रोगराईला आमंत्रण देत आहे.

अंबाजोगाईत काल सायंकाळी विजांच्या कडकडाटासह जोरदार पाऊस झाला. मध्यरात्री पासून संततधार पाऊस सुरू आहे. काही वेळ पावसाचा जोर थोडा वाढतही आहे. त्यातच पावसामुळे हवेत गारवा वाढला असून नागरिक उबदार कपडयांचा वापर करीत आहेत. अंबाजोगाई शहरासह तालुक्यात संततधार पाऊस सुरू असल्याने पावसाचे पाणी रस्त्यावर साचले आहे. विशेषतः सखल भागात पाणी साचल्याने तेथून नागरिकांना चालताना कसरत करावी लागत आहे.

# घरफोडीचा गुन्हा उघड; चोरीस गेलेला ₹40 हजारांचा मुद्देमाल हस्तगत, एक आरोपी अटकेत

**अंबाजोगाई :** अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील घरफोडीच्या गुन्ह्याचा यशस्वी छडा लावत पोलिसांनी चोरीस गेलेला संपूर्ण ₹40 हजारांचा मुद्देमाल हस्तगत केला असून एका आरोपीस अटक केली आहे. या प्रकरणातील दुसऱ्या आरोपीचा शोध सुरू असून त्याला लवकरच अटक करण्यात येणार असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, रविवार पेठ येथील रहिवासी शैलेश पद्माकर स्वामी (वय 33) यांनी अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. 15 जुलै 2026 रोजी ते कुटुंबासह त्र्यंबकेश्वर येथे दर्शनासाठी गेले होते. 17 जुलै रोजी घरी परतल्यानंतर मुख्य दरवाजाचे कुलूप तुटलेले दिसून आले. घरातील कपाटाची पाहणी केली असता लहान मुलांचे सुमारे ₹14 हजार किमतीचे चांदीचे दागिने आणि ₹26 हजारांची रोख रक्कम असा एकूण ₹40 हजारांचा मुद्देमाल अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याचे निदर्शनास आले. याप्रकरणी अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचा तपास करताना पोलिसांनी

घटनास्थळावरील सीसीटीव्ही फुटेज, गुप्त बातमीदारांकडून मिळालेली माहिती आणि तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे समयुद्दीन जकीयोद्दीन शेख (वय 24, रा. बिलाल नगर, अंबाजोगाई) याला अटक केली. त्याच्याकडून चोरीस गेलेले चांदीचे दागिने आणि ₹26 हजारांची रोख रक्कम असा संपूर्ण मुद्देमाल जप्त करण्यात आला.

तपासादरम्यान रियाज इक्बाल पठाण (रा. रविवार पेठ, अंबाजोगाई) याचाही या गुन्ह्यात सहभाग असल्याचे निष्पन्न झाले असून त्याचा शोध सुरू आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कावत, अपर पोलीस अधीक्षक चेतना तिडके आणि सहाय्यक पोलीस अधीक्षक ऋषिकेश शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक शरद जोगदंड यांच्या नेतृत्वात पोलीस उपनिरीक्षक आनंद शिंदे, पोलीस हवालदार अमोल गायकवाड, भागवत नागरगोजे, पांडुरंग काळे तसेच पोलीस अंमलदार हनुमंत चादर यांच्या पथकाने केली. या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक आनंद शिंदे करीत आहेत.

# इरा इंटरनॅशनल इंग्लिश स्कूल युसुफ वडगाव येथील विद्यार्थ्यांचे चौथी शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश

**केज/प्रतिनिधी :** केज तालुक्यातील युसुफ वडगाव येथील इरा इंटरनॅशनल इंग्लिश स्कूल च्या विद्यार्थ्यांनी चौथी शिष्यवृत्ती परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे या परीक्षेत युसुफ वडगाव केंद्रातून इरा इंग्लिश स्कूलचे प्रियल तोडकर, अर्जुन भुमकर, लामतुरे शिवप्रसाद, जोशी सिद्धी, जोशी अमित, टिंगरे आरव, समर्थ सुरवसे पांनढवळे समर्थ, गुजर वरद हे विद्यार्थी शिष्यवृत्ती पात्र ठरले आहेत, त्यांच्या या यशामुळे गावासह विद्यालयात आनंदाचे वातावरण निर्माण झाले




आहे विद्यार्थ्यांनी सातत्यपूर्ण अभ्यास शिक्षकांचे योग्य मार्गदर्शन आणि पालकांच्या प्रोत्साहनाच्या बळावर हे यश मिळवले, त्यांच्या या यशाबद्दल विद्यालयाचे संचालक प्राध्यापक बापूसाहेब भुसारी व सर्व शिक्षक वृंद, पालक यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या उज्वल भवितव्यास शुभेच्छा दिल्या आहेत या यशामुळे विद्यालयाची शैक्षणिक परंपरा बळकट झाली आहे, आगामी काळात अशाच प्रकारे विद्यार्थी गुणवत्तापूर्ण यश संपादन करतील असा विश्वास शिक्षकांनी व्यक्त केला आहे.

तसेच या अगोदरही पाचवी शिष्यवृत्ती परीक्षेत या विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन करत तब्बल 13 विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र ठरले आहेत याचबरोबर एम टी एस ओलंपियाड परीक्षेतही या विद्यालयातील विद्यार्थ्यांनी तालुक्यात सर्वात जास्त उत्तीर्ण होण्याचे रेकॉर्ड केले आहे.

तसेच इतरही स्पर्धा परीक्षेमध्ये जसे की सैनिकी स्कूल, नवोदय विद्यालय परीक्षे मध्येही विद्यालयातील अनेक विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे.

# 45 लाखांची लाच स्वीकारताना अधिकारी एसीबीच्या जाळ्यात

## थकीत बिले काढणे व निलंबन मागे घेण्यासाठी लाचेची मागणी;संभाजीनगर एसीबीची बीडमध्ये मोठी कारवाई

बीड(प्रतिनिधी)बीड जिल्ह्यात लाचखोरीच्या घटनांमध्ये सातत्याने वाढ होत असल्याचे चित्र असताना, शुक्रवारी (दि. 31 जुलै) संभाजीनगर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) बीडमध्ये मोठी कारवाई करत सामाजिक वनीकरण विभागातील अधिकाऱ्याला तब्बल 45 लाखांची लाच स्वीकारताना रंगेहात पकडले.

मिळालेल्या माहितीनुसार, श्रीनिवास लखमवाड, सामाजिक वनीकरण अधिकारी, याने सन 2025-26 मधील वृक्षलागवडीची बिले मंजूर करून देण्यासाठी, कर्मचाऱ्यांचे थकीत वेतन अदा करण्यासाठी तसेच निलंबनाची कारवाई मागे घेण्यासाठी 45 लाख रुपयांची लाच मागितल्याची तक्रार करण्यात आली होती. तक्रारदाराने 29 जुलै रोजी संभाजीनगर एसीबीकडे तक्रार दाखल केली होती.

तक्रारीची पडताळणी केल्यानंतर एसीबीच्या पथकाने शुक्रवारी दुपारी सापळा रचला. यावेळी श्रीनिवास लखमवाड याला 45 लाख रुपयांची लाच स्वीकारताना रंगेहात अटक करण्यात आली. यामध्ये पाच लाख रुपये खऱ्या नोटा व बाकी मनोरंजन(खोट्या नोटा) बँक मधील नोटा स्वीकारताना रंगेहात एसीबीच्या जाळ्यात अडकले.यामुळे लाचखोरात एकच खळबळ उडाली.

या कारवाईमुळे शासकीय कार्यालयांमधील भ्रष्टाचाराचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. लाखो रुपयांचे वेतन घेणारे अधिकारीही मोठ्या रकमेची लाच मागत असल्याच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे.

या प्रकरणी पुढील कायदेशीर कारवाई संभाजीनगर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून सुरू आहे.

# पूर्णवादी बँकेत पारनेरकर महाराज यांच्या जन्मतिथी निमित्त 367 रक्तदात्यांचे रक्तदान

**बीड :** पूर्णवादी नागरिक सहकारी बँक म. बीड द्वारे प.पू. पूर्णवाद प्रणेते डॉ. रामचंद्र महाराज पारनेरकर व प.पू. पूर्णवाद वर्धिष्णू डॉ. विष्णु महाराज पारनेरकर यांच्या जन्मतिथी निमित्त दि. २७/०७/२०२६ व दि. २९/०७/२०२६ रोजी बँकेच्या २५ शाखांद्वारे रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या रक्तदान शिबीरामध्ये बँकेच्या ग्राहक, सभासद, हितचिंतक तसेच कर्मचाऱ्यांनी उस्फूर्त सहभाग नोंदवला. एकूण ३६७ रक्तदात्यांनी या शिबीरामध्ये रक्तदान केले.




दि. २७/०७/२०२६ रोजी बँकेच्या जालना रोड, छ. संभाजीनगर येथील शाखेच्या शिबीराचे उद्घाटन राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण तथा दुग्धव्यवसाय विकास मंत्री मा.ना. श्री अतुल सावे यांनी केले, सातारा परिसर, छ. संभाजीनगर येथील शाखेच्या शिबीराचे उद्घाटन मा. श्री समीर राजूरकर, महापौर, छ. संभाजीनगर यांच्या हस्ते करण्यात आले तसेच जालना शाखेच्या शिबीराचे उद्घाटन मा. श्री लक्ष्मीकांत पांगारकर, स्थायी समिति अध्यक्ष, मनपा, जालना यांनी केले. त्याचप्रमाणे दि. २९/०७/२०२६ रोजी बीड येथील तिन्ही शाखेच्या एकत्रित शिबीराचे उद्घाटन मा. श्री हरिष धार्मिक, अप्पर जिल्हाधिकारी, बीड व मा. श्री सतीश तोटावार, जिल्हा उपनिबंधक, बीड यांच्या हस्ते करण्यात आले व मुख्य कार्यालय येथे सर्व मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. तसेच इतर ठिकाणी विविध मान्यवरांनी शिबीराचे उद्घाटन केले. कार्यक्रमाच्या प्रारंभी प.पू. डॉ. रामचंद्र महाराज पारनेरकर, प.पू. डॉ. विष्णु महाराज पारनेरकर तसेच भारतमाता यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

बँकेचे अध्यक्ष डॉ. सुभाष जोशी, बँकेचे संचालक श्री सुहास तेंडुलकर, श्री विश्वनाथ माणुसमारे, इंजि. महादेव हुलजुते, ॲड. अमित देशपांडे, डॉ. सुरेंद्र कलंत्री, डॉ. विवेक पालवनकर, सौ. जयश्री रायते, श्री विश्वंभर थिगळे, प्रा. ज्योतीश्वर भालेराव, श्री सुमुख गोविंदपूरकर यांनी विविध ठिकाणी उपस्थिती दर्शवली व शिबीराचे उद्घाटन करून रक्तदानही केले, तसेच या निमित्ताने ग्राहक-सभासद यांच्याशी संवाद साधला. या सर्व शिबीरांमध्ये पूर्णवाद परिवारातील शिष्य मंडळींनी उस्फूर्त सहभाग नोंदवला व रक्तदान केले यामुळे कार्यक्रमाची शोभा वाढली.

रक्तदान शिबीराच्या यशस्वी आयोजनासाठी उपस्थित मान्यवरांनी आयोजकांचे कौतुक केले. या शिबीराच्या आयोजनासाठी बँकेचे अध्यक्ष डॉ. सुभाष जोशी, उपाध्यक्ष डॉ. लक्ष्मीकांत पारनेरकर, संचालक ॲड. अमित देशपांडे, सीईओ श्री राजेश कुलकर्णी, डेप्यु. सीईओ श्री प्रल्हाद राजुरीकर, सरव्यावस्थापक श्री महेश पारगांवकर यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व शाखाधिकारी व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. रक्तदानासारख्या जीवनदायी कार्यात मोठ्या संखेने सहभागी होऊन नागरिकांनी समाजाप्रती असलेली आपली संवेदनशीलता व सामाजिक उत्तरदायित्व अधोरेखित केले. आयोजकांनी रक्तदाते, मान्यवर, उपस्थित नागरिक तसेच सर्व सहभागी विविध रक्तपेढीच्या सहकाऱ्याबद्दल मनःपूर्वक आभार व्यक्त केले.

# राष्ट्र प्रथम हे ध्येय ठेवणाऱ्यांना संस्कार भारती सन्मानित करते : डॉ. पी. के. कुलकर्णी



**बीड :** समाजात प्रत्येकजण आपापल्या परीने योगदान देत असतो. मात्र "राष्ट्र प्रथम" हे ध्येय डोळ्यासमोर ठेवून कार्य करणाऱ्या व्यक्तींना समाजाने सन्मानित केले पाहिजे. संस्कार भारती ही संस्था राष्ट्रप्रेमी, कला, संस्कृती आणि समाजसेवेच्या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महनीय व्यक्तींचा गौरव करून त्यांना प्रोत्साहन देण्याचे पवित्र कार्य करत आहे. हे काम खरोखरच स्पृहणीय आहे, असे गौरवोद्गार ज्येष्ठ विचारवंत डॉ. पी. के. कुलकर्णी यांनी काढले. संस्कार भारती, बीड शाखेच्या वतीने महर्षी वेद व्यास जयंती अर्थात गुरुपौर्णिमेच्या औचित्याने शहरातील अमृत मंगल कार्यालयात विविध क्षेत्रातील मान्यवरांचा भव्य सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला होता. यात ह.भ.प दत्तात्रय महाराज मिसाळ (अध्यात्म) उत्तमराव हजारे (पत्रकारिता) दौलतराव वानखेडे (समाजसेवा) उत्तमराव मोटे (संगीत) ॲड. भीमराव गोस्वामी (विधी) डॉ. महेंद्रजी गोशाल (वैद्यकीय) या मान्यवरांना सन्मानपत्र, शाल, श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले. या सर्वांनी आपापल्या क्षेत्रात राष्ट्रहीत व समाजहीतासाठी मोलाचे योगदान दिले आहे. गुरुपौर्णिमेचे औचित्य साधून ज्यांचा सन्मान करण्यात आला अशा सर्वांच्या वतीने हभप दत्तात्रय महाराज मिसाळ यांनी आपल्या ओघवत्या वाणीने संवाद साधताना कृतज्ञता व्यक्त करुन वेदव्यासांच्या जिवनावर विचार व्यक्त केले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. पी. के. कुलकर्णी तर प्रमुख अतिथी म्हणून ज्येष्ठ कलावंत सुरश्री भरतअण्णा लोळगे उपस्थित होते. प्रास्ताविकात संस्कार भारतीचे प्रांत मंत्री प्रमोद वझे यांनी संस्थेच्या कार्याचा आढावा घेतला. संस्कार भारती केवळ कार्यक्रमच करत नाही तर संस्कार रुजवण्याचे काम करते. आगामी काळात नाट्य, संगीत, चित्रकला आणि साहित्य या क्षेत्रात जिल्हास्तरीय स्पर्धा व कार्यक्रम आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली. यावेळी ह भ प महादेव महाराज चाकरवाडीकर यांना देण्यात आलेले विक्रमी सन्मानपत्र लिहिल्याबद्दल निवेदक सुरेश साळुंकेंचा हि सत्कार करण्यात आला.कार्यक्रमाची सुरुवात नटराजाच्या प्रतिमेचे पूजन आणि दीपप्रज्वलनाने झाली. यानंतर भरतअण्णा लोळगे आणि महेश वाघमारे यांनी सादर केलेल्या भक्तिगीतांनी वातावरण भक्तिमय झाले. त्यांना तबल्यावर के. सी. चव्हाण यांनी उत्तम साथसंगत केली.आपल्या अध्यक्षीय भाषणात डॉ. पी. के. कुलकर्णी यांनी भारतीय संस्कृतीतील गुरू-शिष्य परंपरेचे महत्व सांगितले. "गुरूशिवाय ज्ञान अपूर्ण आहे. गुरू हा केवळ ज्ञान देणारा नसून तो शिष्याला घडवणारा शिल्पकार आहे. शिष्याची प्रगती हीच गुरूची खरी ओळख आणि इतिकर्तव्यता आहे," असे सांगत त्यांनी अनेक संस्कृत श्लोक व उदाहरणे दिली. गुरुपौर्णिमेचे खरे महत्व समजावून सांगितले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुरेश साळुंके यांनी तर पद्य गायन सौ. विनया हसेगावकर यांनी केले. शेवटी संतोष पारगावकर यांनी आभार मानले.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जिल्हाध्यक्ष लक्ष्मीकांत सौंदत्तीकर सचिव गणेश तालखेडकर वासुदेव निलंगेकर लक्ष्मीकांत रुईकर अनिल कुलकर्णी अनंत सुतनासे प्रा. डॉ. राहुल पांडव डॉ. रविंद्र शिवणकर लक्ष्मीकांत खडकीकर महेश देशमुख जगदिश जाधव स्नेहा पारगावकर माधुरी थिगळे सुनंदा देशमुख रेणुका डांगे. यांनी विशेष परिश्रम घेतले.

# नानाजी देशमुख विद्यामंदिर येथे गुरुपोर्णिमा साजरी



गुरु म्हणजे आहे काशी साती तीर्थ तयापासी
तुका म्हणे ऐसे गुरु चरण त्यांचे ह्रदयी धरू

**बीड :** सर्वप्रथम महर्षी वेद व्यास यांच्या प्रतिमेचे पूजन आणि दीप प्रज्वलन करण्यात आले.. यावेळी अर्चना ताई तुंगार,अनिता ताई वजुरकर, ,मुख्याध्यापिका अर्चनाताई मोराळे, प्रमुख पाहुणे अविनाश ठोसर अनिकेत कुलकर्णी, जयश्री देशपांडे उपस्थित होते... यावेळी गुरुचे महत्त्व विद्यार्थ्यांनी आपल्या भाषणातून आणि गीतातून सांगितले. इयत्ता पहिली व दुसरी मृणाल पवार, पूजा घुमरे, विश्वजीत गुजर, आरुशा बारस्कर या सर्व विद्यार्थिनींनी एक गीत सादर केले. गट आणि पहिली दुसरीच्या विद्यार्थ्यांचा गाण्यावरती व्हिडिओ तयार करण्यात आला.

जयश्री ताई यांनी विद्यार्थ्यांना गुरुपौर्णिमा का साजरी करतात व त्या मागचे कारण सांगितले. स्वातीताई देशपांडे यांनी गोष्ट सांगितली व विद्यार्थी संकल्प करून घेतला. अरहा मोहोळकर, वेदांत गोरे, दुर्वा पर्जने,

श्रीशा गरजे, श्रीया आधापुरे, गार्गी वखरे, आर्या नवले या विद्यार्थ्यांनी भाषणे केली. अध्यक्षीय समारोपात सकाळ विभागात मोराळे ताई व दुपारचे विभागात ॲड.अर्चनाताई तुंगार यांनी विद्यार्थ्यांना गोष्ट सांगितली , अनिताताई वझुरकर यांनी विद्यार्थ्यांना गुरू बद्दल माहिती सांगितली.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्नेहलताई गोसावी . प्रास्ताविक तनया शिंदे आणि आभार श्रेया अवसेकर व जगदाळे ताई यांनी मानले.. या कार्यक्रमासाठी डॉक्टर सीमाताई जोशी, सुनंदाताई कुलकर्णी ,श्री गंगाधरजी देशमुख सर यांचे मार्गदर्शन मिळाले. सर्व शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी यांचे सहकार्य मिळाले.

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
www.dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

## जरांगे पाटील यांनी केलेल्या मागण्यांबाबत सरकारची नेहमीच सकारात्मक भूमिका : डॉ.राधाकृष्ण विखे पाटील

**राहाता (प्रतिनिधी) :** मराठा आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी केलेल्या मागण्यांबाबत सरकारने नेहमीच सकारात्मक भूमिका घेतली आहे. मराठा समाजाच्या प्रश्नांबाबत महायुती सरकारने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली जेवढे निर्णय घेतले, असे निर्णय यापूर्वी कोणत्याही मुख्यमंत्र्यांनी घेतले नाहीत. महायुती सरकार मराठा समाजाच्या सर्व मागण्यांची अंमलबजावणी प्रभावीपणे करीत असून, मनोज जरांगे पाटील यांच्यावर आंदोलनाची वेळ येऊ देणार नाही. वेळ पडली तर, त्यांची भेट घेऊन समाधान करेल, अशी स्पष्ट भूमिका जलसंपदा मंत्री तथा मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष डॉ.राधाकृष्ण विखे पाटील यांनी मांडली.

मराठा आंदोलक नेते मनोज जरांगे पाटील यांनी २९ ऑगस्टपासून पुन्हा आंदोलन करण्याच्या दिलेल्या इशाऱ्याच्या पार्श्वभूमीवर, मंत्री विखे पाटील यांनी माध्यमांशी संवाद साधून सरकारची भूमिका स्पष्ट केली. अंतरवाली सराटीमध्ये मराठा आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांना दिलेल्या आश्वासनांवर ठोस कार्यवाही सरकारने केली आहे. राज्यात प्रथमच स्वतंत्र मराठा आरक्षण कक्ष स्थापन करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. मराठा समाजातील विद्यार्थ्यांना इतर मागासवर्गीयांप्रमाणे शैक्षणिक सवलती व सोयीसुविधा देण्याचा निर्णयही घेण्यात आला असून, उसकी अंमलबजावणी सुरू असल्याकडे त्यांनी लक्ष वेधले. मंत्री विखे पाटील म्हणाले की, मराठा आरक्षणाच्या प्रश्नाची वाटचाल पाहिली तर, २०१४ साली मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीच मागासवर्गीय आयोगाची स्थापना करून, कायद्याच्या चौकटीत टिकणारे आरक्षण मराठा समाजाला दिले होते. दुर्दैवाने राज्यात आघाडी सरकारच्या नाकर्तेपणामुळे हे आरक्षण गमवावे लागले. मात्र, त्यानंतरही राज्यात पुन्हा सत्तेवर आलेल्या महायुती सरकारमुळेच मराठा समाजाचा आरक्षणाचा निर्णय हा सर्वोच्च न्यायालयापर्यंत टिकला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उपसमितीच्या अध्यक्षपदाची जबाबदारी दिल्याने समितीच्या माध्यमातून मराठा समाजाकरिता अनेक निर्णयांची अंमलबजावणी सुरू झाली.

## आयसीआयसीआय प्रु आयप्रोटेक्ट स्मार्ट प्लस

**मुंबई, 31 जुलै 2026:** आयसीआयसीआय प्रुडेन्शिअल आयप्रोटेक्ट स्मार्ट प्लस आता 10 वर्षांच्या लाइफ कव्हर पर्यायासह उपलब्ध आहे. ही योजना अशा ग्राहकांसाठी तयार करण्यात आली आहे ज्यांच्यावर गृहकर्ज, मुलांचे शिक्षण आणि व्यावसायिक कर्जे अशा जबाबदाऱ्या आहेत. यामुळे, ज्या काळात आर्थिक जबाबदाऱ्या सर्वाधिक असतात, त्या काळात ग्राहकांना कमी प्रीमियममध्ये चांगले लाइफ कव्हर निवडणे या योजनेमुळे शक्य होते ग्राहकांना असाध्य आजाराचे निदान झाल्यास आयसीआयसीआय प्रु आयप्रोटेक्ट स्मार्ट प्लस अंतर्गत विम्याच्या रकमेइतकेच 100% संरक्षण मिळते. विशेष म्हणजे, या योजनेत गंभीर आजारांपासून संरक्षणाचा पर्याय उपलब्ध आहे, ज्यासाठी ठरावीक रकमेचा प्रीमियम आकारला जातो आणि त्यात दरवर्षी वाढ होत नाही. या योजनेत 67,100 रुपयांपर्यंतच्या मोफत आरोग्य सेवांचाही समावेश आहे, तसेच 3 लाख रुपयांपर्यंतची क्लेमची रक्कम ग्राहकांना त्वरित दिली जाते.

## एचडीएफसी बँकेच्या सीएसआरचे अस्तित्व 10.77 कोटी लोकांपर्यंत पोहोचले

मुंबई - एचडीएफसी बँक या भारतातील खाजगी क्षेत्रातील सर्वांत मोठ्या बँकेच्या सीएसआर उपक्रमामुळे १०.७७ कोटी लोकांवर परिणाम झाला आहे. परिवर्तन हा त्यांचा सीएसआर उपक्रमांचा ब्रॅन्ड असून हा ब्रॅन्ड आता भारतातील २८ राज्ये आणि ८ केंद्रशासित प्रदेशांमध्ये पोहोचला आहे. बँक सध्या एनजीओ पार्टनर्स, स्थानिक प्रशासन आणि सामाजिक संस्था बरोबर काम करुन स्थानिक स्तरावरील गरजेच्या, दीर्घकालीन शाश्वत परिणाम घडवण्यासाठी योग्य पध्दतीने सहकार्य करत आहे. बँके तर्फे ही घोषणा करण्यात आली की त्यांच्या कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी (सीएसआर) उपक्रमा अंतर्गत त्यांनी आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये रु १,३१६.१८ कोटी रुपये खर्च केले असून याची घोषणा या वर्षीच्या एकत्रित वार्षिक अहवालात त्यांनी केली आहे. गेल्या वर्षाच्या तुलनेत ही वाढ रु २४८ कोटींची असून सर्वसमावेशक सीएसआर मधील गुंतवणूक त्यांच्या परिवर्तन या कार्यक्रमाच्या सुरुवातीपासून त्यांनी अंदाजे ७,४९२ कोटी रुपयांची आहे.

## छत्तीसगड पर्यटन मंडळाचा रोडशो

**पुणे :** छत्तीसगडला विरंगुळा, वन्यजीव, वारसा आणि आध्यात्मिक पर्यटनासाठी उदयोन्मुख पर्यटनस्थळ म्हणून देशभरात अधिक प्रभावीपणे सादर करण्याच्या उद्देशाने छत्तीसगड पर्यटन मंडळाने उद्योग भागीदार फिक्की यांच्या सहकार्याने आज पुण्यातील हयात रीजेन्सी येथे यशस्वी 'छत्तीसगड पर्यटन रोडशो' आयोजित केला.या रोडशोमध्ये छत्तीसगडमधील आघाडीचे टूर ऑपरेटर्स, हॉटेल व्यावसायिक आणि ट्रॅव्हल एजंट्स यांनी पुणे व महाराष्ट्रातील पर्यटन व्यवसायाशी संबंधित प्रतिनिधींशी संवाद साधत व्यावसायिक सहकार्याच्या नव्या संधींचा शोध घेतला. या कार्यक्रमाला छत्तीसगड पर्यटन मंडळाचे अध्यक्ष श्री नीलू शर्मा, व्यवस्थापकीय संचालक श्री विवेक आचार्य तसेच फिक्की छत्तीसगड पर्यटन समितीचे अध्यक्ष व छत्तीसगड ट्रॅव्हल ट्रेड असोसिएशनचे अध्यक्ष श्री जसप्रीत सिंह भाटिया उपस्थित होते.

# सभापती अनिल मकरीये यांनी घेतला विकासकामांच्या एनओसीचा आढावा




तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर :** महानगरपालिका हद्दीतील नागरिकांच्या विकासकामांना गती मिळावी आणि विविध मंजूर कामांतील अडथळे दूर करून ती वेळेत पूर्ण व्हावीत, या उद्देशाने स्थायी समितीचे सभापती अनिल मकरीये यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांसोबत बैठक घेऊन विविध विकासकामांसाठी देण्यात आलेल्या नाहरकत प्रमाणपत्रांचा (एनओसी) सविस्तर आढावा घेतला.

बैठकीत खासदार निधी, आमदार निधी, जिल्हा नियोजन समिती तसेच शासनाच्या विविध योजनांअंतर्गत मंजूर झालेल्या रस्ते, ड्रेनेज, नाले संरक्षण भिंती, उद्याने आदी विकासकामांचा आढावा घेण्यात आला. यामध्ये पूर्ण झालेली कामे, प्रलंबित कामे तसेच तांत्रिक कारणांमुळे रखडलेल्या कामांची माहिती संबंधित अधिकाऱ्यांकडून घेण्यात आली.

प्रलंबित विकासकामे तातडीने मार्गी लावून मंजूर कामांमध्ये कोणत्याही प्रकारचा विलंब होणार नाही, यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या स्पष्ट सूचना सभापती अनिल मकरीये यांनी अधिकाऱ्यांना दिल्या. विविध विभागांमध्ये आवश्यक समन्वय साधून नागरिकांच्या अडचणी दूर करण्यावर भर देण्याचेही त्यांनी सांगितले. नागरिकांना दर्जेदार आणि वेळेत सुविधा उपलब्ध करून देणे हे महानगरपालिकेचे प्राधान्य असून, शहरातील विकासकामांचा नियमित आढावा घेऊन प्रलंबित कामे मार्गी लावण्यासाठी सातत्याने पाठपुरावा करण्यात येणार असल्याचे सभापती अनिल मकरीये यांनी यावेळी स्पष्ट केले.

# पुराच्या पाण्यात उतरून शिक्षकांनी विद्यार्थ्यांना सुरक्षित पोहोचवले घरी; लंगडा तांड्यातील विद्यार्थ्यांचा जीवघेणा प्रवास पुन्हा ऐरणीवर



तभा वृत्तसेवा

**कन्नड :** दि.३१ जुलै - कन्नड तालुक्यातील लंगडा तांडा येथे दि.३१ रोजी मुसळधार पावसामुळे गावाला जोडणाऱ्या पुलावरून पुराचे पाणी वेगाने वाहत असल्याने शाळेतून घरी परतणाऱ्या विद्यार्थ्यांच्या जीविताचा गंभीर प्रश्न निर्माण झाला. अशा धोकादायक परिस्थितीत जिल्हा परिषद शाळेतील शिक्षकांनी स्वतः पुराच्या पाण्यात उतरून विद्यार्थ्यांना सुरक्षितपणे पूल ओलांडून त्यांच्या गावाच्या दिशेने पोहोचविले.

गावापासून सुमारे एक किलोमीटर अंतरावर जिल्हा परिषद शाळा असून विद्यार्थ्यांना दररोज हा पूल ओलांडून शाळेत जावे-यावे लागते. शुक्रवारी शाळा सुटल्यानंतर पुलावरून पुराचे पाणी वेगाने वाहत असल्याने विद्यार्थ्यांना घरी जाणे धोकादायक बनले होते. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून शिक्षकांनी स्वतः पुराच्या पाण्यात उतरून विद्यार्थ्यांचा हात धरत त्यांना सुरक्षितपणे पूल पार करून दिला. शिक्षकांच्या या धाडसी आणि संवेदनशील कृतीमुळे संभाव्य अनर्थ टळला.

ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, दरवर्षी पावसाळ्यात लंगडा तांड्यातील विद्यार्थ्यांना अशाच जीवघेण्या परिस्थितीत शाळेत जावे आणि घरी परतावे लागते. प्रत्येक वेळी शिक्षक सोबत असतीलच, याची खात्री नसल्याने पालकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे.

विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने पुलाचे तातडीने उंचीकरण करावे किंवा कायमस्वरूपी सुरक्षित पर्यायी व्यवस्था करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. एखादी दुर्घटना घडण्यापूर्वी प्रशासनाने या प्रश्नाची गंभीर दखल घेऊन त्वरित उपाययोजना करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# कोणाच्या दबावाला बळी पडून अभिजित दिपके यांनी वक्तव्ये करु नयेत : डॉ. राधाकृष्ण विखे

**राहाता (प्रतिनिधी) :** कोणाच्या दबावाला बळी पडून अभिजित दिपके यांनी वक्तव्ये करू नयेत. धमकी आणि ऑफर देणाऱ्यांची माहिती त्यांनी समोर येऊन दिली पाहिजे. केवळ भारतीय जनता पक्षाला बदनाम करण्यासाठी अशी वक्तव्ये करणे योग्य नसल्याची प्रतिक्रिया जलसंपदा मंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केली.

केंद्र सरकार विद्यार्थ्यांच्या आंदोलनाविरोधात कधीच नव्हते. केंद्र सरकारने विद्यार्थ्यांच्या आंदोलनाबाबत सकारात्मक चर्चा केली. विद्यार्थ्यांनीही त्यांचे आंदोलन मागे घेतले. मात्र, जनाधार गमावलेल्या काही राजकीय पक्षांनी विद्यार्थ्यांच्या आंदोलनाचा आधार घेऊन राजकारण सुरू केल्याची टीका त्यांनी केली. अभिजित दिपके यांनी संदिग्धता निर्माण करण्यापेक्षा माध्यमांसमोर येऊन कोणी धमकी आणि ऑफर दिली हे स्पष्टपणे सांगितले पाहिजे. केवळ भारतीय जनता पक्ष आणि नेतृत्वाला बदनाम करण्यासाठी अशी वक्तव्ये करणे उचित नाही. त्यांच्या माध्यमातून कोणी असा प्रयत्न करीत असेल तर, अभिजित दिपके यांनीही त्याला बळी पडू नये, असा सल्ला मंत्री विखे पाटील यांनी दिला.

जंतरमंतर मैदानावरील विद्यार्थ्यांच्या आंदोलनानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केंद्रीय प्रवेश परीक्षांबरोबरच इतरही परीक्षांमध्ये पारदर्शकता आणण्यासाठी धाडसी निर्णय घेतला. परीक्षा सुधारणा विधेयक संसदेच्या दोन्हीही सभागृहांनी मंजूर केले, याचे संपूर्ण देशात स्वागत झाले आहे. देशातील परीक्षा पद्धतीतील सुधारणांसाठी केंद्र सरकारने तांत्रिक क्षेत्रातील अनुभवी व्यक्तिमत्त्व नंदन निलेकणी यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय टास्कफोर्स स्थापन करण्याचाही निर्णय करून, विद्यार्थ्यांना नवा विश्वास दिला असल्याचे मंत्री विखे पाटील म्हणाले.

काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी संसदेमध्ये केलेल्या वक्तव्यावर भाष्य करताना मंत्री विखे पाटील म्हणाले की, लोकसभेचे सभागृह हे बेताल वक्तव्ये करण्यासाठी नाही. त्याची गरिमा राखली गेली पाहिजे. त्यामुळेच खासदार अनुरागसिंह ठाकूर यांनी राहुल गांधी यांच्या विरोधात असंवैधानिक शब्द वापरल्याच्या कारणाने दाखल केलेल्या ठरावाचे त्यांनी समर्थन केले.

# आदिवासी मन्नेरवारलू युवक महासंघाच्या महाराष्ट्र प्रदेशाध्यक्षपदी योगेश छबिलवाड



तभा वृत्तसेवा

बिडकीन दि ३१ जुलै आदिवासी मन्नेरवारलू समाजातील युवा नेतृत्व म्हणून कार्यरत असलेले योगेश छबिलवाड यांची आदिवासी मन्नेरवारलू युवक महासंघ, महाराष्ट्र राज्य यांच्या महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष पदावर नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या या निवडीमुळे समाजातील युवकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून विविध स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. योगेश छबिलवाड हे सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक तसेच युवक संघटन क्षेत्रात सातत्याने कार्यरत आहेत. समाजहितासाठी विविध उपक्रम राबवून त्यांनी युवकांमध्ये नेतृत्व, संघटन आणि सामाजिक बांधिलकीची प्रेरणा निर्माण केली आहे. त्यांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत महासंघाने त्यांच्यावर महाराष्ट्र प्रदेशाध्यक्षपदाची महत्त्वपूर्ण जबाबदारी सोपविली आहे. ही नियुक्ती महासंघाच्या संयुक्त बैठकीत करण्यात आली. यावेळी राष्ट्रीय अध्यक्ष प्रविण आण्णा जेठेवाड, उपाध्यक्ष रामरेड्डी आईटवाड, विश्वनाथ आरबडवाड, महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष शिवराम बोधगिरे, राष्ट्रीय चिटणीस राजेश्वर पालेपवाड, राष्ट्रीय कोषाध्यक्ष गंगाधर रामोड, गणेश सुभानजोड, तुकाराम आडबडवाड तसेच माजी आमदार अकुला ललिता यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.यावेळी उपस्थित मान्यवरांनी विश्वास व्यक्त केला की, योगेश छबिलवाड यांच्या सक्षम नेतृत्वाखाली आदिवासी मन्नेरवारलू युवक महासंघ अधिक बळकट, संघटित आणि प्रभावी होईल. समाजातील युवकांना शिक्षण, रोजगार, सामाजिक एकात्मता, सांस्कृतिक जतन आणि सर्वांगीण विकासासाठी नवी दिशा मिळेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

या निवडीबद्दल समाजातील विविध मान्यवर, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि हितचिंतकांनी योगेश छबिलवाड यांचे अभिनंदन करत त्यांच्या भावी कार्यकाळासाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

## कै. भाऊराव पाटलांचे कार्य नव्या पिढीसाठी प्रेरणादायी : श्री पी.एस.मेनन



तभा वृत्तसेवा

**पैठण दि ३० :-** कै. भाऊरावजी पाटील शिसोदे हे अत्यंत बिकट परिस्थितीत ज्ञानाची गंगा सर्वसामान्य लोकांपर्यंत नेण्यासाठी काम करणारे महापुरुष होते. त्यांनी शिक्षण हीच आपल्या विकासाची खरी नाडी आहे हे ओळखून प्रतिष्ठान महाविद्यालयाची धुरा सांभाळली. भाऊराव पाटलांचे हे शैक्षणिक कार्य नव्या पिढीसाठी प्रेरणादायी अशा स्वरूपाचे आहे असे विधान प्रतिष्ठान महाविद्यालयाचे माजी प्रबंधक श्री पी.एस. मेनन यांनी केले. ते दिनांक ३० जुलै २०२६ रोजी प्रतिष्ठान महाविद्यालयात संपन्न झालेल्या कै. भाऊरावजी पाटील शिसोदे यांच्या ३१ व्या स्मृतीदिनाच्या कार्यक्रमात बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री नारायणराव गोंडे पाटील हे होते. त्यांनीही नानांच्या आठवणींना उजाळा दिला. संस्थेच्या विकासाची भूमिका मांडताना सन्माननीय सचिव राजेंद्रजी पाटील शिसोदे यांनी कै.भाऊराव पाटलांचा वारसा आम्ही नेटाने पुढे नेऊ आणि संस्थेचा विकास करू अशी ग्वाही दिली. कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रतिष्ठान शिक्षण प्रसारक मंडळाच्या नूतन कार्यालयाचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते पार पडले. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष श्री रवींद्र पाटील शिसोदे, उपाध्यक्ष अशोकराव पाटील निर्मळ, संचालक श्रीधरराव पाटील शिसोदे, श्री विजयकुमार पाटील शिसोदे, श्री सुशील पाटील शिसोदे, उपप्राचार्य प्रा. वैजनाथ चाटे, स्टाफ सेक्रेटरी डॉ. रमाकांत तिडके, प्रबंधक श्री शेखर शिंदे इत्यादी मान्यवरांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. एस. जी. सोनकांबळे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. हंसराज जाधव यांनी केले तर आभार प्रा. कोकरे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रशासकीय अधिकारी आर.एन.शिरवत, कार्यालयीन अधीक्षक इम्रान पठाण, डॉ. एम.एन.करे, डॉ.अर्जुन मोरे, प्रा. रविचंद्र अंधोरीकर, प्रा. जयश्री गायकवाड, प्रा. नूतन जोनवाल, डॉ. नेहा अहुजा, श्री कोष्टी, श्री चाबुकस्वार इत्यादींनी परिश्रम घेतले.

## महिलांसाठी Stayfree® ची नवी इनोव्हेशन; 'पॅड चेंज अलर्ट'सह Secure XL बाजारात

तभा वृत्तसेवा

**मुंबई :** भारतातील अग्रगण्य मासिक पाळी स्वच्छता ब्रँड Stayfree® ने आपल्या लोकप्रिय Stayfree® Secure XL सॅनिटरी पॅडचे अपग्रेडेड व्हर्जन बाजारात सादर केले आहे. 'झिरो टेन्शन, डबल प्रोटेक्शन' या संकल्पनेवर आधारित या नव्या उत्पादनात 'पॅड चेंज अलर्ट' हे नाविन्यपूर्ण फीचर देण्यात आले असून, महिलांना १२ तासांपर्यंत अधिक सुरक्षित आणि आरामदायी संरक्षण मिळणार असल्याचा कंपनीचा दावा आहे.

या पॅडमध्ये 'डबल लीक लॉक टेक्नॉलॉजी'चा वापर करण्यात आला आहे. पॅडच्या कडेला असलेले दोन विशेष बॅरिअर्स रक्त गळती रोखण्यास मदत करतात. आतील बॅरिअर द्रव आतमध्ये लॉक करतो, तर बाहेरील बॅरिअर लाल रंग दर्शवून पॅड बदलण्याची वेळ झाल्याचा संकेत देतो. त्यामुळे महिलांना वारंवार पॅड तपासण्याची गरज कमी होऊन अधिक आत्मविश्वासाने दैनंदिन कामे करता येतात.

स्टेफ्री इंडियाच्या मार्केटिंग डायरेक्टर सुप्रिया श्रीनिवास यांनी सांगितले की, पाळीच्या काळातील मानसिक तणाव कमी करण्यासाठी हे उत्पादन विकसित करण्यात आले आहे. केनव्ह्यूचे हेड – बेबी अँड विमेन्स हेल्थ रिसर्च अँड डेव्हलपमेंट डॉ. दिलीप त्रिपाठी यांनीही या तंत्रज्ञानामुळे संरक्षणासोबत आराम आणि आत्मविश्वास वाढण्यास मदत होईल, असे सांगितले. या उत्पादनाच्या प्रचारासाठी अभिनेत्री कियारा अडवाणी हिची प्रमुख भूमिका असलेले नवे दूरदर्शन अभियानही सादर करण्यात आले आहे.

### मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर), सोयगांव यांचे न्यायालय, ता. सोयगांव जि. औरंगाबाद.

### जाहीर प्रगटन

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.: 152/2026.

अर्जदारः- 1) विमलबाई बळीराम कोळी, वयः 75 वर्षे, धंदाः मजुरी, रा. बोरखेडे बु. ता. चाळीसगांव जि. जळगांव. 2) इंदुबाई बाबुलाल कोळी, वयः 70 वर्षे, धंदाः मजुरी, रा. पिलखोड ता. चाळीसगांव जि. जळगांव 3) सिंधु अप्पा मासरे, वयः 60 वर्षे, धंदाः घरकाम, रा. घर नं. 284, गुरूदत्त नगर, मु. म्हारळ पो. वरप ता. कल्याण जि. ठाणे. 4) इंदुबाई शालीग्राम निकम, वयः 54 वर्षे, धंदाः घरकाम, रा. घर नं. 21 बी, सरकारी धान्य गोडाउन जवळ, भावसार कॉलनी, धुळे ता. व जि. धुळे.

// विरूध्द //

गैरअर्जदारः- निरंक

अर्जः- वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधीतास जाहीर प्रकटन व्दारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी ॲड. आर. एस. महाजन साहेब, सोयगांव ता. सोयगांव जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर), यांच्या मार्फत या न्यायालयात वारस प्रमाणपत्रासाठी अर्ज केलेला आहे. मयत नामे महादु उर्फ महादेव गोबजी जाधव (कोळी) हे दिनांकः-26/02/2005 ला मौजे पिलखोड ता. चाळीसगांव जि. जळगांव येथे उपचार घेत असतांना मयत झालेले असुन त्यांना वरील, अर्जदार हे कायदेशीर वारसदार आहे. अर्जदारांना शासकीय सवलतसाठी व शासकीय लाभासाठी वारस प्रमाणपत्र मिळणे आवश्यकता आहे. सदरचा अर्ज हा अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळवण्यासाठी दाखल केलेला आहे.

(पुढील दिनांकः- 01/09/2026).

तरी, ज्या कोणास अर्जदारांच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटनव्दारे प्रसिध्द झाल्यापासुन 30 दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्रीसह उजर अगर आक्षेप नोंदवावा. अन्यथा अर्जदारांना कायदेशीर वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांकः 31/07/2026 ला रोजी सही व न्यायालयाच्या शिक्कयासह दिले.

विभागीय लिपीक. सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क. स्तर, सोयगांव

# युवा मोर्चा जिल्हा उपाध्यक्षपदी सुरज बाळासाहेब घुले यांची निवड



तभा वृत्तसेवा

**पैठण दि ३० :-** येथील सुरज बाळासाहेब घुले यांची छत्रपती संभाजीनगर भारतीय जनता युवा मोर्चा जिल्हा उपाध्यक्षपदी जिल्हाध्यक्ष ऋषी एकनाथ नरवडे यांनी नियुक्ती केली आहे. यावेळी सुरज घुले यांनी सांगितले की संभाजीनगर जिल्ह्यात युवा मोर्चा सक्षम करण्यावर भर देणार आहे. युवा मोर्चातील युवकांच्या समस्या सोडवण्यासाठी कटीबद्ध असल्याचे घुले म्हणाले. जालना -छत्रपती संभाजीनगर स्थानिक स्वराज्य संस्था विधान परिषद आमदार सुहास भाऊ शिरसाठ ,महिला प्रदेश सरचिटणीस रेखाताई कुलकर्णी, माजी चेअरमन तुषार शिसोदे, माजी नगराध्यक्ष दत्तात्रय गोर्डे, माजी नगरध्यक्ष सुरज लोळगे, जिल्हा उपाध्यक्ष लक्ष्मण औटे,जिल्हा चिटणीस विजय चाटुपळे ,विद्यमान नगरसेवक ज्ञानेश्वर दहिवाळ,बंडू आंधळे , दत्ता वाकडे,रामेश्वर तांबे, विजय चव्हाण मंडळ अध्यक्ष ,बाप्पासाहेब शेळके, प्रशांत आव्हाड,शहर सरचिटणीस सुरेश गायकवाड, सतिष आहेर, शहर चिटणीस योगेश धर्माधिकारी, विशाल खर्गे,रमेश पाठक, लक्ष्मीकांत पसारे आदिसह कार्यकर्ते पदाधिकारी यांनी घुले यांचे अभिनंदन केले.

# आचार्य श्री हेमसागरजी गुरुदेव यांच्या 47 व्या मंगल वर्षायोगाचा भव्य मंगल कलश स्थापना सोहळ्याचे आयोजन

**छत्रपती संभाजीनगर :** श्री १००८ चंद्रप्रभ खंडेलवाल दिगंबर जैन मंदिर, आर्यनंदी कॉलनी, वेदांत नगर, रेल्वे स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर येथे परमपूज्य सिध्दांत चक्रवर्ती आचार्य श्री १०८ हेमसागरजी गुरुदेव यांच्या ४७व्या मंगल वर्षायोगाचा शुभारंभ रविवार, दि. २ ऑगस्ट २०२६ रोजी अत्यंत श्रद्धा, भक्ती आणि धार्मिक उत्साहाच्या वातावरणात होणार आहे. आर्यनंदी कॉलनी येथे प्रथमच चातुर्मास व मंगल वर्षायोगाचे आयोजन होत असल्याने संपूर्ण जैन समाजात उत्साहाचे आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. समाजासाठी हा ऐतिहासिक, गौरवशाली आणि प्रेरणादायी सोहळा ठरणार आहे.

या पावन प्रसंगी सकल दिगंबर जैन समाजाच्या उपस्थितीत भव्य मंगल कलश स्थापना सोहळा, आचार्य श्री हेमसागरजी गुरुदेव यांचे पूजन, गुरु वंदना तसेच विविध धार्मिक विधी आणि अनुष्ठानांचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्यात परमपूज्य तपस्वी सम्राट आचार्य श्री १०८ सन्मतिसागरजी गुरुदेव यांच्या पावन प्रेरणेचा आणि मंगल आशीर्वादाचा लाभही भाविकांना मिळणार आहे.

कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ७.३० वाजता भगवान जिनेंद्रदेवांच्या पंचामृत अभिषेकाने होईल. त्यानंतर सकाळी ८.३० वाजता आचार्य श्री सन्मतिसागरजी गुरुदेव यांच्या विधानाचे आयोजन करण्यात येईल. दुपारी २.०० वाजता भव्य मंगल कलश स्थापना सोहळ्यास प्रारंभ होईल. यामध्ये आचार्य श्री हेमसागरजी गुरुदेव यांचे पूजन-अर्चन, गुरु वंदना, मंगल आशीर्वचन तसेच धर्मसभेचे आयोजन करण्यात आले आहे. वर्षायोगाचे मुख्य संयोजक श्री संजय पापडीवाल यांनी सांगितले की, वर्षायोगाच्या संपूर्ण कालावधीत दररोज धर्मसभा, प्रवचन, स्वाध्याय, पूजन, विधान तसेच विविध धार्मिक आणि आध्यात्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार असून, त्यातून भाविकांना धर्म, संयम, संस्कार आणि आत्मकल्याणाची प्रेरणा मिळेल. त्यांनी सकल दिगंबर जैन समाजातील सर्व बांधवांना सपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित राहून या ऐतिहासिक आणि पुण्यमय सोहळ्याचा लाभ घ्यावा तसेच गुरुचरणी आपली श्रद्धा अर्पण करावी, असे आवाहन केले आहे. मंगल कलश स्थापना सोहळ्यानंतर उपस्थित सर्व भाविकांसाठी महाप्रसादीची व्यवस्था शैलेन्द्र सेठी, अभिषेक सेठी, राजेश सेठी व प्रणय सेठी परिवार यांच्या वतीने करण्यात आली आहे.

## हिंगोली नगरपरिषद, हिंगोली

## सूचना

### महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ नुसार

क्रमांक.हिं.न.प./फेरबदल-३७/आरक्षण-१०१/ दि. २७/७/२०२६.

ज्याअर्थी, हिंगोली नगरपरिषद शहराची दुसरी सुधारीत विकास योजना शासन नगर विकास विभागाची अधिसुचना क्रमांक टिपीएस-३११८/१३९६/प्र.क्र.-१३६/२०१८/नवि-३० दिनांक १० फेब्रुवारी २०१९ अन्वये भागशः मंजूर झाली असून, ती दिनांक १३ जुन २०१९ पासुनं अंमलात आली आहे. तसेच उक्त विकास योजनेच्या वगळलेल्या भागाची विकास योजना शासन नगर विकास विभाग अधिसुचना क्रमांक टिपीएस-३१२०/२९६/प्र.क्र.-४२/२०२०/नवि-३० दिनांक ०५ मार्च २०२१ रोजी मंजूर झाली असून दि. २३ एप्रिल २०२१ पासून अंमलात आली आहे.

आणि ज्याअर्थी, मौ. हिंगोली स.नं.६३ भाग चे क्षेत्र हे मंजूर विकास योजनेत आरक्षण क्र.१०१ STADIUM एकुण क्षेत्रफळ-६.८०हे. करीता दर्शविण्यात आले आहे. मा. जिल्हाधिकारी, हिंगोली यांचे दि. ०३ ऑक्टोंबर २०२५ रोजीचे निर्देशानुसार, हिंगोली नगरपरिषद ठराव क्र. ४७४, दि.०३ ऑक्टोंबर २०२५ अन्वये, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७(१) नुसार मंजूर विकास योजनेत फेरबदल करण्यास आणि त्याप्रमाणे सर्व वैधानिक कार्यवाही प्रशासनामार्फत करणेबाबतचा ठराव मा. प्रशासक, हिंगोली नगरपरिषद यांनी पारित केला आहे. (यापुढे ज्याचा उल्लेख "प्रस्तावित फेरबदल" असा करण्यात आला आहे);

उपरोक्त ठरावाच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ (१) नुसार मंजूर विकास योजनेत वापर विभागात करावयाचा फेरबदल खालीलप्रमाणे दर्शविला आहे.

| अ.क्र १. | गावाचे नाव / सर्वे क्रमांक | मंजूर विकास योजनेप्रमाणे आरक्षणाचे नाव आणि क्रमांक | विचाराधीन क्षेत्र | प्रस्तावित प्रमाणे फेरबदलानंतर अनुज्ञेय होणरा जमीन वापर विभाग |
|---|---|---|---|---|
| | मौ. हिंगोली स.नं.६३ भाग | आरक्षण क्र. १०१ STADIUM | ६.८० हे. | एकूण विचाराधीनक्षेत्रापैकी पश्चिमेकडील ३.४८हे. जागा STADIUM आरक्षणाकरीता राखीव ठेवून पुर्वेकडील ३.३२हे. जागा STADIUM आरक्षणातून वगळून, सार्वजनिक-निमसार्वजनिक वापर विभागात समाविष्ट करणे. |

आणि त्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ (१) नुसार मंजूर विकास योजनेत उपरोक्त प्रमाणे "प्रस्तावित फेरबदल" करण्याच्या अनुषंगाने हि सुचना नागरीकांकडून सुचना/आक्षेप मागविणेकरीता प्रसिद्ध करण्यात येत आहे. "प्रस्तावित फेरबदल" दर्शविणारा भाग नकाशा, हिंगोली नगरपरिषद, हिंगोली येथे सुचनाफलकावर जनतेच्या अवलोकनासाठी ठेवण्यात आलेला आहे. त्याप्रमाणे, प्रस्तावित फेरबदलाबाबत नागरीकांना सुचना/आक्षेप असल्यास हि सुचना महाराष्ट्र शासनाचे राजपत्रात आणि वर्तमानपत्रात प्रसिद्ध झाल्याचे दिनांकापासून एक महिन्यांचे आत लेखी स्वरुपात या कार्यालयास द्याव्यातः नमुद कालावधीत प्राप्त होणा-याच सुचना/आक्षेप हिंगोली नगरपरिषदेमार्फत विचारात घेण्यात येईल.

स्वाक्षरीत/-
मुख्याधिकारी,
हिंगोली नगर परिषद

## अग्रलेख

# परिवर्तनाचे पुढचे पाऊल

संसदेचे पावित्र्य, सभागृहाची प्रतिष्ठा असे शब्ददेखील 'बापुडे' ठरावेत असा अभूतपूर्व अनुभव बुधवारी संसदेत लोकसभेमध्ये सार्वजनिक परीक्षा गैरव्यवहार प्रतिबंधक दुरुस्ती विधेयकावरील चर्चेदरम्यान विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या सुमारे एक तासाच्या बेबंद भाषणसमयी अवघ्या देशाने घेतला. सभागृहात मांडल्या गेलेल्या कोणत्याही विधेयकावरच नव्हे, तर कामकाजातील कोणत्याही बाबीवरील चर्चा ही गांभीर्यानेच व्हावयास हवी अशी सामान्य अपेक्षा असते. जेव्हा कोणाही उमेदवारास सार्वजनिक जीवनातील सभ्यतेच्या अनुभवाने समृद्ध झाल्याच्या जाणिवांमुळे मतदारांकडून संसदेत किंवा विधिमंडळात प्रतिनिधित्व करण्यासाठी जनतेकडून पाठविले जाते, तेव्हा त्या सभागृहाच्या सभ्यतेचा, मर्यादांचा आणि लोकशाहीच्या प्रतिष्ठेचा आदर राखणे ही त्याची जबाबदारी आणि मतदारांच्या विश्वासासोबतची बांधिलकीदेखील असते. जनतेच्या हिताआड येणाऱ्या कोणत्याही समस्येवर तोडगा काढायचा असेल, तर सत्ताधारी किंवा विरोधक अशा कोणत्याही एका भूमिकेतून या समस्येकडे न पाहता, संवेदनशीलतेने पाहणे आणि प्रामाणिकपणे समस्या सोडविण्याच्या कामी सहभागी होणे अपेक्षित असताना, अशा समस्यांचेदेखील राजकारण करण्याचा एक विचित्र पायंडा अलिकडे संसदेपासून सर्वच लोकशाहीच्या सदनांत पडू पाहात असल्याची खंत सामान्य जनतेच्या मनात घर करून राहिलेली आहे. संसदेच्या सभागृहात विरोधी पक्षनेत्याने ज्या जबाबदारीने आपल्या कर्तव्याचे आणि बांधिलकीचे भान ठेवावयास हवे होते, त्याचा किंचितसा अंश बुधवारी या विधेयकावरील चर्चेदरम्यानच्या त्यांच्या वक्तव्यात शोधावा लागेल. तसे करूनही त्यामध्ये यश येईलच असे नाहीच, उलट, संसदेच्या कामकाजाच्या नोंदीतून काढून टाकावे लागतील अशा असभ्य आणि असंसदीय शब्दांची खैरात करून सभागृहाच्या प्रतिष्ठेलाच आव्हान देण्याचा हा प्रयत्न पाहून लोकशाहीने लाजेने मान खाली घातली असेल असेच कोणासही वाटू शकते. संसदेचे कामकाज नियमानुसारच चालविले जावे ही या सभागृहाची परंपरा आहे. त्यास बाधा येईल असे कोणतेही वर्तन किंवा वक्तव्य सभागृहाच्या कामकाजाचा भाग ठरू शकत नाही. वस्तुतः, गेल्या काही महिन्यांपासून ज्या गंभीर समस्येमुळे उभा देश अस्वस्थ आहे, विद्यार्थ्यांचा संताप खदखदत आहे, त्या समस्येवर प्रभावी तोडगा काढण्याकरिता सभागृहासमोर सादर झालेल्या दुरुस्ती विधेयकावरील चर्चेदरम्यान तरी या संकटाचे भान राखले जाणे अपेक्षित होते. पण प्रत्यक्षात, विद्यार्थ्यांच्या रस्त्यावरील आंदोलनास पाठिंबा देण्यावरून विरोधकांचे जे काही राजकारण या दरम्यान देशाने पाहिले, त्याचाच पुढचा अंक लोकसभेच्या सदनात या विधेयकावरील चर्चेदरम्यान, विशेषतः विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या भाषणादरम्यान देशाने पाहिला.

सार्वजनिक परीक्षांमधील गैरव्यवहार व पेपरफुटीसारख्या अत्यंत गंभीर अशा आणि शिक्षणव्यवस्थेला वेठीला धरणाऱ्या समस्येला कायमचा लगाम घालण्याच्या दृष्टीने या विधेयकातील नव्या दुरुस्त्या भविष्याला नवी दिशा देतील अशी अपेक्षा आता बळावली आहे. राहुल गांधी यांनी जनतेच्या याच अपेक्षांचे भान ठेवून विधेयकावरील चर्चेला विधायक मानसिकतेची साथ दिली असती, तर जनतेच्या हिताची खरी कळकळ दिसून आली असती. त्याऐवजी राजकारण करत, चर्चा भरकटविण्यासाठी कोणा विद्यार्थिनीसोबत झालेल्या संवादाचा दाखला देत त्या संवादाआडून असंसदीय शब्दांची प्रच्छन्न उधळण करत त्यांनी सभागृहाच्या कामकाजाचा महत्त्वाचा वेळ वाया घालविला आणि जनतेच्या अपेक्षांनाही पाने पुसली आहेत. राहुल गांधींनी विधेयकाशी सुसंगत मुद्द्यांवर चर्चा करावी अशी अपेक्षा वारंवार सभागृहात सभापतींकडून व्यक्त केली जात होती, मात्र त्याऐवजी गृहमंत्री आणि पंतप्रधानांना लक्ष्य करण्याची संधी साधण्यावरच त्यांनी आपल्या भाषणासाठी मिळालेला वेळ वापरला आणि एका महत्त्वाच्या गंभीर समस्येबाबत विरोधी पक्षनेते खरोखरीच किती गंभीर आहेत, हे संपूर्ण देशाला पाहावयास मिळाले.

संसदेच्या सभागृहातील या राजकीय नाट्यानंतरही आता परीक्षा पद्धतीतील गैरव्यवहारास आळा घालण्यासाठी अधिक कडक कारवाईची तरतूद असलेले विधेयक लोकसभेने मंजूर झाले आहे. आता अधिक कठोर कायदा अस्तित्वात येईल आणि सार्वजनिक परीक्षांमधील पेपरफुटीसारख्या, वर्षानुवर्षे सुरू असलेल्या गैरप्रकारांवर कायद्याचा वचक बसेल अशी अपेक्षा करावयास हरकत नाही. कारण, कायद्याचे राज्य हे कोणत्याही लोकशाहीची खरी ओळख असते. अर्थात, केवळ कायदे अस्तित्वात असल्याने कायद्याचे राज्य प्रस्थापित होत नाही; तर प्रत्येक व्यक्ती, संस्था आणि सत्ताधारी हे कायद्यापुढे समान आहेत, ही भावना आणि कायद्याची बंधने मानण्याची मानसिकताही समाजात रुजणे गरजेचे असते. आजही देशात कायद्यांची कमतरता नाही. गुन्हेगारी स्वरूपाच्या कोणत्याही कारवायांना आळा घालण्यास समर्थ असलेले अनेक कायदे देशात अस्तित्वात आहेत. तरीही, त्यांची प्रभावी, निष्पक्ष आणि सातत्यपूर्ण अंमलबजावणी हे आव्हानही त्यासोबत कायम आहे. एखादा कायदा किंवा एखादे संविधान कितीही चांगले असले, तरी कायदा किंवा संविधानाचे पालन करणारे लोक चांगले नसतील तर कायदे व संविधानही निष्प्रभ ठरते असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधान सभेत बजावले होते. आजच्या परिस्थितीत त्यांचा हा इशारा अधिक समर्पक ठरू पाहत आहे. संसदेमध्ये कामकाजादरम्यान जे काही पाहावयास मिळाले, त्यामध्ये संसदेच्या परंपरा आणि पावित्र्याचे पालन करण्याबाबतची आणि समाजात कायद्याचे व संविधानाचे पालन करण्याची मानसिकता रुजविण्याचे आव्हान बाबासाहेबांच्या इशाऱ्यानंतरची दशके उलटून गेल्यावर आजही कायम आहे, असा याचा स्पष्ट अर्थ आहे. संसदेतील कामकाजाच्या नियमाहून कोणीही मोठे नाही आणि कोणासाठी कायद्यापेक्षा वरचे स्थान नाही, ही कायद्याचे राज्य या संकल्पनेचा गाभा आहे. आज या संकल्पनेची खरी कसोटी सुरू असल्याचे दिसते. या संकल्पनेचा आदर व्यक्त व्हावा अशी अपेक्षा असलेल्यांच्या वर्तनातच त्याचा अभाव असेल, तर कायद्यावरील आणि व्यवस्थेवरील लोकांचा विश्वासही कमी होण्याचा धोका निर्माण होतो. कोणत्याही कायद्याचे पालन करणे ही सक्ती नव्हे, तर स्वयंशिस्त असली पाहिजे आणि ती शिस्त सामाजिक संस्कारातून रुजली पाहिजे, ही बाबही आता अधिक ठळकपणे अधोरेखित होऊ लागली आहे. कारण, कायदा आणि नागरिक यांच्यातील विश्वासाचे नाते जितके दृढ होईल, तितकी लोकशाही अधिक सुदृढ होईल. अन्यथा कायद्यांची रुंदी वाढत जाईल, पण न्यायाची उंची मात्र कमी होत जाईल. लोकशाहीची खरी ताकद लोकांच्या विश्वासात असते. कायद्याची भीती काही काळ शिस्त निर्माण करू शकते; परंतु कायद्यावरील विश्वासच कायमस्वरूपी सुसंस्कृत समाज घडवू शकतो. विरोधी पक्षांकडून विधेयकाचे राजकारण केले जात असल्याचा आरोप सभागृहात केंद्रीय मंत्री जितेंद्र सिंह यांनी केला. राहुल गांधी यांनी सभागृहात वापरलेली भाषा असंसदीय आहे, असा आक्षेप सत्ताधाऱ्यांकडून वारंवार घेतला गेल्यानंतरही त्याच शब्दांचा खेळ करण्याचा प्रयत्न होत असल्याचे दिसून आले. राहुल गांधी यांचे असंसदीय शब्दांचे खेळ आणि चर्चेस राजकीय रंग देण्याचा प्रयत्न यामुळे कामकाजाचा नूर पालटून गेल्याचे देशाने पाहिले आणि विरोधी पक्षनेत्याने गंभीरपणे बोलले पाहिजे ही किमान अपेक्षादेखील केविलवाणी ठरली. तरीही हे परीक्षा पद्धतीतील गैरव्यवहारांना लगाम घालण्यासाठीचे महत्त्वाचे विधेयक सभागृहाने संमत केले, म्हणून त्याचे स्वागत करावयास हवेच! २० जुलै रोजी सुरू झालेल्या संसदेच्या अधिवेशनाने आठवडाभर केवळ गदारोळच अनुभवला. सरकारने टाकलेल्या एका निर्णायक पावलामुळे ती कोंडी आता फुटली आहे. ■

## अर्थविशेष

### वेळेत कर पालन म्हणजे आर्थिक सुरक्षिततेची गुरुकिल्ली

**ॲड. हितेश पारसे**

आर्थिक वर्ष संपल्यानंतर प्रत्येक करदात्यापुढे एक महत्त्वाचे काम असते, ते म्हणजे आयकर विवरणपत्र (आयकर विवरणपत्र – आयटीआर) दाखल करणे. अनेक नागरिकांना वाटते की, 'माझा कर कापला गेला आहे', 'माझे उत्पन्न कमी आहे' किंवा 'नंतरही रिटर्न भरता येईल.' परंतु हा गैरसमज अनेक वेळा आर्थिक नुकसान, दंड, व्याज आणि भविष्यातील अडचणींचे कारण ठरतो. आर्थिक वर्ष २०२५-२६ (निर्धारण वर्ष २०२६-२७) साठी ज्या करदात्यांची खाती लेखापरीक्षण (लेखापरीक्षण) करण्याची आवश्यकता नाही, अशा करदात्यांनी आपले आयकर विवरणपत्र ३१ जुलै २०२६ पर्यंत दाखल करणे आवश्यक आहे. खालील करदात्यांनी ३१ जुलै २०२६ पर्यंत आयकर विवरणपत्र दाखल करणे अपेक्षित आहे (ज्यांना कर लेखापरीक्षण लागू नाही) : पगारदार कर्मचारी, निवृत्ती वेतनधारक, घरभाडे उत्पन्न असलेले करदाता, बँक व्याज, मुदत ठेवी, लाभांश किंवा इतर स्त्रोतांमधून उत्पन्न मिळणारे व्यक्ती, शेअर्स, म्युच्युअल फंड किंवा मालमत्ता विक्रीमधून भांडवली नफा मिळविणारे व्यक्ती, हिंदू अविभक्त कुटुंब ज्यांना लेखापरीक्षणाची आवश्यकता नाही. ज्या करदात्यांच्या खात्यांचे लेखापरीक्षण आवश्यक आहे, त्यांच्यासाठी आयकर कायद्यानुसार वेगळी अंतिम मुदत निश्चित करण्यात आलेली आहे.

**वेळेत आयकर विवरणपत्र दाखल करण्याचे प्रमुख फायदे**

१. उशिरा रिटर्न भरल्यामुळे होणारा दंड टाळता येतो. नियत मुदतीनंतर रिटर्न भरल्यास आयकर कायद्याच्या कलम २३४ एफ अंतर्गत विलंब शुल्क भरावे लागू शकते. याशिवाय कर थकबाकी असल्यास त्यावर व्याजही लागू शकते. २. व्याजाची बचत होते : जर कराची काही रक्कम बाकी असेल तर विलंबामुळे कलम २३४अ, २३४ब आणि २३४क अंतर्गत व्याज लागू शकते. वेळेत रिटर्न भरल्याने हा अतिरिक्त खर्च टाळता येतो. ३. व्यवसायातील किंवा भांडवली तोटा पुढे नेण्याचा अधिकार मिळतो : हा वेळेत रिटर्न भरण्याचा सर्वांत मोठा फायदा आहे. जर एखाद्या करदात्याला व्यवसायात तोटा झाला असेल, शेअर्समध्ये तोटा झाला असेल, म्युच्युअल फंड विक्रीत नुकसान झाले असेल, मालमत्ता विक्रीत भांडवली तोटा झाला असेल, तर हा तोटा पुढील वर्षातील नफ्याविरुद्ध समायोजित करण्याचा लाभ बहुतांश प्रकरणांमध्ये वेळेत रिटर्न भरल्यासच उपलब्ध होतो.




४. आयकर परतावा लवकर मिळतो : अनेक कर्मचाऱ्यांच्या पगारातून आवश्यकतेपेक्षा जास्त टीडीएस कापला जातो. त्याचप्रमाणे अग्रिम कर भरलेल्या अनेक करदात्यांनाही परतावा मिळण्याचा अधिकार असतो. रिटर्न जितक्या लवकर दाखल कराल, तितक्या लवकर त्यावर प्रक्रिया होऊन परतावा आपल्या बँक खात्यात जमा होऊ शकतो. ५. बँक कर्ज मिळण्यास मदत होते : आज जवळपास प्रत्येक बँक खालील कर्जांसाठी मागील काही वर्षांची आयकर विवरणपत्रे मागते. नियमित आयकर विवरणपत्र भरल्यामुळे आर्थिक विश्वासार्हता वाढते. ६. उत्पन्नाचा अधिकृत पुरावा म्हणून उपयोग : आयकर विवरणपत्र हे सर्वाधिक विश्वासार्ह उत्पन्न प्रमाणपत्र मानले जाते. याचा उपयोग खालील बाबींमध्ये होतो : व्हिसा अर्ज, परदेशी शिक्षण, शासकीय निविदा, उच्च मूल्याचे आर्थिक व्यवहार, मालमत्ता खरेदी इ. ७. मालमत्ता व्यवहारात मदत : आज मोठ्या मालमत्ता व्यवहारांमध्ये निधीचा स्त्रोत सिद्ध करणे अत्यंत महत्त्वाचे झाले आहे. आयकर विवरणपत्रामुळे मालमत्ता खरेदीसाठी आर्थिक क्षमता सिद्ध होते. गृहकर्ज मंजूर होण्यास मदत होते. आयकर विभागाकडून विचारणा झाल्यास गुंतवणुकीचा स्त्रोत स्पष्ट करता येतो. ८. आयकर विभागाच्या नोटिसा टाळण्यास मदत : आज आयकर विभागाकडे विविध स्त्रोतांमधून माहिती उपलब्ध होते. रिटर्न भरण्यापूर्वी ही माहिती तपासून योग्य प्रकारे उत्पन्न दाखविल्यास भविष्यातील नोटिसा टाळता येतात. ९. आर्थिक विश्वासार्हता वाढते : नियमित आयकर विवरणपत्र दाखल करणारी व्यक्ती आर्थिकदृष्ट्या शिस्तबद्ध मानली जाते. व्यवसाय, गुंतवणूक, भागीदारी, बँक व्यवहार आणि आर्थिक नियोजनामध्ये याचा सकारात्मक परिणाम होतो. १०. आर्थिक नियोजन करण्याची संधी : दरवर्षी रिटर्न भरताना आपण एकूण उत्पन्न, गुंतवणूक, करबचतीचे पर्याय, भांडवली नफा खर्चाचे नियोजन यांचा आढावा घेतो. यामुळे पुढील वर्षाचे आर्थिक नियोजन अधिक प्रभावीपणे करता येते.

**रिटर्न भरण्यापूर्वी कोणती कागदपत्रे तपासावीत?**

फॉर्म १६, फॉर्म २६एएस, एआयएस, टीआयएस, बँकेचे व्याज प्रमाणपत्र, शेअर्स व म्युच्युअल फंड भांडवली नफा विवरणपत्र, घरभाडे उत्पन्नाची माहिती, योग्य बँक खाते तपशील, इतर सर्व उत्पन्नाची माहिती.

**करदाते कोणत्या चुका वारंवार करतात?**

बचत खात्यावरील व्याज दाखवत नाहीत, मुदत ठेवींवरील व्याज विसरतात, शेअर्स किंवा म्युच्युअल फंड विक्रीतील नफा किंवा तोटा दाखवत नाहीत, चुकीचा आयटीआर फॉर्म निवडतात, एआयएसमधील माहिती पडताळत नाहीत, चुकीचा बँक खाते क्रमांक देतात आदी छोट्या चुका पुढे मोठ्या अडचणी निर्माण करू शकतात. प्रत्येक वर्षी अंतिम तारखेच्या काही दिवस आधी आयकर पोर्टलवर गर्दी होते. तांत्रिक अडचणी निर्माण होतात. आवश्यक कागदपत्रे मिळत नाहीत. चुकीची माहिती भरली जाते. शक्य तितक्या लवकर आयकर विवरणपत्र दाखल करणे हेच योग्य.

**निष्कर्ष** : ३१ जुलै २०२६ ही केवळ एक अंतिम तारीख नाही, तर प्रत्येक करदात्याने आपली आर्थिक जबाबदारी पार पाडण्याची संधी आहे. वेळेत आयकर विवरणपत्र दाखल केल्यास दंड व व्याज टाळता येते, परतावा लवकर मिळतो, भविष्यातील करसवलतींचे लाभ मिळतात, कर्ज मिळणे सोपे होते, मालमत्ता व्यवहार सुलभ होतात आणि आयकर विभागाच्या अनावश्यक नोटिसांपासूनही संरक्षण मिळते. आजच्या डिजिटल युगात आयकर विभागाकडे प्रत्येक आर्थिक व्यवहाराची माहिती उपलब्ध असते. त्यामुळे फॉर्म १६, फॉर्म २६एएस, एआयएस आणि टीआयएस यांची योग्य पडताळणी करूनच आयकर विवरणपत्र दाखल करणे आवश्यक आहे. 'वेळेत भरलेले आयकर विवरणपत्र ही कायदेशीर पूर्तता नसून, आपल्या आर्थिक विश्वासार्हतेची व सुरक्षित भविष्याची मजबूत पायाभरणी आहे.' ■

९०९६३३२३५३

(लेखक कर व मालमत्ता हस्तांतरण सल्लागार आहेत.)

## वेध

**प्रफुल्ल व्यास**

### ही तर प्रामाणिक शेतकऱ्यांना शिक्षाच!

जगाच्या पाठीवर शेतकऱ्यांएवढा 'सहिष्णू' आणि तेवढाच 'जिद्दी' कोणीच नाही. त्याला कोण 'नागवत' नाही हे शोधून सापडणार नाही. तरीही तो राबल्याशिवाय राहत नाही. राबराब राबणे हा त्याचा जणू 'छंद' झाला आहे. तो कोणत्याच संकटांना भीत नाही. शेतकरी संघटित नाहीत म्हणून सर्वांची ठाकूरकी आहे. ते ज्या दिवशी संघटित होतील त्या दिवशी आवळा देऊन भोपळा काढणाऱ्यांना पळता भुई थोडी होईल. निसर्गाच्या कचाट्यात सापडलेला शेतकरी पिचला जात आहे. उत्पादित मालाला भाव न मिळणे हे त्यामागचे मूळ कारण आहे. शेतकरी नेते विजय जावंधिया कायम उत्पादित मालाला रास्त भाव मागणीसाठी घसा कोरडा करत आहेत. उत्पादित मालाला भाव दिल्यानंतर शेतकरी कर्जमाफीचा प्रश्नच उद्‌भवणार नाही, असे ते ठासून सांगतात. परंतु, त्यांच्या मागणीला अजून तरी सरकारने गंभीरपणे घेतले नाही. शेतकऱ्यांना 'कर्जमाफी'चे गाजर देत हलवत ठेवण्यात आमच्या सरकारी यंत्रणेला मोठा आनंद वाटतो. शेतकरी कर्जमाफी हा महाराष्ट्राच्या राजकारणाचा जणू स्थायीभाव झाला आहे. प्रत्येक सरकार येते, शेतकऱ्यांची बाजू घेत असल्याचा दावा करते, कर्जमाफीचा गाजावाजा करते. पण या साऱ्या गोंधळात एक प्रश्न प्रत्येक वेळी अनुत्तरित राहतो तो म्हणजे नियमित कर्ज फेडणाऱ्या शेतकऱ्यांचा गुन्हा काय? हा प्रश्न सरकारला कधीच पडत नसेल काय? मतांच्या राजकारणात कर्जमाफी ही आकर्षक घोषणा ठरते. मग, प्रामाणिकपणे कर्ज फेडणाऱ्या शेतकऱ्यांचे काय? महाराष्ट्रात पुन्हा एकदा यावर्षी कर्जमाफी झाली. (त्यासाठी बच्चू कडूंनी आंदोलन केले. रस्ते अडवले आणि कर्जमाफी आधीच ते मंत्रीही झाले, हा भाग अलहिदा!) कर्जमाफीतून हजारो कोटी रुपयांचा बोजा सरकार उचलणार आहे. अर्थात, शेतकऱ्यांना मदत दिलीच गेली पाहिजे. पण, आज परिस्थिती अशी आहे की, ज्याने लाखो रुपयांचे कर्ज वेळेवर फेडले, त्याला केवळ ५० हजार रुपयांचे प्रोत्साहन आणि ज्याने कर्ज फेडलेच नाही, त्याचे लाखो रुपयांचे कर्ज एका झटक्यात माफ. हा न्याय आहे की प्रामाणिकपणाची शिक्षा?

कर्जमाफीची घोषणा होताच गावागावात एकच चर्चा सुरू झाली की वेळेवर कर्ज भरून मूर्खपणा केला. ही भावना समाजात वाढत असेल, तर त्यासाठी जबाबदार कोण? कर्ज फेडू नका, एक दिवस सरकार माफ करेल. ही मानसिकता भविष्यात धोकादायक आहे. महाराष्ट्रात गेल्या दशकात वारंवार कर्जमाफी झाली. तत्कालीन पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग, २०१४ मध्ये वर्धा जिल्ह्यातील डोर्ली हे 'गाव विकणे आहे' या एका फलकावरून तेथे भेट देण्यासाठी आले होते. जावंधिया यांनी शेतकऱ्यांची परिस्थिती त्यांच्या डोळ्यापुढे उभी केली आणि नागपुरात पत्रकार परिषद घेऊन पंतप्रधान डॉ. सिंग यांनी देशातील पहिली शेतकरी कर्जमाफी जाहीर केली होती. (देशातील पहिली शेतकरी आत्महत्याही वर्धेतच झाली होती.) त्यानंतर २०१७, २०१९ आणि आता २०२६ मध्ये राज्य सरकारने कर्जमाफी केली. सरकारे बदलली, घोषणा बदलल्या, निकष बदलले. पण, शेतकऱ्यांचे प्रश्न कायम राहिले. जर प्रत्येक काही वर्षांनी कर्जमाफी करावी लागत असेल तर याचा अर्थ एकच सरकार प्रश्न सोडवत नाही, फक्त दिवस ढकलत आहे. कर्जमाफी हा उपाय नाही. उत्पादनाला योग्य भाव मिळाला असता तर कर्जमाफीची गरजच निर्माण झाली नसती. आजही शेतकऱ्यांना त्यांनी उत्पादित केलेल्या मालाला उत्पादन खर्चानुसार योग्य भाव दिला तर कर्जमाफीची गरज नाही, हे खुद्द शेतकरीच सांगतात. परंतु, बऱ्याचदा निसर्ग शेतीला पोषक नसतो. त्यावर शेतकरी कसाबसा मात करतो. शेतातील पीक काढतो. बाजारात ते विकण्यासाठी गेला की भावबाजीत फसतो. यावर्षी शेतकऱ्यांच्या घरातील कापूस विकला गेला. व्यापाऱ्यांच्या गोदामात जमा झाला आणि कापसाचे भाव वधारले होते. अशीच परिस्थिती दरवर्षी आम्ही अनुभवतो आहोत. या संपूर्ण व्यवस्थेत सर्वाधिक पिचला जातो तो नियमित कर्जफेड करणारा शेतकरी. त्याला फक्त ५० हजार रुपयांचे प्रोत्साहन! ज्याने ३ लाख रुपये भरले, त्याला ५० हजार! ज्याने भरलेच नाहीत, त्याचे २ लाख माफ हा कोणता न्याय म्हणावा? चुकीला बक्षीस आणि योग्य वर्तनाला शिक्षा असेच म्हणावे लागेल. यातून नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांचा विश्वास तुटतो आहे. या कर्जमाफीमुळे भरणारे आणि न भरणारे असा दुजाभाव होता कामा नये! ■

९८८१९०३७६५

## डिजिटल जागृती

### वैयक्तिक माहिती वापरली जाऊ शकते?

**सीए अभय सगदेव**

कल्पना करा... तुम्ही नियमित रक्ततपासणीसाठी निदान केंद्रात जाता. तुमचा रक्तनमुना घेण्यापूर्वी स्वागत कक्षावरील व्यक्ती तुमचे नाव, वय, मोबाईल क्रमांक, पत्ता, ई-मेल आणि आधार क्रमांक विचारते. आपल्यापैकी बहुतेक जण एकही प्रश्न न विचारता ही माहिती देतात. पण आपण प्रश्न विचारला पाहिजे का?

या परिस्थितीत दोन महत्त्वाच्या भूमिका समजून घेणे आवश्यक आहे. ज्या व्यक्तीची माहिती विचारली जाते ती व्यक्ती म्हणजे डाटा प्रिंसिपल (ज्या व्यक्तीशी वैयक्तिक माहिती संबंधित आहे ती व्यक्ती). निदान केंद्र, रुग्णालय, बँक, शाळा, खरेदीचे संकेतस्थळ किंवा इतर अशी संस्था, जी माहिती का आणि कशी वापरायची हे ठरवते, ती सामान्यतः डाटा फिड्युशिअरी (वैयक्तिक माहिती कोणत्या उद्देशासाठी आणि कशा प्रकारे प्रक्रिया करायची हे ठरवणारी व्यक्ती किंवा संस्था) असते.

डिजिटल वैयक्तिक माहिती संरक्षण कायदा, २०२३ अर्थात डीपीडीपी ॲक्टचा केंद्रबिंदू म्हणजे डाटा प्रिंसिपलची वैयक्तिक माहिती आणि गोपनीयतेचे संरक्षण. या उद्दिष्टाला घटनात्मक आधार आहे. निवृत्त न्या. के. एस. पुट्टास्वामी विरुद्ध युनियन ऑफ इंडिया या प्रकरणात, सर्वोच्च न्यायालयाच्या नऊ न्यायमूर्तींच्या खंडपीठाने २०१७ मध्ये गोपनीयतेचा अधिकार हा भारताच्या संविधानाखालील मूलभूत अधिकार असल्याचे मान्य केले. डीपीडीपी ॲक्ट डिजिटल जगात वैयक्तिक माहितीची जबाबदारीने प्रक्रिया व्हावी यासाठी नियम घालून या घटनात्मक मूल्याला व्यवहारात आणतो. हा कायदा डाटा फिड्युशिअरीला वैयक्तिक माहिती गोळा करण्यास प्रतिबंध करत नाही. आजच्या जीवनात सेवा देण्यासाठी संस्थांना अनेकदा वैयक्तिक माहितीची गरज असते. डॉक्टरांना उपचारासाठी रुग्णाची माहिती आवश्यक असते. बँकेला खाते उघडण्यासाठी आणि चालवण्यासाठी माहिती हवी असते. याच ठिकाणी नोटीस महत्त्वाची ठरते. नोटीस डाटा फिड्युशिअरीकडून दिली जाणारी सूचना, ज्यामध्ये वैयक्तिक माहिती का गोळा केली जात आहे आणि तिची प्रक्रिया कशी होईल हे स्पष्ट केले जाते) ही डाटा प्रिंसिपलला कोणती वैयक्तिक माहिती मागितली जात आहे, ती कोणत्या उद्देशासाठी मागितली जात आहे, तिच्यावर कोणती प्रक्रिया होणार आहे, कायद्यातील हक्क कसे वापरायचे आणि डाटा प्रोटेक्शन बोर्ड ऑफ इंडियाकडे तक्रार कशी करायची, हे समजण्यास मदत करणारी असावी. कायद्यातील क्रम महत्त्वाचा आहे. डीपीडीपी ॲक्टच्या कलम ५ नुसार डाटा फिड्युशिअरीने डाटा प्रिंसिपलकडून कन्सेंट मागण्याच्या वेळी किंवा त्यापूर्वी नोटीस देणे आवश्यक आहे. साध्या भाषेत, एखाद्या व्यक्तीला माहिती का हवी आहे आणि तिचा वापर कसा होणार आहे हे आधी सांगितले पाहिजे; त्यानंतरच त्या व्यक्तीकडून संमती मागितली पाहिजे. अर्थपूर्ण नोटीसशिवाय घेतलेली कन्सेंट माहितीपूर्ण निर्णय घेण्याच्या उद्देशाला पूर्ण करू शकत नाही. डीपीडीपी रुल्स, २०२५ या तत्त्वाला अधिक बळ देतात. नोटीस इतर कोणत्याही माहितीपासून स्वतंत्रपणे समजण्यासारखी असावी. ती स्पष्ट आणि सोप्या भाषेत असावी. किमान, कोणती वैयक्तिक माहिती प्रक्रिया होणार आहे, प्रक्रिया करण्याचा नेमका उद्देश काय आहे आणि त्या प्रक्रियेमुळे कोणत्या विशिष्ट वस्तू, सेवा किंवा उपयोग शक्य होतात, हे तिने स्पष्टपणे सांगितले पाहिजे. नोटीस ही दीर्घ आणि सर्वसाधारण सेवेच्या अटीमध्ये लपवलेली नसावी किंवा असंबद्ध कायदेशीर अटी व गोंधळात टाकणाऱ्या संदर्भांमध्ये दडवलेली नसावी. नोटीसने डाटा प्रिंसिपलला कृती करण्याचा व्यावहारिक मार्गही दिला पाहिजे. त्यामध्ये डाटा फिड्युशिअरीच्या संकेतस्थळाचा किंवा ॲपचा संपर्क-दुवा असावा आणि कन्सेंट मागे घेण्यासाठी, कायद्यातील हक्क वापरण्यासाठी व बोर्डकडे तक्रार करण्यासाठी उपलब्ध मार्ग स्पष्ट केलेले असावेत.

नोटीस मिळाल्यानंतर, आवश्यक त्या परिस्थितीत डाटा प्रिंसिपल कन्सेंट देऊ शकतो. उदा. एखाद्या दवाखान्याला एसएमएसद्वारे अपॉईंटमेंटची आठवण करून द्यायची असेल, तर तो उद्देश स्पष्ट असला पाहिजे. ऑनलाईन खरेदीच्या प्लॅटफॉर्मला ग्राहकांची माहिती विपणन संदेशांसाठी वापरायची असेल, तर ग्राहकाला नेमके कशासाठी संमती देत आहे हे समजले पाहिजे. कन्सेंट ठरावीक उद्देशाशी जोडलेली असावी; ती भविष्यातील प्रत्येक वापरासाठी सर्वसाधारण परवानगी बनू नये.

कन्सेंट कायमस्वरूपी नसते. ज्या ठिकाणी माहिती प्रक्रिया करण्याचा आधार कन्सेंट असतो, त्या ठिकाणी डाटा प्रिंसिपलला ती कोणत्याही वेळी मागे घेण्याचा अधिकार असतो. कायदा सांगतो की कन्सेंट मागे घेणे हे कन्सेंट देण्याइतकेच सोपे असले पाहिजे. कायद्यात सर्टन लेजिटिमेट यूजस (कायद्यात स्पष्टपणे नमूद केलेल्या काही परिस्थिती, ज्यामध्ये कन्सेंट न घेता वैयक्तिक माहितीची प्रक्रिया करता येते) यांनाही मान्यता आहे. प्रत्येक अत्यावश्यक कामासाठी दरवेळी नव्याने कन्सेंट घ्यावी लागली, तर समाजातील अनेक आवश्यक प्रक्रिया चालू शकणार नाहीत. म्हणून नोटीस आणि कन्सेंट एकमेकांशी संबंधित असल्या तरी त्या वेगळ्या संकल्पना आहेत. नोटीस डाटा प्रिंसिपलला माहिती देते. कन्सेंट, ज्या ठिकाणी आवश्यक आहे त्या ठिकाणी, डाटा फिड्युशिअरीला माहिती प्रक्रिया करण्याची परवानगी देते. नागरिक, रुग्ण, पालक, ग्राहक आणि डिजिटल सेवा वापरणारे म्हणून आपण एक साधी सवय लावली पाहिजे : 'का?' हा प्रश्न विचारण्याची. ही माहिती का आवश्यक आहे? सांगितलेल्या उद्देशासाठी प्रत्येक तपशील खरंच आवश्यक आहे का? या माहितीपर्यंत कोणाला प्रवेश असेल? माझ्यासमोर सांगितलेल्या उद्देशापुरतीच ती वापरली जाईल का? डीपीडीपी ॲक्ट पारदर्शकता आणि विश्वासाची संस्कृती निर्माण करण्याचा प्रयत्न करतो. डाटा फिड्युशिअरी प्रामाणिकपणे माहिती देतात आणि डाटा प्रिंसिपल माहितीपूर्ण निर्णय घेतात, तेव्हा व्यक्ती आणि संस्था दोघांचाही लाभ होतो.

**दैनंदिन जीवनातील डीपीडीपी** : एखादे खरेदीचे संकेतस्थळ तुम्हाला खरेदी पूर्ण करण्यापूर्वी जन्मतारीख विचारते. लहान पण स्पष्ट प्रायव्हसी नोटीसने ही माहिती का आवश्यक आहे आणि तिचा वापर कसा होणार आहे हे सांगितले पाहिजे. खरेदीसाठी ती माहिती आवश्यक नसेल, तर ती का मागितली जात आहे हे विचारण्याचा तुम्हाला पूर्ण हक्क आहे.

**लक्षात ठेवण्यासारखे मुद्दे** : एखादी संस्था तुमची वैयक्तिक माहिती मागते किंवा वापरते तेव्हा तुम्ही डाटा प्रिंसिपल असता; ती माहिती का आणि कशी वापरायची हे ठरवणारी संस्था सामान्यतः डाटा फिड्युशिअरी असते; डीपीडीपी ॲक्ट वैयक्तिक माहिती आणि गोपनीयतेचे संरक्षण करतो; पुट्टास्वामी निर्णयाने गोपनीयतेला मूलभूत अधिकाराचा दर्जा दिला आहे; कन्सेंट मागण्याच्या वेळी किंवा त्यापूर्वी नोटीस दिली जाणे आवश्यक आहे.

पुढच्या वेळी कोणी तुमची वैयक्तिक माहिती विचारेल, तेव्हा तुम्ही नम्रपणे विचाराल का : 'ही माहिती का आवश्यक आहे, तिचा वापर कसा होणार आहे आणि मी माझी कन्सेंट नंतर कशी मागे घेऊ शकतो?' ■

sagdeo1@gmail.com

## वाचक पत्रे

### मोर्चाचे गांभीर्य नष्ट झाले

शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यासाठी पुण्यात निघालेल्या मोर्चाचा मी एक प्रत्यक्षदर्शी साक्षीदार आहे. विद्यार्थ्यांनी त्यांच्या मागण्यांसाठी मोर्चा काढणे यामध्ये काही गैर नाही, पण या मोर्चामध्ये अनेक बाह्य घटक घुसलेले दिसले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याबद्दल अत्यंत अश्लील भाषेमध्ये घोषणा दिल्या जात होत्या, ज्या ऐकून या आंदोलनाचे पाठीराखे होते, त्यांची मान शरमेने खाली गेली असेल.

नरेंद्र मोदी यांच्याबद्दलचे अतिशय हीन दर्जाचे पोस्टर्स तेथे फडकवले जात होते. अनेक विद्यार्थी म्हणणारे युवक फक्त सेल्फी काढणे आणि आरडाओरडा करणे, हुल्लडबाजी करणे यात मश्गूल दिसले. चक्क काही पाचवी, सहावीतली मुले सुद्धा यामध्ये इकडे तिकडे पळत होती. या सर्व गोष्टींमुळे मोर्चाचे गांभीर्य नाहीसे झाले आणि आंदोलन करणाऱ्यांबद्दलचा आदरही नाहीसा झाला.

**शैलेश परांजपे**/बिबवेवाडी, पुणे ■■

### यापूर्वी आलेल्या पावसाचा अनुभव



मंगळवारी नागपूर शहरात अतिवृष्टी झाली. अवघ्या ३ तासांत सुमारे १८० मिमी (म्हणजेच जवळपास ७ इंच) पाऊस पडला; म्हणजेच ताशी ६० मिमी (किंवा २ इंच) इतका पाऊस झाला. माझे वय ७२ वर्षे आहे आणि मी दरवर्षीच इतक्या तीव्रतेचा पाऊस नागपुरात अनुभवला आहे.

सुमारे दहा वर्षांपूर्वीचा पाऊस आणि आताचा पाऊस यातला फरक असा आहे की, पूर्वी इतक्या तीव्रतेचा पाऊस एका तासापेक्षा कमी किंवा जास्तीत जास्त दीड तास पडायचा. मला अशा दोन घटना स्पष्टपणे आठवतात; त्यापैकी एक ७० च्या दशकाच्या सुरुवातीची होती आणि दुसरी १९९४ मधली. तेव्हाही नागपुरात पूर आला होता.

आता अशा प्रकारची अतिवृष्टी दर २-३ वर्षांतून एकदा होत आहे. २३ सप्टेंबर २०२३ रोजी झालेला अतिवृष्टीचा पाऊस देखील असाच होता. मी १९७५ पासून, म्हणजेच सुमारे ५१ वर्षांपासून स्थापत्य अभियंता म्हणून आणि गेल्या २६ वर्षांपासून सल्लागार म्हणून कार्यरत आहे. शहरातील पावसाचे पाणी वाहून नेणाऱ्या बहुतांश वाहिन्यांची मूळ रचना ताशी २५ मिमी (१ इंच) इतक्या तीव्रतेच्या पावसाचा विचार करून करण्यात आली आहे. त्यामुळे, जमिनीवरील अतिरिक्त पाणी वेगाने वाहून जात नाही आणि पूरसदृश परिस्थिती निर्माण होते.

माझा अनुभव असा आहे की, जेव्हा डिझायनर्स पावसाच्या पाण्याचा निचरा करणाऱ्या वाहिन्यांची रचना ताशी ६० मिमी (किंवा २ इंच) इतक्या तीव्रतेचा पाऊस गृहीत धरून करण्याची शिफारस करतात, तेव्हा सरकारी किंवा खाजगी अशा कोणत्याही प्रकारच्या संबंधित संस्था (एम्प्लॉयर्स) त्यापेक्षा अधिक क्षमतेची रचना करण्यास परवानगी देत नाहीत.

कालच्यासारखाच पाऊस जर सलग ३ तास पडला, तर मला वाटते की आपण सुरक्षिततेच्या दृष्टीने शहरातील ड्रेनेज यंत्रणेची रचना किमान ताशी ७५ मिमी (किंवा ३ इंच) पावसाची तीव्रता लक्षात घेऊन नव्याने केली पाहिजे. वारंवार कालच्यासारख्या परिस्थितीचा सामना करणे शहराला परवडणारे नाही.

**सतीश साल्पेकर**/९७६३७०२६१६ ■■

### सदाचरण व सत्कर्माने माणूस सुखी-समाधानी

व्यक्तीच्या जीवनात सदा सर्वदा आपले आचरण, वर्तन, नीतिमत्ता, नैतिकता, कर्म, कर्तव्ये सकारात्मक व प्राणी मात्रांच्या कल्याणाची असतील तर अशी व्यक्ती आपल्या जीवनात सुखी, समाधानी व आनंदी असते.

सद्गुण व मनाच्या निर्मळतेने व पावित्र्याने मनुष्य सुखी होत असतो. शील म्हणजे सदाचार व शील म्हणजेच सद्वर्तन. व्यक्तीच्या जीवनात शारीरिक व मानसिक निर्मळता हवी. माणसाने सतत विधायक व सकारात्मक कर्मे करावीत. कुणाचेही अहित चिंतू नये. माणसाने आपल्या जीवनात सतत चांगल्या व शुभ भावनेने समाजात वावरावे. स्वामी विवेकानंदांनी म्हटलेले आहे, आपल्या आत्म्याशी एकरूप होणे म्हणजे खरा धर्म आहे.

आत्मा हा ब्रह्मस्वरूप आहे. या भूतलावरील सर्व मानवजात प्रभूची लेकरे व प्रभूचे दास आहेत. मनुष्यस्वरूपातच ईश्वर आहे. यास्तव या भूतलावरील प्रत्येकाने आपला ईश्वरी धर्म जो शुद्ध, निर्मळ व निकोप आहे तो पाळावा. आपल्या भावभावना निर्मळ व स्वच्छ ठेवून समाजात सामाजिक नाती जपावी. यातच खरे सुख व समाधान सामावलेले आहे. ■

**धोंडीरामसिह राजपूत**/९४२१३१२२४४ ■■

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## ७६ हरवलेले मोबाईल मूळ मालकांना सुपूर्द

तभा वृत्तसेवा

लातूर : लातूर शहर पोलिसांनी हरवलेल्या मोबाइलचा शोध घेण्यासाठी राबवलेल्या विशेष मोहिमेला मोठे यश आले आहे. तांत्रिक तपास आणि सातत्यपूर्ण पाठ पुराव्याच्या आधारे पोलिसांनी तब्बल ७६ हरवलेले मोबाईल शोधून काढले आहेत. उपविभागीय पोलीस अधिकारी समीरसिंह साळवे यांच्या हस्ते हे मोबाईल त्यांच्या मूळ मालकांना सुपूर्द करण्यात आले.

पोलिस अधीक्षक अमोल तांबे यांच्या निर्देशानुसार शहरातील शिवाजीनगर, एमआयडीसी, विवेकानंद चौक आणि गांधी चौक पोलीस ठाण्यांच्या हद्दीत ही मोहीम राबवण्यात आली. मोबाइलच्या 'आयएमईआय' क्रमांकाचा मागोवा आणि तांत्रिक माहितीच्या विश्र्लेषणातून पोलिसांनी हे मोबाईल हस्तगत केले. या कामगिरीसाठी परिविक्षाधीन उपविभागीय पोलीस अधिकारी अक्षय जाधव यांच्या समन्वयातून ही मोहीम यशस्वी झाली. या मोहिमेत शहरातील चारही पोलीस ठाण्यांनी उत्कृष्ट कामगिरी केली. यामध्ये शिवाजीनगर पोलीस ठाण्याने सर्वाधिक २५, एमआयडीसीने २१, गांधी चौकने १६ आणि विवेकानंद चौक पोलीस ठाण्याने १४ मोबाईल हस्तगत केले. या कारवाईमुळे एकूण ७६ नागरिकांना त्यांचे हरवलेले मोबाईल परत मिळाले आहेत. ही मोहीम यापुढेही सुरू राहणार नागरिकांनी तत्काळ जवळच्या पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवून कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन लातूर पोलिसांनी केले आहे.



## विविध वृत्त.....

### 'एसआयआर'साठी लातूर शहर विधानसभा मतदारसंघात १ आणि २ ऑगस्ट रोजी विशेष शिबिरांचे आयोजन

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. ३१ जुलै : भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार २३५-लातूर शहर विधानसभा मतदारसंघात विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) कार्यक्रम व्यापक, लोकसहभागातून आणि कालबद्ध पद्धतीने राबविण्यात येत आहे. या अभियानाचा अंतिम टप्पा सुरू असून संपूर्ण पुनरीक्षण कार्यक्रमास आता अवघे १० दिवसांचा कालावधी शिल्लक राहिला आहे. त्या अनुषंगाने शनिवार, ०१ ऑगस्ट २०२६ आणि रविवार, ०२ ऑगस्ट २०२६ रोजी मतदारसंघात सर्व मतदान केंद्रांवर विशेष शिबीरांचे आयोजन करण्यात आले आहे. या दोन्ही दिवशी संबंधित मतदान केंद्रांचे बीएलओ सकाळी १० ते दुपारी ४ वाजेपर्यंत मतदान केंद्रावर प्रत्यक्ष उपस्थित राहून पुनरीक्षणाचे कामकाज पूर्ण करतील आणि उर्वरित वेळेत गृहभेटी देतील.

दिनांक ३० जूनपासून बीएलओ यांच्या घरोघरी भेटी सुरू असून, ज्या मतदारांची भेट होऊ शकलेली नाही किंवा ज्यांनी अद्याप ईएफ फॉर्म भरलेला नाही, अशा सर्व मतदारांनी या विशेष शिबीरांमध्ये सहभागी होवून आपले नाव, पत्ता, छायाचित्र व इतर तपशील पडताळून घ्यावेत. तसेच ज्या मतदारांचे मॅपिंग झालेले नाही, त्यांनी २००२ च्या मतदारयादीतील नाव उपलब्ध असल्यास त्या माहितीसह बीएलओ यांची भेट घ्यावी. शेवटच्या दिवसांत होणारी गर्दी, संभाव्य त्रुटी आणि गैरसोय टाळण्यासाठी नागरिकांनी 'बीएलओ घरी आल्यावरच फॉर्म भरू' असा विचार न करता स्वतः पुढाकार घेऊन मतदान केंद्रावर जावे किंवा संबंधित बीएलओ यांच्याशी संपर्क साधून आपली प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

प्रशासनामार्फत मतदार पुनरीक्षण अभियान यशस्वी करण्यासाठी घरभेटी, विशेष शिबिरे, मतदान केंद्रस्तरीय मार्गदर्शन, मदत कक्ष तसेच नागरिकांच्या शंकांचे तत्काळ निरसन करण्यात येत आहे. मतदार यादी अधिक अचूक, पारदर्शक, अद्ययावत आणि सर्वसमावेशक करण्यासाठी प्रत्येक पात्र मतदाराचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा असून या अभियानात राजकीय पक्षांचे पदाधिकारी, बूथ लेव्हल एजंट (बीएलए), लोकप्रतिनिधी, सामाजिक संस्था, स्वयंसेवी संघटना आणि सर्व नागरिकांनी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन लातूरच्या उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे यांनी केले आहे

## फक्त एक वेळच्या आमदारकीवर शिवाजीराव पाटील कव्हेकरांचे सक्रिय राजकारण का संपले ?

तभा वृत्तसेवा / श्रीधर स्वामी

लातूर : केवळ १९९५ च्या विधानसभा निवडणुकीचा अपवाद वगळता लातूर विधानसभा मतदार संघावर १९७८ पासून आजतागायत कायम भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे निर्विवाद वर्चस्व राहिले आहे. १९९५ च्या निवडणुकीत दिवंगत लोकनेते विलासराव देशमुख यांच्याबद्दल मतदारांत नकारात्मकतेची अभूतपूर्व लाट आली होती. त्या लाटेत तत्कालीन जनता दलाचे उमेदवार शिवाजीराव पाटील कव्हेकर विजयी झाले होते. विलासराव देशमुखांचा दणदणीत पराभव करून निवडून आलेल्या कव्हेकरांना लातूरच्या मतदारांनी त्यानंतरच्या निवडणुकीत डिपॉझिटही वाचविण्याची संधी दिली नव्हती, हेही तेवढेच महत्वाचे आहे. फक्त एक वेळच्या आमदारकीवर शिवाजीराव पाटील कव्हेकरांचे सक्रिय राजकारण का संपले ? असे एक ना अनेक प्रश्न लातूरच्या मतदारांना आजही भेडसावताना दिसत आहेत.

लातूरचा मतदार अत्यंत चाणाक्ष म्हणून ओळखला जातो. आपल्याकडे अनेक म्हणी बोली भाषेत प्रचलित आहेत. जसे की, 'जगात जर्मनी - भारतात परभणी', ' सकाळी लातूर.. दुपारी म्होतुर अन् सायंकाळी फितूर' . या म्हणींचा ढोबळ अर्थ कोणालाही समजावून सांगण्याची आवश्यकता नाही. आजघडीला लातूर जिल्ह्याच्या राजकारणात भारतीय जनता पार्टीने बऱ्यापैकी ताकद निर्माण केली आहे. तरीही सध्यस्थितीत भाजपमध्ये दिसणारे बहुसंख्य नेते कधीकाळी काँग्रेस तथा अन्य राजकीय पक्षात सक्रिय होते, हे कोणालाही वेगळे सांगण्याची गरज नाही. थोडक्यात, लातूरच्या भाजपला नेते पुरविण्याचे काम काँग्रेस पक्षानेच केले आहे, असे म्हटल्यास ते फारसे अतिशयोक्तीचे ठरणार नाही. असो. हा काळाचा महिमा आहे, एवढेच आपण याबाबतीत म्हणू शकतो.

लातूरच्या राजकारणावर दिवंगत लोकनेते विलासराव देशमुख यांचे कायम वर्चस्व राहिले आहे, हे सर्वज्ञात आहे. तरीही १९९५ च्या विधानसभा निवडणुकीत आलेल्या विलासराव देशमुख यांच्या विरोधातील नकारात्मक लाटेने त्यांचा दारुण पराभव केला. विलासराव देशमुखांचा त्यांच्या राजकीय जीवनातील पहिला वहिला पराभव का झाला ? याविषयी बोलण्या - लिहिण्यासारखे खूप काही आहे. मात्र, तूर्तास आपण त्यावर अधिक भाष्य करणार नाही.



त्या निवडणुकीत विलासराव देशमुख यांच्याबद्दल मतदारांत प्रचंड नाराजीचा सूर होता. काहीही करून त्यांचा पराभव करायचाच,असा चंगच जणू मतदारांनी बांधला होता. त्यावेळी जनता दलाने शिवाजीराव पाटील कव्हेकर यांना उमेदवारी दिली होती. त्या निवडणुकीत कव्हेकरांना १ लाख १२हजार ९०१ मते पडली होती, तर अनपेक्षित पराभवाचा सामना करावा लागलेल्या विलासराव देशमुखांना ७९ हजार ७७ मते पडली होती. विलासराव देशमुख त्याकाळी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते असल्याने त्यांचा पराभव राज्याच्या राजकारणात धक्कादायक मानला जाणे साहजिक होते.

मतदारांनी केवळ विलासराव नकोत म्हणून कव्हेकरांना मते दिली होती, हेही कोणाला वेगळे सांगण्याची आवश्यकता नव्हती. परंतु आपण नकारात्मक मतांच्या मदतीने अपघाताने निवडून आलो आहोत, ही बाब तत्कालीन आ. कव्हेकरांना कधीच कळली नाही, हाही इतिहास आहे.

कव्हेकरांची त्यावेळची भाषणे, ते मतदारांना देत असलेले महाभारतातील उदाहरणे आजही लोक विसरलेले नाहीत. केवळ एवढेच नव्हे तर १९९५ च्या निवडणुकीत विलासरावांना आस्मान दाखविणाऱ्या लातूरच्या मतदारांनी १९९९ च्या सार्वत्रिक निवडणुकीत त्यांच्यावर १ लाख १८ हजार ४९६ एवढ्या भरघोस मतांची बरसात केली. त्यावेळी काँग्रेसमधूनच भाजपमध्ये गेलेल्या विक्रम गोजमगुंडे यांना ३६ हजार ९६३ एवढी दुसऱ्या क्रमांकाची मते मिळाली होती. तर त्यावेळचे मावळते आमदार कव्हेकर चक्क तिसऱ्या क्रमांकावर फेकले गेले होते आणि त्यांना मते मिळाली होती केवळ २२ हजार ११९. लातूरच्या मतदारांनी त्यांना दुसऱ्या निवडणुकीत चक्क तिसऱ्या क्रमांकावर का फेकले ? असाही प्रश्न उपस्थित केला जातो. कव्हेकरांच्या आमदारकीचा बहुतांश वेळ न्यायालयाच्या खेट्या मारण्यात आणि आपण विलासरावांचा पराभव कसा केला हे सांगण्यात संपून गेला होता. कव्हेकरांनी आपण नकारात्मक मतांच्या आधारावर विजयी झालो आहोत, त्यामुळे पुढच्या निवडणुकीतही मतदारांनी आपल्याला निवडून द्यावे याकरिता अधिकाधिक विकास कामांसोबतच विलासराव देशमुख यांच्याबद्दल निर्माण झालेले नकारात्मक वातावरण कसे कायम राहिल याचा सारासार विचार करायला हवा होता, असे त्यावेळच्या राजकीय विश्र्लेषकांचे स्पष्ट मत होते.

एवढेच नाही तर शिवाजीराव पाटील कव्हेकर यांच्याकडून राजकीय जीवनात काही अक्षम्य चुकाही झाल्या. त्यांचा राजकीय प्रवास एकाच राजकीय पक्षात फारकाळ स्थिरावला नाही. आज जरी कव्हेकर भाजपमध्ये ज्येष्ठ नेते म्हणून कार्यरत असले तरी त्यांनी त्यावेळी भाजप सोडली नसती तर आज ते मराठवाड्यासह राज्यातील भाजपचे ज्येष्ठ नेते म्हणून कार्यरत राहिले असते. भाजपमधून पुन्हा काँग्रेस आणि काँग्रेसमधून पुन्हा भाजप असा त्यांचा राजकीय प्रवास राहिला आहे.अशा अस्थिर कार्यपध्दतीमुळेच कदाचित त्यांचा सक्रिय राजकीय प्रवास एकवेळच्या आमदारकीवर संपला असावा,अशा प्रतिक्रिया नागरीकातून व्यक्त केल्या जाताना ऐकायला मिळतात.

### राष्ट्रीय महामार्गावरील अवैध पार्किंग विरोधात विशेष संयुक्त कारवाई मोहीम

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. ३१ ऑगस्ट : जिल्ह्यात सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार व परिवहन आयुक्त यांच्या आदेशान्वये राष्ट्रीय महामार्गावरील अवैध पार्किंगविरोधात विशेष संयुक्त कारवाई मोहीम राबविण्यात येत आहे. राष्ट्रीय महामार्गावर अवैधरित्या उभी राहणारी जड व हलकी वाहने अपघातांचे प्रमुख कारण ठरत असून रस्ता सुरक्षेच्या दृष्टीने ही बाब अत्यंत गंभीर असल्याने, लातूर प्रादेशिक परिवहन कार्यालय, जिल्हा पोलीस, महामार्ग पोलीस, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (एनएचएआय) व संबंधित विभागांच्या संयुक्त विद्यमाने ही मोहीम हाती घेण्यात आली आहे.

या मोहिमेंतर्गत राष्ट्रीय महामार्ग क्र. एनएच-३६१ (उजनी-लातूर-टोल प्लाझा आष्टा-माळेगाव), एनएच-६३ (लातूर-मुरुड-नळेगाव-टाकळी/देगलूर रोड), एनएच-५४८बी (किल्लारी-औसा टी पॉईंट-लातूर-लखमापूर), एनएच-७५२ के (निलंगा-औराद) आणि लातूर शहर परिसरातील राष्ट्रीय महामार्गांवर विशेष तपासणी व कडक कारवाई करण्यात येत आहे. विविध महामार्गांवर अवैध पार्किंग करणाऱ्या वाहनांवर लातूरचे जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड, जिल्हा पोलीस अधीक्षक अमोल तांबे व उपप्रादेशिक परिवहन अधिकारी विनोद चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली नियमानुसार दंडात्मक कारवाई केली जात आहे. संबंधित वाहनचालक व मालकांना वाहने केवळ सुरक्षित आणि अधिकृत ठिकाणीच उभी करण्याबाबत स्पष्ट सूचना देण्यात येत आहेत. या पार्श्र्वभूमीवर, सर्व वाहनचालकांनी राष्ट्रीय महामार्गावर कोणत्याही परिस्थितीत अवैध पार्किंग करू नये, अन्यथा नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर मोटार वाहन कायदा व इतर संबंधित कायद्यांनुसार कठोर कारवाई केली जाईल, असे आवाहन लातूरचे उपप्रादेशिक परिवहन अधिकारी विनोद चव्हाण आणि उपप्रादेशिक परिवहन अधिकारी अमरसिंह गवारे यांनी केले आहे.

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना
## शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरणाची कार्यवाही तातडीने पूर्ण करावी : जिल्हाधिकारी

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. ३१ ऑगस्ट : राज्य शासनाच्या २ जून २०२६ च्या शासन निर्णयानुसार सुरू करण्यात आलेल्या पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ अंतर्गत पात्र शेतकऱ्यांची यादी यापूर्वीच प्राप्त झाली आहे. या यादीमध्ये नाव असलेल्या शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरणाची कार्यवाही तातडीने करावी. संबंधित बँकांनीही यासाठी शेतकऱ्यांशी संपर्क साधून आधार प्रमाणीकरणाबाबत माहिती द्यावी, अशा सूचना जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी दिल्या.




पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेसाठी पात्र शेतकऱ्यांच्या आधार प्रमाणीकरणाच्या कार्यवाहीचा आढावा घेण्यासाठी जिल्हाधिकारी डॉ. बास्टेवाड यांच्या अध्यक्षतेखाली जिल्ह्यातील बँक प्रतिनिधींची आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था व्ही. एल. पोतंगले, जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक राहुल आठवले यांच्यासह विविध बँकांचे प्रतिनिधी यावेळी उपस्थित होते.

पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेंतर्गत पात्र ठरलेल्या शेतकऱ्यांच्या याद्या संबंधित बँकांना उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. योजनेचा लाभ मिळण्यासाठी शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरणाची प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करण्याची गरज आहे. त्यामुळे सर्व बँकांनी या योजनेसाठी पात्र ठरलेल्या आपल्या कर्ज खातेधारक शेतकऱ्यांशी संपर्क साधून त्यांना नजीकच्या आपले सरकार सेवा केंद्रात जावून आधार प्रमाणीकरण पूर्ण करण्याबाबत माहिती द्यावी. आतापर्यंत ३८ टक्के शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरण पूर्ण केले असून उर्वरित शेतकऱ्यांच्या आधार प्रमाणीकरणाची कार्यवाही येत्या दोन दिवसात पूर्ण करण्यासाठी सर्व बँकांनी पुढाकार घेण्याच्या सूचना जिल्हाधिकारी डॉ. बास्टेवाड यांनी यावेळी दिल्या.

प्रारंभी जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था श्री. पोतंगले यांनी आधार प्रमाणीकरण विषयक कार्यवाहीची माहिती दिली. आतापर्यंत २१ हजार २६८ शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरणाची कार्यवाही पूर्ण केली असून अद्याप ३३ हजार ३९५ शेतकऱ्यांचे आधार प्रमाणीकरण शिल्लक असल्याचे त्यांनी सांगितले.

### लातूरच्या श्री केशव मित्र मंडळाचा नववा वर्धापन दिन उत्साहात साजरा



तभा वृत्तसेवा

लातूर दि. ३१ जुलै : लातूर शहरातील केशव नगर परिसरातील श्री केशव मित्र मंडळाचा नववा वर्धापन दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मंडळाचे अध्यक्ष सर्वोत्तम कुलकर्णी हे होते.

यावेळी प्रमुख पाहुण्या आणि मार्गदर्शक म्हणून ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या आणि लेखिका सौ. विनिता तेलंग यांची उपस्थिती होती. आपल्या मार्गदर्शनात त्यांनी सद्यस्थितीत कुटुंब व्यवस्थेचा अभ्यास करण्याची नितांत आवश्यकता असल्याचे सांगितले. कुटुंबात प्रत्येकाचा परस्परांशी नियमित सुसंवाद होत राहिला तर कुटुंबात एकही समस्या राहणार नाही. आजचा तरुण आपल्या भावना मोकळेपणाने कुटुंबातील सदस्यांसोबत व्यक्त करण्यास कचरतो. परिणामतः केवळ त्यांच्यातच नव्हे तर संपूर्ण कुटुंबाला नाहक मानसिक त्रासाचा सामना करावा लागतो. तरुणांनी विश्र्वासाने आपल्या कुटुंबाशी नियमित संवाद साधला तर त्यांच्या अनेक अडचणी - समस्या चुटकीसरशी सुटू शकतात, असे मतही सौ. तेलंग यांनी व्यक्त केले. यावेळी सौ. तेलंग यांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरवही करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मंडळाचे सचिव विलास आराध्ये गुरुजी यांनी केले. प्रास्ताविकात त्यांनी या कार्यक्रमाच्या आयोजनामागची भूमिका विस्तृतपणे विशद केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन किरणराव भावठाणकर यांनी तर आभार प्रदर्शन पांडुरंग उर्फ बंडू किसवे यांनी केले. कार्यक्रमास अशोक मठपती गुरुजी यांच्यासह श्री केशव मित्र मंडळाचे सर्व सदस्य, पदाधिकारी उपस्थित होते.

## तुटलेपणाची भावना आणि स्वाभिमानाचा संघर्ष म्हणजे एक भाकर तीन चुली : डॉ. भुकतरे

तभा वृत्तसेवा

उदगीर दि. ३१ जुलै : समाजातील विखुरलेली कुटुंबव्यवस्था आणि मर्यादित साधनसंपत्ती यामुळे एकाच घरातील माणसे वेगवेगळ्या चुलींवर जगू लागल्याने नात्यांमधील दुरावा, आर्थिक अडचणी आणि भावनिक वेदना या विचित्र बनत चाललेल्या आहेत. अशात एखाद्या स्त्रीला अपघाताने तीन नवरे करावे लागले त्यात एकाच अपत्याला घेऊन संसार करताना होणारी तुटलेपणाची भावना आणि स्वाभिमानाचा संघर्ष म्हणजे एक भाकर तीन चुली हि साहित्यकृती होय असे मत डॉ. बळीराम भुकतरे यांनी व्यक्त केले.




चला कवितेच्या वनात या उपक्रमांतर्गत सातत्यपूर्ण चालू असलेल्या वाचक संवादाचे ३६५ वे पुष्प प्रा. डॉक्टर बळीराम भुकतरे यांनी देवा झिंजाड यांच्या एक भाकर तीन चुली या साहित्यकृतीवर संवाद साधून गुंफले. पुढे बोलताना ते म्हणाले ग्रामीण जीवनात दारिद्र्य, कष्ट आणि स्वाभिमाना यांच्या संघर्षातून माणुसकी, त्याग आणि कुटुंबमूल्यांचा प्रभावी संदेश देण्याचा प्रयत्न करण्यात येतो. भाकर वाटून खाल्ली तर पोट भरते; पण मनं तुटली तर कोणतीही संपत्ती माणसाला सुखी करू शकत नाही. यातून ही साहित्यकृती वाचकाला ग्रामीण समाजजीवन, कुटुंबातील नात्यांचे महत्त्व आणि एकोप्याची जाणीव करून देते.

अध्यक्षीय समारोप करताना प्राध्यापक डॉ. दिलीपराव जाधव म्हणाले की, एक भाकर तीन चुली ही देवा झिंजाड यांची एक महत्त्वपूर्ण मराठी साहित्यकृती आहे. यामध्ये संवेदनशील मन, दारिद्र्य, कष्ट याचे वास्तववादी चित्रण केले आहे.

या कार्यक्रमाच्या यशस्वीततेसाठी प्रा. सुरेश शिंदे बेंबरेकर, मुरलीधर जाधव, प्रा.राजपाल पाटील , तुळशीदास बिरादार, हनुमंत मेत्रे , आनंद बिरादार, तुकाराम बिरादार, वीरभद्र स्वामी , गोविंद सावरगावे , सुरेश वजनाम आदींनी परिश्रम घेतले

### आंतर शालेय देशभक्तीपर समूहगीत गायन स्पर्धेचे आयोजन

तभा वृत्तसेवा

लातूर दि. ३१ जुलै : जयक्रांती अध्यापक महाविद्यालय,लातूर येथे माजी विद्यार्थी संघाच्या वतीने ८० व्या स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून आंतर शालेय देशभक्तीपर समूहगीत गायन स्पर्धे चे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा १३ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ११:00 वा होणार आहे.

या स्पर्धेत लातूर जिल्ह्यातील सर्व माध्यमाच्या माध्यमिक शाळांनी जास्तीत जास्त संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष प्रा बालाजी कांबळे यांनी केले आहे.

इच्छुक संघांनी जयक्रांती अध्यापक महाविद्यालयाशी संपर्क साधावा असे आयोजकांनी कळवले आहे.

## ग्रामदैवत श्री रामलिंगेश्वरच्या दिंडीने वेधले लातूरकरांचे लक्ष
### पारंपारिक वेशभूषेतील महिलांसह वारकरी, तरुण व तरुणींचा सहभाग

तभा वृत्तसेवा

लातूर दि. ३१ जुलै : शहरातील गावभाग परिसरात असलेल्या ग्रामदैवत श्री रामलिंगेश्र्वर देवस्थानच्या वतीने प्रतिवर्षी भागवत सप्ताहाचे आयोजन करण्यात येते. या सप्ताहाच्या सांगता दिनी श्रीच्या नगरप्रदक्षिणेसाठी दिंडी काढण्यात येते. याही वर्षी काढण्यात आलेल्या ग्रामदैवत श्री रामलिंगेश्र्वरच्या दिंडीने लातूरकरांचे लक्ष वेधून घेतले. या दिंडीत पारंपारिक वेशभूषेतील महिलांसह वारकरी, तरुण, तरुणी व भाविकांचा उत्स्फुर्त सहभाग होता. पारंपारिक वेशभूषेतील अश्र्वांवर रुढ झालेल्या तरुणी व बाल वारकजयांनी आपल्या सहभागाने या दिंडीची शोभा वाढवली होती.




लातूर शहरात गावभाग परिसरात असलेल्या श्री रामलिंगेश्र्वर देवस्थानच्या वतीने परंपरेनुसार भागवत सप्ताहाचे आयोजन करण्यात येते. या सप्ताहासाठी शहरासह परिसरातील भाविकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होते. याही वर्षी या सप्ताहाला मोठा प्रतिसाद मिळाला आहे. सप्ताहाच्या सांगता दिनी श्रीची पालखीची नगरप्रदक्षणा काढण्यात येते. यानिमित्ताने श्री रामलिंगेश्र्वर मंदिरापासून आज सकाळी या दिंडीचा शुभारंभ झाला. खडक हनुमान, सुभाष चौक, गंज गोलाई, हनुमान चौक, महात्मा गांधी चौक, औसा हनुमानमार्गे या दिंडीचा समारोप श्री रामलिंगेश्र्वर मंदिराजवळ करण्यात आला. या दिंडीत भाविकांनी मोठ्या उत्स्फुर्तपणे सहभाग नोंदविला होता. विशेष म्हणजे पारंपारिक वेशभूषेत महिलांनी डोक्यावर कळस घेवून भक्तीभावाने दिंडीत सहभाग घेतला होता. तसेच हरिरामाचा गजर करणाजया वारकजयांसह बाल वारकरी व अश्र्वावर रुढ झालेल्या तरुणी या दिंडीचे प्रमुख आकर्षण होते. ढोल, बँडपथक तसेच लातूर शहर परिसरातील भाविक व नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला होता.

नगर प्रदक्षिणा मार्गावर व्यापाजयांसह नागरिकांनी दिंडीचे स्वागत करण्यासाठी ठिकठिकाणी रांगोळी काढून दिंडीवर पुष्पवृष्टी करण्यात येत होती. गंजगोलाई परिसरातील व्यापाजयांनी दिंडीत सहभागी झालेल्या भाविकांसाठी अल्पोपहार व पिण्याच्या पाण्याची सोय केली होती. दिंडीदरम्यान कायदा व सुव्यवस्था आबाधित ठेवण्यासाठी वाहतूकीची कोंडी सोडविण्यासाठी पोलिस बंदोबस्तही ठेवण्यात आला होता.

## संक्षिप्त वृत्त...

### शिवसेना उबाठा पदाधिकारी निवडी संदर्भात संपर्क प्रमुखांचा पाथरी,जिंतूर विधानसभा मतदार संघात दौरा

**पाथरी,/प्रतिनिधी :**शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या परभणी जिल्ह्यातील संघटनात्मक बांधणीसाठी जिल्हा संपर्कप्रमुख प्रदिपकुमार खोपडे यांचा २ दिवसांचा दौरा आयोजित करण्यात आला आहे. हा दौरा पाथरी आणि जिंतुर विधानसभा मतदारसंघातील रिक्त पदाधिकारी पदांच्या नियुक्तीच्या अनुषंगाने होणार असल्याची माहिती शिवसेना जिल्हाप्रमुख रविंद्र धर्मे यांनी प्रसिद्धीपत्रका व्दारे दिली आहे. शिवसेना परभणी जिल्हाप्रमुख रविंद्र धर्मे यांनी ३१ जुलै रोजी दिलेल्या पत्रकानुसार, हा दौरा १ आणि २ ऑगस्ट २०२६ रोजी होणार आहे.शनिवार १ ऑगष्ट रोजी जिंतुर सकाळी ११ वा. संपर्क कार्यालय, जिंतुर परभणी ग्रामीण दुपारी २ वा. मा. आ. मिराताई रेंगे यांचे निवासस्थान, परभणी रविवार २ ऑगष्ट रोजी सोनपेठ सकाळी ११ वा. शिवसेना संपर्क कार्यालय, सोनपेठ. दुपारी २ वाजता पाथरी/मानवत शासकीय विश्रामगृह, पाथरी. या दौऱ्यात जिल्हा संपर्कप्रमुख प्रदिपकुमार खोपडे यांच्यासोबत आ. डॉ. राहुल पाटील, माजी आ. सौ. मिराताई रेंगे, पाथरी विधानसभा प्रमुख कल्याणराव रेंगे, जिंतुर विधानसभा प्रमुख रामनाना खराबे, सहसंपर्कप्रमुख पाथरी प्रा. डॉ. पंढरीनाथ धोंडगे आणि सहसंपर्कप्रमुख जिंतुर गंगाप्रसाद घुगे उपस्थित राहणार आहेत. जिल्हाप्रमुख रविंद्र धर्मे यांनी सर्व उपजिल्हाप्रमुख, तालुकाप्रमुख, शहरप्रमुख, तालुका संघटक, उपतालुका प्रमुख, उपशहर प्रमुख, सर्कल प्रमुख, उपसर्कल प्रमुख, माजी-आजी जि.प. सदस्य, पं.स. सदस्य, शाखा प्रमुख आणि बुथ प्रमुखांना या बैठकींना उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे. पाथरी आणि जिंतुर मतदारसंघातील पक्ष संघटना अधिक मजबूत करणे आणि रिक्त असलेली पदे भरणे हा या दौऱ्याचा मुख्य उद्देश असल्याचे पत्रकात म्हटले आहे.

### पालम येथे ०६ ऑगस्ट रोजी रोजगार मेळाव्याचे आयोजन

**परभणी,/प्रतिनिधी:** जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, परभणी व माधवराव पाटील कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पालम आणि अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ गुरुपीठ, त्र्यंबकेश्वर (दिंडोरी प्रणित), नाशिक, शाखा पालम यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ०६ ऑगस्ट, २०२६ रोजी सकाळी ८.३० ते दुपारी १२.३० या कालावधीत पालम येथील माधवराव पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय येथे 'पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा' आयोजित करण्यात आला आहे.

मेळाव्यात दहावी, बारावी, आयटीआय, डिप्लोमा, पदवी तसेच इतर शैक्षणिक पात्रता धारक उमेदवारांची क्षेत्र अधिकारी (), क्षेत्र अधिकारी (), ट्रेनी ऑपरेटर, विमा सल्लागार, विमा सखी, लाईफ मित्र, कार्यालयीन कर्मचारी (ऑफिस स्टाफ) आदी पदांसाठी मुलाखतीद्वारे निवड करण्यात येणार आहे. या पदांसाठी प्रारंभीचे मासिक वेतन रु. १० हजार ते रु. २५ हजार इतके असून अनुभवाच्या आधारे वेतनात वाढ होऊ शकते.

रोजगार मेळाव्यात सहभागी होण्यासाठी उमेदवारांनी महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर नावनोंदणी करावी असे आवाहन करण्यात आलेआहे.

# महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत २० कोटींच्या २८ विकासकामांना मंजुरी

## पाणीपुरवठा, आरोग्य, घरकुल व विकासकामांवर सविस्तर चर्चा

**मोहन धारासूरकर**

**परभणी ,/प्रतिनिधी:-** महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा बुधवारी (दि.२९) महापौर सय्यद इकबाल सय्यद खाजा यांच्या अध्यक्षतेखाली बी. रघुनाथ सभागृहात पार पडली. सभेत २० कोटींच्या २८ विकासकामांना मंजुरी देण्यात आली. त्यामध्ये शहरातील पाणीपुरवठा, आरोग्य सुविधा, घरकुल योजना, रस्ते, उद्याने, मोकाट कुत्र्यांचा प्रश्न, एलईडी प्रकाशयोजना तसेच विविध विकासकामांवर सविस्तर चर्चा होऊन महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले.

या सभेस उपमहापौर गणेश देशमुख, आयुक्त नितीन नार्वेकर, नगरसचिव विकास रत्नपारखी, स्थायी समिती सभापती प्रतिभाताई अतुल सरोदे, गटनेते तसेच नगरसेवक आणि अधिकारी उपस्थित होते.

सभेच्या प्रारंभी दिल्लीतील जंतर-मंतर येथे घडलेल्या घटनेतील मृत विद्यार्थ्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर नगरसेविका गिरिजा आजेगावकर यांनी शहरातील विहिरींची स्वच्छता केल्याबद्दल महापौर, उपमहापौर, आयुक्त, उपायुक्त तुकाराम कदम, स्वच्छता निरीक्षक श्रीकांत कुर्रा आणि प्रल्हाद देशमाने यांचे अभिनंदन करणारा ठराव मांडला.

यावेळी शहरात सलग नऊ दिवस पाणीपुरवठा विस्कळीत राहिल्याचा मुद्दा गटनेत्या तिरुमला खिल्लारे, गिरिजा आजेगावकर, सपना जुकटे आणि रितेश जैन यांनी उपस्थित केला. पाणीपुरवठा विभागाचे प्रमुख तन्वीर बेग यांनी तांत्रिक अडचणीमुळे ही परिस्थिती निर्माण झाल्याचे स्पष्ट केले. धार रोड आणि आनंदनगर येथील जलवाहिनीतील गळती तातडीने दुरुस्त करण्याचे निर्देश प्रशासनाकडून देण्यात आले.

जन्म-मृत्यू प्रमाणपत्रांतील नावांच्या त्रुटींमुळे नागरिकांना होणाऱ्या अडचणींचाही मुद्दा सभेत गाजला. यावर आयुक्त नितीन नार्वेकर यांनी प्रभाग समिती 'अ', 'ब' आणि 'क' अंतर्गत स्वतंत्र जन्म-मृत्यू नोंदणी कार्यालये सुरू करण्यात येणार असल्याची माहिती दिली. महापौर सय्यद इकबाल यांनी या कार्यालयांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याची घोषणाही केली.

नगरसेविका अश्विनी अमोल जाधव यांनी कार्डियाक ॲम्ब्युलन्स दुरुस्त करून नागरिकांच्या सेवेत उपलब्ध करण्याची मागणी केली. नगरसेवक अक्षय देशमुख यांनी कार्डियाक ॲम्ब्युलन्स आणि शववाहिका नाममात्र दरात उपलब्ध करून देण्याची सूचना केली. यावर महापौरांनी वाहन ज्या अंतरासाठी जाईल त्या प्रमाणात इंधनाचा खर्च संबंधित लाभार्थ्यांनी करावा, असे सांगितले.

खंडोबा बाजार प्राथमिक आरोग्य केंद्र परिसरातील रस्त्याची दुरुस्ती, शहरातील खड्डे बुजविणे, राजगोपालाचारी व नेहरू उद्याने खासगी तत्त्वावर न देणे, मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त, शहरातील सर्व विद्युत खांबांवर एलईडी दिवे बसविणे तसेच सण-उत्सवाच्या काळात प्रकाशव्यवस्था सक्षम करण्याबाबत विविध सदस्यांनी मागण्या केल्या. स्टेडियम परिसरातील प्रस्तावित राजमाता अहिल्यादेवी होळकर स्मारकाच्या जागेवरील अतिक्रमण तातडीने हटविण्याची मागणी गटनेते दिलीप ठाकूर यांनी केली. संबंधित विभागाला तातडीने कारवाईचे निर्देश देण्यात आल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले.

सभेत मागील सभेचे इतिवृत्त मंजूर करण्यात आले. तसेच रोजंदारीवरील कर्मचाऱ्यांना नियमित सेवेत कायम करण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली. 'महानगरपालिका क्षेत्रात मूलभूत सोयी-सुविधांच्या विकासासाठी विशेष तरतूद २०२६-२७' या योजनेअंतर्गत २० कोटी रुपयांच्या २८ विकासकामांना मंजुरी देण्याचा ठराव स्थायी समिती सभापती प्रतिभाताई अतुल सरोदे यांनी मांडला. यावेळी अर्जुन सामाले यांनी प्रभाग क्रमांक १० मध्येही विकासकामांचा समावेश करण्याची मागणी केली.

सभेत सभागृहनेते सय्यद समी उर्फ माजू लाला, गटनेते विजय जामकर, डॉ. केदार खटींग, श्याम खोबे, शरफोद्दीन सिद्दिकी, शेख रईस, तब्बसुम वसीम शेख, गणेश टाक, व्यंकट डहाळे, सुशीला थोरात, अद्वैत सांगळे, सुलोचना भालेराव यांच्यासह अनेक नगरसेवकांनी विविध विषयांवर चर्चा करून नागरिकांच्या प्रश्नांकडे प्रशासनाचे लक्ष वेधले.

'हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे नागरी लोककल्याण अभियान' राबविणार...

सभेत 'हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे नागरी लोककल्याण अभियान' प्रभावीपणे राबविण्यासाठी महापौर, उपमहापौर, स्थायी समिती सभापती, आयुक्त आणि सर्व गटनेत्यांची समिती गठित करण्यास मंजुरी देण्यात आली.

## चांदजजवळ एसटी बस पलटली

**जिंतूर, /प्रतिनिधी-** जिंतूर-परभणी मार्गावरील चांदज गावाजवळ गुरुवारी सकाळी एसटी बसचा अपघात होऊन २६ प्रवासी जखमी झाल्याची घटना घडली. यापैकी दोन ते तीन प्रवाशांची प्रकृती गंभीर असून त्यांना पुढील उपचारासाठी जिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, छत्रपती संभाजीनगरहून जिंतूर येथे आलेली एसटी बस ३० जुलै गुरुवारी,सकाळी सुमारे ९ वाजता जिंतूरहून परभणीकडे ४१ प्रवाशांना घेऊन निघाली होती. चांदज गावाच्या अलीकडे समोर अचानक वाहन आल्याने बसचालकाने जोरात ब्रेक लावला. त्यामुळे बसवरील नियंत्रण सुटून ती रस्त्याच्या कडेला असलेल्या शेतात जाऊन पलटी झाली.

या अपघातात २६ प्रवासी जखमी झाले. जखमींना तातडीने जिंतूर ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यापैकी दोन ते तीन जणांची प्रकृती गंभीर असल्याने प्राथमिक उपचारानंतर त्यांना जिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले. घटनेची माहिती मिळताच पोलीस निरीक्षक नामदेव रेड्डी यांनी सहकाऱ्यांसह घटनास्थळी धाव घेतली. तसेच जिंतूर ग्रामीण रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी डॉ. इंगळे, डॉ. खाडे, डॉ. भुत्ते, डॉ. बामणे, डॉ. परिहार आदींनी जखमींवर तातडीने उपचार केले.ाची माहिती मिळताच घटनास्थळी तसेच ग्रामीण रुग्णालयात नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. अपघाताचे नेमके कारण शोधण्याचे काम सुरू असून अधिक तपास संबंधित यंत्रणांकडून करण्यात येत आहे.



## संस्थांचे बदल अर्ज निकालांच्या प्रतिक्षेत परभणी धर्मादाय कार्यालयातील प्रकार; नोटीस काढूनही निपटारा नाही

**सोनपेठ, /प्रतिनिधी-** प्रत्येक पाच वर्षांनी सार्वजनिक संस्थांना निवडणूक प्रक्रिया पूर्ण करुन सहाय्यक धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडून त्यास अंतिम मान्यता घेणे आवश्यक असते.यासाठी अनेक संस्था व वाचनालयांनी गेली दहा वर्षांपासून दाखल केलेले बदल अर्जाचे प्रस्ताव निकालाविना परभणी येथील सहायक धर्मादाय आयुक्त कार्यालयात धुळखात पडून आहेत.

या प्रकरणी चेंज रिपोर्ट साठी लागणारी सर्व प्रक्रिया पूर्ण करून अनेक वर्षे खेटे मारुनही निकाल मिळत नसल्याने विश्वतांतून नाराजी व्यक्त केली जात आहे. धर्मादाय नोंदणी झालेल्या समाजसेवी संस्था, सार्वजनिक ग्रंथालये, सेवाभावी संस्था, मंदिर ट्रस्ट, व्यायाम शाळा, क्रीडा मंडळ, अनाथाश्रम , वृद्धाश्रम यांसारख्या विविध प्रकारच्या संस्थांची नोंदणी ही धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडे होत असते.नोंदणी केलेल्या प्रत्येक संस्थांची निवडणूक ही दर पाच वर्षांनी घेणे अनिवार्य असते.निवडणूक प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर संस्थांनी झालेला बदल संदर्भात विहित नमुन्यातील बदल अर्ज धर्मादाय आयुक्त कार्यालयात दाखल करावा लागतो.तदनंतर त्या अर्जावरील बदल केलेल्या जुन्या सदस्यांना नोटीस काढून बोलावले जाते. वारंवार नोटीस मिळून ही सदस्य धर्मादाय आयुक्त यांच्या समोर हजर राहून आपले म्हणणे मांडत नसतील तर संबंधित धर्मादाय आयुक्त त्या बदल केलेल्या नवीन सदस्यांचे आर्जावर सुनावणी घेऊन त्यास अंतिम मंजुरी देत असतात. परंतु गेल्या अनेक वर्षापासून परभणी येथील सहाय्यक धर्मादाय आयुक्त कार्यालयांमध्ये अनेक संस्थांनी दाखल केलेले बदल अर्ज निकाला विना धुळखात पडून आहेत. विहित नमुन्यात अर्ज दाखल करूनही सदरील अर्ज निकालाच्या प्रतीक्षेत कार्यालयात पडून आहेत.आहेत. प्रत्येक संस्था चालकांनी विहित नमुन्यात जुन्या विश्वस्तांना नोटीस काढण्यासाठी पोस्टातील तिकीट व लिफाफा धर्मादाय आयुक्त कार्यालयात आणून दिले आहेत. त्यानंतर कार्यालयाकडून संबंधितांना नोटीसही बजावण्यात आलेल्या आहेत. परंतु प्रत्येक तारखेला सहाय्यक धर्मादाय आयुक्त यांचा सदस्य हजर करण्याचा रेटा पाहून संस्थाचालक आता वैतागले आहेत. वारंवार नोटीसा काढूनही जुने सदस्य कार्यालयात येत नाहीत, परिणामी त्यांचे म्हणणे मांडत नाहीत. तर अखेर चूक तरी कोणाची? बदल अर्ज दाखल करणाराची की, बदल अर्जांना मंजुरी न देणाराची? असा सवाल नागरिकांतून उपस्थित केला जात आहे. प्रत्येक महिन्याला बदल अर्ज दाखल करणारे संस्था प्रमुख हे परभणी येथील सहाय्यक धर्मादाय आयुक्त कार्यालयात मागील अनेक वर्षापासून खेटे मारताना दिसत आहेत.

परंतु त्यांच्या अर्जांना मंजुरी मिळत नसल्याने अनेकांनी वैतागून आता खेटे मारणेही बंद केले आहे. त्यामुळे मागील अनेक दिवसापासून मंजुरीच्या प्रतीक्षेत असलेल्या बदल अर्जांना सहाय्यक धर्मादाय आयुक्त यांनी तात्काळ मंजुरी देण्याची मागणी आता संस्थाचलकांतून जोर धरू लागली आहे.

### हिवरखेडा शाळेचे यश

**परभणी,/प्रतिनिधी**

येलदरी पासून जवळच असलेल्या,हिवरखेडा येथील जिल्हा परिषद शाळेच्या इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांनी यंदाच्या स्कॉलरशिप परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

शाळेचा ६५ टक्के निकाल लागला असून ८ पैकी ५ विद्यार्थी पात्र ठरले आहेत. शाळेतील अर्पिता संतोष वलेकर हीने शाळेत प्रथम क्रमांक पटकावला आहे. गुणवत्ता यादीत सिद्धिका संतोष माने ,शौर्य संतोष चिभडे, श्रीगणेश संतोष हुलगुंडे व अभिषेक मारोती कऱ्हाळे या विद्यार्थ्यांनी स्थान मिळविले आहे.

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल मार्गदर्शक शिक्षक तथा मुख्याध्यापक श्री संतोष चिभडे, सह.शिक्षक श्री गौतम हजारे यांचे व विद्यार्थ्यांचे उपस्थिती होती.

## करारातील अटींचा भंग; नागरळ प्रा. इंडिया कंपनीवर कारवाईची मागणी

### जिंतूर नगरपरिषद सदस्यांचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**जिंतूर, /प्रतिनिधी-** जिंतूर नगरपरिषदेने शहरातील घनकचरा व्यवस्थापन व स्वच्छतेचे काम नागरळ प्रा. इंडिया या कंपनीला कंत्राटाद्वारे दिले असले तरी संबंधित कंपनीकडून करारातील अटींचे सर्रास उल्लंघन होत असल्याचा गंभीर आरोप नगरसेवक बाळासाहेब भांबळे यांनी केला आहे. या प्रकरणी कंपनीवर तात्काळ कठोर कारवाई करून कंत्राट रद्द करावे, तसेच कंपनीला काळ्या यादीत (ब्लॅकलिस्ट) टाकण्यात यावे,अशी मागणी त्यांनी दिनांक २८ जुलै रोजी जिल्हाधिकारी परभणी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, शहरातील कचरा वेळेवर उचलला जात नसल्याने अनेक ठिकाणी कचऱ्याचे ढिगारे साचले आहेत. रस्ते, नाल्या व सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छतेचे प्रमाण वाढल्यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. आवश्यक मनुष्यबळ, यंत्रसामग्री व वाहनांची उपलब्धता नसल्याने शहरातील स्वच्छता व्यवस्थेचा बोजवारा उडाला असून नागरिकांना दुर्गंधी व साथीच्या रोगांचा धोका निर्माण झाला आहे. संबंधित कंपनीने करारातील अटींचे पालन न करता निष्काळजीपणा केल्याचा आरोप करत नगरसेवक बाळासाहेब भांबळे यांनी या संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी केली आहे. चौकशीत दोषी आढळल्यास कंपनीवर आर्थिक दंडात्मक कारवाई करावी, संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करून त्यांच्यावरही कारवाई करावी, तसेच कंत्राट तात्काळ रद्द करून पर्यायी व्यवस्था करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

याशिवाय भविष्यात अशा प्रकारच्या घटना टाळण्यासाठी स्वच्छता व्यवस्थेवर नियमित देखरेख ठेवावी, संबंधित अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष पाहणी करून नागरिकांच्या तक्रारींची तातडीने दखल घ्यावी, अशी सूचनाही निवेदनात करण्यात आली आहे.

यावेळी नगरसेवक अशोक बंड, जाबेर मुल्ला,करीम लाला,पिंटू डोंबे हे उपस्थित होते या निवेदनामुळे जिंतूर शहरातील स्वच्छता व्यवस्थेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून, प्रशासन आता संबंधित कंत्राटदाराविरुद्ध कोणती भूमिका घेते याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्यास उत्स्फूर्त प्रतिसाद

**जिंतूर ,/प्रतिनिधी-:** जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, परभणी व श्रीमती शकुंतलाबाई बोर्डीकर वरिष्ठ महाविद्यालय, जिंतूर यांच्या आणि अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ गुरुपीठ त्र्यंबकेश्वर दिंडोरी प्रणित नाशिक शाखा जिंतूर संयुक्त विद्यमाने शुक्रवार, दि. ३१ जुलै २०२६ रोजी महाविद्यालयाच्या परिसरात पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. या रोजगार मेळाव्यात विविध क्षेत्रांतील १६ नामांकित आस्थापनांनी सहभाग नोंदविला. मेळाव्यास १७० सुशिक्षित बेरोजगार उमेदवार उपस्थित होते.

त्यापैकी १३६ उमेदवारांची प्राथमिक निवड, तर ९० उमेदवारांची अंतिम निवड करण्यात आली. त्यामुळे अनेक युवक-युवतींना रोजगाराची संधी उपलब्ध झाली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. खंडेराव भिसे, प्राचार्य, श्रीमती शकुंतलाबाई बोर्डीकर वरिष्ठ महाविद्यालय, जिंतूर हे होते. कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून मिटकुळे सर, प्राचार्य, श्रीमती शकुंतलाबाई बोर्डीकर वरिष्ठ महाविद्यालय, जिंतूर यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक समाधान किरवले, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन अधिकारी यांनी केले. रोजगार मेळाव्याच्या यशस्वी आयोजनासाठीकार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. यामध्ये योगेश येडपलवार (कनिष्ठ कौशल्य विकास मार्गदर्शन अधिकारी), राहुल गजभारे, सचिन चव्हाण, राहुल काळे, प्रियंका कणके, शीला भालेराव, आणि विवेक भारती, अमित घुगे, किरण गजमल यांचा सक्रिय सहभाग होता. रोजगार मेळाव्यामुळे परिसरातील सुशिक्षित बेरोजगार युवक-युवतींना रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध झाल्याने या उपक्रमाचे सर्व स्तरांतून स्वागत करण्यात आले.




### आजाराला कंटाळून उंदीर मारण्याचे औषध प्राशन केल्याने ऑटोचालकाचा मृत्यू

**परभणी,/प्रतिनिधी :** सोरायसिसच्या आजाराला कंटाळून ऑटो चालक दत्ता नामदेव मगर (वय ४६, रा. राजेंद्रगिरी नगर) यांनी उंदीर मारण्याचे विषारी रसायन प्राशन केले. उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. या प्रकरणी नवा मोंढा पोलिस ठाण्यात २७ जुलै रोजी अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

मयताचे भाऊ बंडू मगर यांनी याबाबत नवा मोंढा पोलिस ठाण्यात याबाबत खबर दिली आहे. दत्ता मगर यांनी सोरायसिसच्या आजाराला कंटाळून उंदीर मारण्याचे विषारी रसायन अंडाभुर्जीमध्ये टाकून प्राशन केले. त्यांना उपचारासाठी परभणी येथील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. परंतु, उपचारादरम्यान २७ जुलै रोजी दुपारी अडीचच्या सुमारास त्यांचा मृत्यू झाला. प्रकरणाचा तपास पोहेकॉ. सचिन बोरसुडुकर करीत आहेत.

# दोन महिन्यांच्या प्रतिक्षेनंतर कयाधू नदीला पूर, नागरिकांमध्ये समाधान





**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३१ जुलै**

मागील दोन महिन्यांपासून कोरड्या ठाण पडलेल्या कयाधू नदीला अखेर हिंगोली जिल्ह्यात गेल्या दोन दिवसांपासून सुरू असलेल्या दमदार पावसामुळे पहिल्यांदाच मोठे पाणी आले आहे. नदीला पाणी आल्याचे समजताच जिल्हावासीयांनी आनंद व्यक्त करत नदीपात्राकडे धाव घेतली. मात्र, पुराचे पाणी पाहण्यासाठी पुलावर नागरिकांनी प्रचंड गर्दी केल्याने काही काळ वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली होती. नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत होते.

कयाधू नदी प्रवाही झाल्याचे पाहून अनेक भाविकांनी नदीकाठी जाऊन पूर शांत व्हावा आणि जिल्ह्यात समृद्धी यावी, या भावनेने पात्राची पूजा केली. मात्र, दुसरीकडे काही बेजबाबदार नागरिकांनी आपल्या घरातील कचरा थेट वाहत्या पाण्यात आणून टाकण्यास सुरुवात केल्याचे विदारक चित्र पाहायला मिळाले. एका बाजूला नदीला निसर्गाचे वरदान मानून पूजा केली जात असताना, दुसऱ्या बाजूला तिला प्रदूषित करण्याचे प्रकार घडत असल्याने पर्यावरणप्रेमींतून संताप व्यक्त होत आहे.

पूर पाहण्यासाठी आलेल्या तरुणाईमध्ये तर सेल्फी काढण्याची स्पर्धाच लागल्याचे दिसून आले. पुराच्या पाण्याच्या अगदी जवळ जाऊन, पुलाच्या कठड्यावर उभे राहून युवक धोकादायक पद्धतीने मोबाईलमध्ये सेल्फी आणि रील्स काढताना दिसून आले. थोडासा पाय घसरल्यास मोठा अपघात घडण्याची शक्यता असतानाही तरुण वर्ग या धोक्याकडे दुर्लक्ष करत होता.

कळमनुरी तालुक्यातील सोडेगाव येथील पूलावरून पाणी जात असल्यामुळे उमरा ते बोल्डा हा रस्ता वाहतुकीसाठी बंद झाला. हिंगोली तालुक्यातील समगा येथून वाहणाऱ्या कयाधू नदीवर असलेल्या पूलावरून पाणी जात असल्यामुळे हा रस्ता बंद झाला असून अनेक गावांना याचा फटका बसला. शेती पिकांमध्ये नदीचे पाणी घुसल्यामुळे शेतकऱ्यांचे सोयाबीन, तूर व इतर पिकांना त्याचा फटका बसल्याचे शेतकरी सांगत आहेत.

दीर्घ प्रतीक्षेनंतर कयाधू नदी प्रवाही झाल्याचा आनंद निश्चितच मोठा आहे. परंतु, पुराचे पाणी पाहताना पुलावर गर्दी करून वाहतुकीला अडथळा निर्माण करू नका. धोकादायक ठिकाणी जाऊन सेल्फी काढणे टाळा आणि पवित्र कयाधू नदीत कचरा टाकून तिला प्रदूषित करू नका. प्रशासनाच्या सूचनांचे पालन करून स्वतःचा जीव सुरक्षित ठेवा.

# कयाधू नदीच्या पूलावर खड्ड्यांचे साम्राज्य, वाहनचालकांची कसरत

## लोकप्रतिनिधी, प्रशासनाने लक्ष देण्याची मागणी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३१ जुलै**

हिंगोली शहरातून जाणाऱ्या कयाधू नदीवरील पुलाची अत्यंत दरावस्था झाली असून पुलावर ठिकठिकाणी खड्ड्यांचे साम्राज्य पसरले आहे. या खड्ड्यांमुळे वाहनचालकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. सध्या कयाधू नदीला पूर आल्यामुळे पाणी पाहण्यासाठी पुलावर नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. मात्र, पुलावरील खड्ड्यांमध्ये साचलेले गढूळ पाणी वाहनांमुळे नागरिकांच्या थेट अंगावर उडत असल्याने उपस्थित नागरिकांतून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

मागील काही दिवसांत झालेल्या पावसामुळे पुलावरील डांबरीकरण पूर्णपणे उखडले असून मोठमोठे खड्डे पडले आहेत. पुराचे पाणी पाहण्यासाठी येणारे नागरिक आणि पुलावरून ये-जा करणारी वाहने यामुळे येथे दररोज वाहतुकीची कोंडी होत आहे. खड्ड्यांचा अंदाज न आल्यामुळे अनेक दुचाकीचालक घसरून पडत असून लहान-मोठे अपघात रोजचेच झाले आहेत. कयाधू नदीवरील सध्याचा पूल अत्यंत जुना आणि अरुंद झाला आहे. वाढती रहदारी आणि पुराच्या वेळी होणारी गर्दी लक्षात घेता आता या ठिकाणी नवीन आणि रुंद पूल उभारण्याची अत्यंत गरज असल्याचे मत स्थानिक नागरिकांनी व्यक्त केले आहे. पुलावरील खड्डे तात्काळ बुजवून वाहनचालक व पादचाऱ्यांना दिलासा द्यावा, तसेच या मार्गावर नव्या पुलाच्या मंजुरीसाठी तातडीने पाठपुरावा करावा, अशी जोरदार मागणी हिंगोलीतील नागरिकांकडून केली जात आहे. आता तरी संबंधित प्रशासन आणि लोकप्रतिनिधी या समस्येकडे गांभीर्याने लक्ष देणार का, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

# तृतीय पंथीयांना रोजगार, शासकीय योजनांचा लाभ देण्यास शासन कटीबध्द- राहुल गुप्ता

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३१ जुलै**

राज्य शासनाने तृतीयपंथीयांच्या सर्वांगीण सक्षमीकरणासाठी २०२६ च्या सुधारणा अधिनियमाची अंमलबजावणी केली असून, तृतीयपंथीयांना प्रमाणपत्र उपलब्ध करून देण्यात आले आहे. तसेच त्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयातील आपले सरकार सेवा केंद्र चालविण्याची संधी देण्यात येणार असून, यामुळे त्यांना स्वावलंबी होण्यास मदत होईल. शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभही त्यांच्यापर्यंत पोहोचविण्यासाठी प्रयत्न केले जातील. तरुणांनी तृतीयपंथीयांचा इतिहास जाणून घेऊन त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी केले.




जिल्हा नियोजन समितीच्या सभागृहात सामाजिक न्याय विभाग आणि सप्तरंग सेवाभावी संस्थेच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'तृतीयपंथीय संवेदनशीलता जनजागृती कार्यशाळे' मध्ये अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते.

यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड, निवासी उपजिल्हाधिकारी अभिमन्यू बोधवड, उपजिल्हा निवडणूक अधिकारी प्रगती चोंडेकर, पोलीस उपअधीक्षक डी. जी. केंद्रे, सामाजिक न्याय विभागाच्या सहायक आयुक्त गीता गुठ्ठे, महाराष्ट्र राज्य तृतीयपंथी कल्याण मंडळाच्या सहउपाध्यक्षा डॉ. सान्वी जेटवाणी, रेखाताई देवकते, विनय खरटमोल आदी मान्यवर उपस्थित होते.

मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड यांनी प्रत्येक शासकीय कार्यालयात दिव्यांगांप्रमाणे तृतीयपंथीयांसाठीही स्वतंत्र स्वच्छतागृहाची सुविधा उपलब्ध व्हावी, तसेच त्यांना घरकुल मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, असे सांगितले. तृतीयपंथीयांना स्वावलंबी करण्यासाठी सर्वांनी जबाबदारी स्वीकारण्याची गरज असून, समाजातील त्यांच्याविषयीची मानसिकता बदलण्यासाठी आरोग्य विभागामार्फत व्यापक जनजागृती आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

मार्गदर्शन करताना डॉ. सान्वी जेटवाणी यांनी तृतीयपंथीयांचा इतिहास, त्यांच्यासमोरील सामाजिक व आर्थिक समस्या, स्मशानभूमी व घरकुलासारखे मूलभूत प्रश्न यावर प्रकाश टाकला. तसेच तृतीयपंथीयांसाठी शासनाने लागू केलेल्या अधिनियमातील तरतुदींची माहिती देत समाजाची विचारधारा आणि सकारात्मक दृष्टीकोन विकसित करण्याची आवश्यकता व्यक्त केली. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात सहायक आयुक्त गीता गुठ्ठे यांनी कार्यशाळेची भूमिका विशद केली. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते महापुरुषांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून व दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. या कार्यशाळेला विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी, तृतीयपंथीय व्यक्ती, विद्यार्थी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पूराच्या पाण्यात कार गेली वाहून

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३१ जुलै**

सेनगाव तालुक्यातील कापडसिंदगी परिसरात गुरूवारी रात्रीपासून मुसळधार पाऊस पडल्यामुळे हत्ता ते तळणी या महामार्गावरील पूलाखालून नदीचे पाणी वाहत आहे. या पाण्याचा अंदाज न आल्याने कार चालकाने या पूराच्या पाण्यातून रस्ता ओलांडण्याचा प्रयत्न केला परंतु पाण्याच्या वेगात कार वाहून गेली असून चालकाने धैर्य राखून कारचा दरवाजा उघडून त्याचा जीव वाचविला आहे.

## संक्षिप्त वृत्त

### मागील २४ तासांत सरासरी २० मिमी पाऊस

हिंगोली- जिल्ह्यात गेल्या २४ तासात सरासरी २०.१ मिलीमीटर पावसाची नोंद झाली असून, कळमनुरी तालुक्यात सर्वात जास्त ३२.७ मि.मी. पाऊस झाला आहे. तर सेनगाव तालुक्यात सर्वात कमी ८.८ मि.मी. पाऊस पडला आहे. जिल्ह्यात आज सकाळपर्यंत नोंदला गेलेला तालुकानिहाय सरासरी पाऊस पुढीलप्रमाणे असून कंसातील आकडेवारी १ जूनपासून आजपर्यंत झालेल्या पावसाची आहे. हिंगोली १५.७ (३६३.३), कळमनुरी ३२.७ (३४६.५), वसमत २०.८ (२६९.१), औंढा नागनाथ २४.४ (२८९.९) आणि सेनगाव तालुक्यात ८.८ (२४६.२) मि. मी. पाऊस पडला आहे. सर्व आकडेवारी मिलीमीटर परिमाणात आहे. हिंगोली जिल्ह्यात दिनांक १ जून २०२६ ते ३० जुलै, २०२६ पर्यंत सरासरी ३०४.५ मिलीमीटर पाऊस पडला आहे. त्याची टक्केवारी ३८.३ अशी आहे.

### हिंगोली जिल्ह्यासाठी रेड अलर्ट

हिंगोली- प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र, मुंबई यांनी आज गुरुवारी जारी केलेल्या हवामान सूचनेनुसार हिंगोली जिल्ह्यासाठी आज रेड अलर्ट घोषित करण्यात आला आहे. तसेच जिल्ह्यात तुरळक ठिकाणी मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर सर्व संबंधित यंत्रणांनी सतर्क राहून आवश्यक ती खबरदारी घ्यावी, तसेच नागरिकांनीही सुरक्षिततेचे नियम काटेकोरपणे पाळावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी केले आहे. जिल्ह्यातील कमी उंचीच्या पुलांवर दीड ते दोन फूट उंचीने पाणी वाहत असल्यास अशा पुलांवरून पायी अथवा वाहनाने जाण्याचे धाडस करू नये. तसेच नदीकाठावरील पर्यटनस्थळांवर निर्धारित सुरक्षित मर्यादेपलीकडे जाऊ नये, असेही त्यांनी स्पष्ट केले आहे. नैसर्गिक आपत्तीच्या काळात प्रशासनाच्या सूचनांचे पालन करणे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य असून, नियमांचे उल्लंघन करून स्वतःचा किंवा इतरांचा जीव धोक्यात घालणाऱ्या व्यक्तींवर पोलिस विभागामार्फत दंडात्मक कारवाई करण्यात येईल, असा इशाराही जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी दिला आहे. जिल्हा प्रशासनाने नागरिकांना अफवांवर विश्वास न ठेवता केवळ अधिकृत सूचना व इशारे यांच्यावरच विश्वास ठेवावा आणि आपत्कालीन परिस्थितीत प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन केले आहे.

### ग्रुप कमांडर अनुप बरबरे यांची शाळेला भेट



हिंगोली- ग्रुप कमांडर अनुप बरबरे यांनी सरजूदेवी भिकूलाल भारुका आर्य कन्या विद्यालय आणि माणिक स्मारक विद्यालयातील एन. सी. सी. कॅडेट्सना भेट देऊन त्यांच्याशी संवाद साधला. यावेळी कमांडिंग ऑफिसर कर्नल के दिलीप रेड्डी आणि किशोरी पाठक उपस्थित होत्या. यांच्यासह शाळेचे संचालक अनिलकुमार भारूका, मुख्याध्यापिका गुंडेकर, सोनल जैस्वाल यांची उपस्थिती होती.

# बालकांचे हक्क, संरक्षण व सर्वांगीण विकासासाठी बैठक

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३१ जुलै**

बालकांचे हक्क, संरक्षण आणि सर्वांगीण विकासासाठी गावपातळीवर सुरक्षित व बालस्नेही वातावरण निर्माण करण्याच्या उद्देशाने जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयांतर्गत जिल्हा बाल संरक्षण कक्ष आणि मिरॅकल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने दाटेगाव (ता. हिंगोली) ग्रामपंचायतीत विशेष बैठक घेण्यात आली.



'गाव बाल संरक्षण समिती'चे सक्षमीकरण करून दाटेगावला आदर्श 'बालस्नेही गाव' बनविण्याच्या दृष्टीने या बैठकीत विविध विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी शासकीय अधिकारी व मिरॅकल फाउंडेशनच्या प्रतिनिधींनी ग्रामपंचायतीला भेट देऊन गाव परिसरातील बालकांच्या परिस्थितीचा आढावा घेतला.

या बैठकीदरम्यान ग्रामस्थ, गाव बाल संरक्षण समितीचे सदस्य तसेच शाळा व्यवस्थापन समितीच्या पदाधिकाऱ्यांशी संवाद साधण्यात आला. बालकांचे शिक्षण, आरोग्य, सुरक्षितता, बालविवाह प्रतिबंध, बालमजुरी निर्मूलन तसेच शाळाबाह्य मुलांना पुन्हा शिक्षणाच्या प्रवाहात आणणे आदी विषयांवर चर्चा झाली. या बैठकीस जिल्हा कार्यक्रम अधिकारी सोनाली तिवाटणे, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी सरस्वती कोरडे, कायदा तथा परिविक्षा अधिकारी ॲड. अनुराधा पंडीत, सरपंच सौ. कन्हैयाकुमारी माने, पोलीस पाटील हनुमान प्रकाश माने, मुख्याध्यापक मोहन शहू, आशा सेविका वनिता भिसे, अंगणवाडी सेविका गोदावरी भिसे, बाळकिशन माने, पदाधिकारी, बाल संरक्षण समितीचे सदस्य व ग्रामस्थांनी या उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदवत दाटेगावला आदर्श 'बालस्नेही गाव' बनविण्याचा संकल्प व्यक्त केला.

# काँग्रेसच्या जिल्हा युवा कार्यकारणीची निवड, सरचिटणीसपदी शेख जुबेर

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३१ जुलै**



महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या वतीने हिंगोली जिल्हा काँग्रेस कमिटीची नूतन कार्यकारिणी नुकतीच जाहीर करण्यात आली आहे. या कार्यकारिणीमध्ये युवा नेतृत्व शेख जुबेर शेख युसुफ यांची हिंगोली जिल्हा काँग्रेस कमिटीच्या जिल्हा सरचिटणीसपदी निवड करण्यात आली आहे. त्यांच्या या निवडीमुळे जिल्ह्यातील युवक कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण पसरले आहे.

शेख जुबेर यांनी गेल्या अनेक वर्षांपासून काँग्रेस पक्षाच्या विचारांशी प्रामाणिक राहून सामाजिक व राजकीय क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले आहे. युवकांचे प्रश्न मांडणे, नागरिकांच्या अडीअडचणी सोडवणे आणि पक्षात संघटन मजबूत करण्यासाठी त्यांनी मोलाचे योगदान दिले आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेत प्रदेश काँग्रेस कमिटीने त्यांच्यावर हिंगोली जिल्हा सरचिटणीस पदाची महत्त्वपूर्ण जबाबदारी सोपवली आहे.

शेख जुबेर यांच्या निवडीबद्दल हिंगोली जिल्हा काँग्रेस कमिटीचे जिल्हाध्यक्ष सतीश पाचपुते यांच्यासह वरिष्ठ नेत्यांनी आणि पदाधिकाऱ्यांनी त्यांचे पुष्पगुच्छ देऊन विशेष सत्कार व अभिनंदन केले. याप्रसंगी काँग्रेसचे वरिष्ठ नेते सुरेश अप्पा सराफ, विनायकराव देशमुख, शामराव जगताप, रमेश शिंदे, विशाल घुगे, वसमत तालुका अध्यक्ष ऋषिकेश देशमुख, वसमत शहराध्यक्ष शेख अलीमुद्दीन, हिंगोली शहराध्यक्ष मिलिंद उबाळे, युवक काँग्रेसचे प्रदेश सचिव बंटी नागरे, चेतन उबाळे, विद्यार्थी काँग्रेसचे शहराध्यक्ष पियुष सोनी यांच्यासह जिल्हा काँग्रेस कमिटीचे सर्व पदाधिकारी, विविध आघाड्यांचे अध्यक्ष आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी बोलतांना जिल्हा सरचिटणीस शेख जुबेर शेख युसुफ म्हणाले की, वरिष्ठ नेत्यांनी माझ्यावर दाखवलेला विश्वास सार्थ ठरवून, हिंगोली जिल्ह्यात काँग्रेस पक्ष अधिक मजबूत करण्यासाठी आणि युवकांचे प्रश्न तडीस नेण्यासाठी मी कटिबद्ध राहीन.

# गोवंश प्रकरणी उपनगराध्यक्ष सय्यद इमरान अली यांना सार्वजनिक पदावरून कमी करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३१ जुलै**




वसमत नगर परिषदेचे उपनगराध्यक्ष सय्यद इमरान नासीर अली यांच्या शेत गट क्रमांक ३२ मध्ये १९ गोवंश चारा पाण्याविना डांबून ठेवल्या प्रकरणी त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संबंधित प्रकरणात त्यांच्यावर कारवाई करून सार्वजनिक पदावरून कमी करण्याची मागणी विश्व हिंदू परिषद व बजरंग दलाच्यावतीने जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

निवेदनात नमुद करण्यात आले आहे की, महाराष्ट्रात गोहत्या बंदी कायदा असतांना सुध्दा अशा प्रकारे गोवंशाला गैरकायदेशीररित्या डांबून ठेवून त्यांच्यावर क्रुर अत्याचार करून त्यांची हत्या करण्यासाठी त्यांना उपाशीपोटी ठेवून हिमोग्लोबीन कमी करून ते दुधाळ नसल्याचे दाखविण्यासाठी सदरीत कृत्य केले जात आहे. यामध्ये उपनगराध्यक्षासारख्या जबाबदार व्यक्तीकडून अशा प्रकारे कायद्याचे उल्लंघन हो असेल तर ही बाब निश्चितच अपमानकारक व गंभीर आहे. सदरील प्रकरणातील दोषी सय्यद इमरान नासीर अली हे उपनगराध्यक्ष म्हणून वसमत नगर पालिकेमधील पदाधिकारी असून त्यांनी अशा प्रकारे मुक्या जनावरांना डांबून ठेवल्याने त्यांच्यावर कडक कार्यवाही करून उपनगराध्यक्ष पदावरून त्वरीत हटवावे अशी मागणी करण्यात आली आहे. निवेदनावर बद्री सारडा, प्रकाश सोनी, राजेंद्र हलवाई, कैलाश श्रीनाथ, दिपक निमोदीया, गणेश जाधव, प्रदीप धडवाई, नामदेव मस्के, प्रदीप उपाध्ये, लक्ष्मीनारायण सुरदुसे, अरूण कहार, सागर काठोळे, शुभम श्रीवास, अंकुश हनवते, राम हराळ, गणेश सोळंके, माधव आंबेकर, सचिन करवंदे, केशव सुरदुसे, सीमा हवालदार, विजय शिंदे, चंद्रशेखर लांडगे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# ब्रिजगोपाल तोष्णीवाल माहेश्वरी सभेचे राज्याध्यक्ष



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३१ जुलै**

महाराष्ट्र प्रदेश माहेश्वरी सभेच्या अध्यक्षपदी ब्रिजगोपाल तोष्णीवाल यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा हिंगोली येथे सत्कार करण्यात आला.

ब्रिजगोपाल तोष्णीवाल हे लगतच्या जिल्ह्यातील येलदरी जिंतूर येथील रहिवासी असून हिंगोली जिल्ह्यातील सेनगाव येथे तोष्णीवाल महाविद्यालयाचे अध्यक्ष आहेत. नुकत्याच संपन्न झालेल्या महाराष्ट्र प्रदेश माहेश्वरी सभेच्या राज्याच्या अध्यक्षपदी त्यांची निवड करण्यात आली हिंगोली येथे आले असताना त्यांचा सत्कार साई ऑफसेट येथे करण्यात आला. याप्रसंगी माहेश्वरी समाजातील प्रतिष्ठीत नागरिक, पदाधिकारी उपस्थित होते.



इस्लापूर- सलग झालेल्या दमदार पावसामुळे नांदेड जिल्ह्यातील प्रसिद्ध सहस्रकुंड धबधबा सध्या दिमाखात प्रवाहित होत असून, या निसर्गरम्य देखाव्याचा आनंद घेण्यासाठी जिल्ह्यासह राज्याच्या विविध भागांतून पर्यटक मोठ्या संख्येने दाखल होत आहेत. धबधब्याचे रौद्र-सुंदर रूप, उंचावरून कोसळणारे पाणी आणि हिरवाईने नटलेला परिसर पर्यटकांना अक्षरशः भुरळ घालत आहे. त्यामुळे सहस्रकुंड परिसरात दिवसेंदिवस पर्यटकांची गर्दी वाढत असून पर्यटनस्थळ पुन्हा एकदा गजबजून गेले आहे.

# पोर्टलवरील कर्जमाफीची रक्कमच अंतिम : जिल्हाधिकारी राहुल कर्डिले

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ३१ जुलै -**

राज्य शासनाच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६ अंतर्गत गावपातळीवर प्रसिद्ध झालेल्या याद्यांमधील थकबाकीची रक्कम आणि योजनेच्या पोर्टलवरील रक्कम यात तफावत आढळल्यास शेतकऱ्यांनी कोणताही संभ्रम न बाळगता पोर्टलवर दर्शविलेली रक्कमच अंतिम व ग्राह्य मानावी, असे स्पष्ट आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले आहे. तसेच पात्र शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरण (श-घधउ) आणि ग्रीस्टॅक नोंदणी प्राधान्याने पूर्ण करावी, असेही त्यांनी सांगितले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी जिल्हा उपनिबंधक शाहुराज हिरे व विविध माध्यमांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

राज्य शासनाने २ जून २०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार सुरू केलेल्या या योजनेत कर्जमाफी, एकवेळ समझोता योजना (जढड) आणि प्रोत्साहनपर लाभ या तीन घटकांचा समावेश आहे. जिल्ह्यात आतापर्यंत २ लाख २४ हजार कर्जखाती पोर्टलवर अपलोड करण्यात आली असून ९९ हजार पात्र खाती प्राप्त झाली आहेत. त्यापैकी ३२ हजार खात्यांचे आधार प्रमाणीकरण पूर्ण झाले असून उर्वरित लाभार्थ्यांचे प्रमाणीकरण वेगाने सुरू असल्याची माहिती त्यांनी दिली.

व्यापारी बँकांमधील एनपीए खातेदार शेतकऱ्यांच्या गावपातळीवरील याद्यांतील थकबाकी आणि पोर्टलवरील रक्कम यामध्ये फरक असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. याबाबत जिल्हा प्रशासनाने स्पष्ट केले की, पोर्टलवरील थकबाकी ही ३१ मार्च २०२६ पर्यंतची असून तीच ग्राह्य आहे. शासनाने १ जुलै २०२६ रोजी सर्व बँकांना १ एप्रिल २०२६ नंतरचे व्याज आकारू नये असे निर्देश दिले असून सर्व बँकांनी त्यास लेखी संमती दिली आहे.

शेतकऱ्यांनी पोर्टलवरील रक्कम मान्य असल्यास त्वरित कर्जमाफीचा लाभ मिळालेल्या सर्व पात्र शेतकऱ्यांना संबंधित बँकांमार्फत खरीप पीक कर्ज उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

## त्वचाविकारतज्ज्ञ डॉक्टर संघटनेच्या अध्यक्षपदी डॉ. सौ. शितल मोतेवार

**नांदेड, दि. ३१ जुलै -** नांदेड, परभणी आणि हिंगोली या तीन जिल्ह्यांच्या त्वचाविकारतज्ज्ञ डॉक्टरांच्या संघटनेच्या नवीन कार्यकारिणीची घोषणा नुकतीच करण्यात आली. या कार्यकारिणीत नांदेड जिल्ह्यातील पहिल्या महिला त्वचाविकारतज्ज्ञ डॉ. सौ. शितल विवेक मोतेवार यांची अध्यक्ष म्हणून सर्वानुमते निवड करण्यात आली. उपाध्यक्षपदी डॉ. संदीप बासरकर व डॉ. शरद माने, सचिवपदी डॉ. सुमित अग्रवाल, सहसचिवपदी डॉ. सौ. सुप्रिया पाटील व डॉ. संगीता मोरे तर कोषाध्यक्षपदी डॉ. सौ. ज्योती कुलकर्णी यांची निवड करण्यात आली. सायंटिफिक कमिटीपदी डॉ. मनोज हरनाळीकर व डॉ. नोमान फारुकी तसेच सांस्कृतिक समितीमध्ये डॉ. चंद्रशेखर किसवे, डॉ. आशिष मेहता (सेलू) व डॉ. सौ. पूजा भोसले यांची निवड करण्यात आली.नवनिर्वाचित पदाधिकार्यांनी नांदेड, परभणी, हिंगोली जिल्ह्यातील त्वचाविकाराबद्दलची आरोग्यसेवा अधिक सक्षम करणे, वैद्यकीय शिक्षण व जनजागृती कार्यक्रम राबविणे आणि रुग्णसेवा अधिक प्रभावी करण्यासाठी प्रयत्न करण्याचा निर्धार व्यक्त केला.याप्रसंगी ज्येष्ठ त्वचाविकारतज्ज्ञ डॉ. पी. सुदर्शन, डॉ. दीपक हजारी, डॉ. सुनील देशमुख व इतर सर्व उपस्थित त्वचाविकारतज्ज्ञांनी नवनिर्मित कार्यकारिणीचे अभिनंदन करून पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या.

## ग्रामीण जीवनोन्नती अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीवर भर

**नांदेड** -महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत विविध योजनांच्या प्रगतीचा आढावा गुरुवार दिनांक ३० जुलै रोजी जिल्हा परिषदेत मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आला. यावेळी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रभारी प्रकल्प संचालक राजकुमार मुक्कावार यांची प्रमुख उपस्थिती होती. बैठकीत मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील यांनी अभियानाची उद्दिष्टे वेळेत पूर्ण करण्यासाठी अधिकाऱ्यांनी समन्वयाने काम करण्याच्या सूचना दिल्या. लखपती दीदी स्लिप-बॅक एन्ट्री तातडीने पूर्ण करणे, तालुकास्तरीय कर्मचाऱ्यांनी बीएलबीसी बैठकीस नियमित उपस्थित राहणे, बचत गटांचे कर्ज प्रस्ताव वेळेत बँकांकडे सादर करणे तसेच पीएमईजीपी व सीएमईजीपी योजनांचे प्रस्ताव जिल्हा उद्योग केंद्राकडे तातडीने पाठविण्याचे निर्देश त्यांनी दिले. याशिवाय सप्टेंबर २०२६ अखेरपर्यंत समूह बांधणीचे शंभर टक्के उद्दिष्ट पूर्ण करणे, प्रभाग संघांचे प्रस्ताव पुढील आठवड्यापर्यंत धर्मदाय आयुक्त कार्यालयाकडे सादर करून मंजुरी मिळविणे, समूह सदस्यांची ई-केवायसी आणि आधार पडताळणी निर्धारित मुदतीत पूर्ण करणे, तसेच RF, CIF, VRF, MKSP आणि जडऋ अंतर्गत निधी प्रस्ताव वेळेत जिल्हा कक्षाकडे सादर करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. बैठकीस प्रभारी प्रकल्प संचालक राजकुमार मुक्कावार, जिल्हा अभियान व्यवस्थापक द्वारकादास राठोड, जिल्हा व्यवस्थापक गणेश कवडेवार, बालप्रसाद जंगिलवाड, माधव भिसे, तालुका अभियान व्यवस्थापक, तालुका व्यवस्थापक तसेच प्रभाग समन्वयक उपस्थित होते.

## गुरुपौर्णिमेनिमित्य कवी कवयित्रींचे कवितेतून अभिवादन

**नांदेड** -गुरुपौर्णिमा हा हिंदू संस्कृतीतील अत्यंत महत्त्वाचा आणि पवित्र सण आहे, जो आपल्या जीवनाला आकार देणाऱ्या आणि अज्ञानाचा अंधकार दूर करणाऱ्या गुरूंबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी साजरा केला जातो. हा सण आषाढ शुद्ध पूर्णिमेला साजरा केला जातो. याचे औचित्य साधून सप्तरंगी साहित्य मंडळाच्या कवी कवयित्रींनी आपल्या गुरुंना कवितेच्या माध्यमातून कृतज्ञता व्यक्त करीत अभिवादन केले. गुरुपौर्णिमेनिमित्य घेण्यात आलेल्या कविसंमेलनात कवयित्री रुपाली वागरे, कवी मारोती कदम, कवयित्री अंजली हिंगोले, कवी भगवान आमलापुरे, सचिन नरेगलकर, मारोती काळबांडे, विक्कुदास होट्टे तसेच काव्यपौर्णिमेचे संकल्पक प्रज्ञाधर ढवळे यांची उपस्थिती होती. येथील सप्तरंगी साहित्य मंडळाच्या वतीने दरमहा पौर्णिमेचे औचित्य साधून काव्यपौर्णिमा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. गुरुपौर्णिमेनिमित्तानेही काव्यपौर्णिमा या कविसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. राज्यभरातील कवी कवयित्रींनी यात सहभाग घेतला.

# कर्जमाफीऐवजी अटींचे जाळे; शेतकर्यांची फसवणूक थांबवा, सरसकट कर्जमाफी द्या; अन्यथा शेतकरी जनआंदोलन उभारू

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ३१ जुलै -**

राज्य शासनाने जाहीर केलेली कर्जमाफी ही प्रत्यक्षात शेतकर्यांसाठी दिलासा नसून अटी-शर्तींचे जाळे असल्याचा घणाघाती आरोप मराठवाडा शेतकरी प्रतिनिधी प्रा. शिवाजी बालाजीराव मोरे (सोनखेडकर) यांनी केला आहे. शासकीय व निमशासकीय कर्मचारी वगळता सर्व पात्र शेतकर्यांची सरसकट संपूर्ण कर्जमाफी करून सातबारा कोरा करण्यात यावा, अन्यथा राज्यभर व्यापक शेतकरी जनआंदोलन उभारण्यात येईल, असा इशारा त्यांनी दिला आहे.

मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि मुख्य सचिव यांना पाठविलेल्या निवेदनात प्रा. मोरे यांनी म्हटले आहे की, शासनाने कर्जमाफीसाठी दोन वेगवेगळे शासन निर्णय काढले असले तरी प्रत्यक्ष लाभ केवळ बँकेने थकबाकीदार घोषित केलेल्या शेतकर्यांनाच मिळणार आहे. जे थकबाकीदार नाहीत त्यांच्यासाठी वन टाईम सेटलमेंट योजना लागू करण्यात आली आहे. ही शासनाची नव्हे तर बँकांची योजना असल्याने विविध बँका मनमानी अटी लावत असून अनेक ठिकाणी ५० टक्के रक्कम भरण्याची सक्ती केली जात आहे.

तसेच २०१९ पूर्वीची अनेक कृषी कर्जे कर्जमाफीच्या कक्षेबाहेर ठेवण्यात आली असून अल्पमुदतीचे व दीर्घमुदतीचे कृषी कर्ज थकबाकीदार घोषित करण्याचे निकष वेगवेगळे असल्यामुळे हजारो पात्र शेतकरी कर्जमाफीपासून वंचित राहणार असल्याचा आरोप त्यांनी केला. शासन सरसकट कर्जमाफीची घोषणा करत असले तरी प्रत्यक्षात मोठ्या प्रमाणावर शेतकर्यांची फसवणूक होत असल्याचे प्रा. मोरे यांनी नमूद केले.

मराठवाडा व विदर्भातील शेतकरी दुष्काळ, वाढता उत्पादन खर्च, बाजारातील अस्थिरता आणि जागतिकीकरणाच्या परिणामांमुळे गंभीर आर्थिक संकटात सापडले आहेत. अशा परिस्थितीत अटी-शर्तींवर आधारित कर्जमाफी नव्हे, तर सर्वसमावेशक आणि बिनशर्त सरसकट कर्जमाफीची आवश्यकता असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

प्रा. मोरे यांनी शासनाकडे शासकीय व निमशासकीय कर्मचारी वगळता सर्व पात्र शेतकर्यांची संपूर्ण कर्जमाफी करून सातबारा कोरा करावा, २०१९ पूर्वीची सर्व कृषी कर्जे कर्जमाफीमध्ये समाविष्ट करावीत, वन टाईम सेटलमेंटच्या नावाखाली बँकांकडून होणारी मनमानी थांबवावी आणि एकही पात्र शेतकरी कर्जमाफीपासून वंचित राहणार नाही याची हमी द्यावी, अशी मागणी केली आहे.

सरकारने तात्काळ सरसकट कर्जमाफीची घोषणा करून शेतकर्यांना न्याय द्यावा. अन्यथा राज्यभर व्यापक शेतकरी जनआंदोलन उभारले जाईल. या आंदोलनाची सर्वस्वी जबाबदारी शासनाची राहील, असा स्पष्ट इशारा प्रा. शिवाजी मोरे सोनखेडकर, शिवाजीराव पाटील शिंदे, लिंगोजीराव हरबळकर, त्र्यंबक पाटील जानापुरीकर, बळी पाटील मडकीकर, खुशाल पाटील दगडगावकर, नागोराव पाटील कस्तुरे, माधवराव देसाई, आनंदराव मोरे, रघुनाथराव मोरे यांनी दिला.

## 'मेरा रेशीम मेरा अभिमान

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ३१ जुलै -**

केंद्र शासनाच्या 'मेरा रेशीम मेरा अभिमान २.०' या महत्त्वाकांक्षी अभियानाची नांदेड जिल्ह्यात प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या मार्गदर्शनाखाली आज जिल्हाधिकारी कार्यालयात नियोजन बैठक आयोजित करण्यात आली.

बैठकीस केंद्रीय रेशीम बोर्ड, परभणीचे डॉ. अशोक जाधव (वैज्ञानिक 'डी' तथा संयुक्त संचालक), केंद्रीय रेशीम संशोधन व प्रशिक्षण संस्था, मैसूरच्या डॉ. अंतरा गुप्ता (वैज्ञानिक 'बी'), जिल्हा रेशीम विकास अधिकारी अशोक वडवळे, पाणलोट प्रकल्पाचे दिनेश खडस उपस्थित होते.

# जागतिक कर्तृत्वाचा गौरव, निसर्गप्रेमाचा सन्मान

## डॉ. मान्नीकर कुटुंबीयांच्या वैद्यकीय सेवेचा व सेंद्रिय जीवनशैलीचा स्नेहपूर्ण सत्कार



**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ३१ जुलै -**

नांदेडचे ज्येष्ठ हृदयरोगतज्ज्ञ डॉ. अरुण मान्नीकर यांना हैदराबाद येथे आयोजित ग्लोबल समिट ऑन हायपरटेन्शन अँड कार्डिओमेटाबॉलिक डिसऑर्डर्स-२०२६ या आंतरराष्ट्रीय परिषदेत वैद्यकीय क्षेत्रातील चार दशकांच्या उल्लेखनीय योगदानाबद्दल जागतिक स्तरावर गौरविण्यात आल्यानंतर, त्यांच्या सन्मानार्थ सुहृद व निसर्गप्रेमी मित्रमंडळातर्फे आत्मीयतेने कौटुंबिक सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. याच वेळी स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. माधुरी मान्नीकर यांनी स्वतःच्या गच्चीवर सेंद्रिय पद्धतीने विकसित केलेल्या टेरेस गार्डनची विशेष दखल घेत त्यांचाही सन्मान करण्यात आला.

डॉ. माधुरी मान्नीकर यांनी साकारलेल्या हिरव्यागार टेरेस गार्डनमध्ये विविध प्रकारचा सेंद्रिय भाजीपाला, औषधी वनस्पती आणि फुलझाडे जोपासण्यात आली आहेत. मर्यादित जागेत सेंद्रिय शेतीचा आदर्श निर्माण करणार्या या उपक्रमाचे उपस्थितांनी मनापासून कौतुक केले. पर्यावरण संवर्धन, आरोग्यदायी जीवनशैली आणि स्वयंपूर्णतेचा संदेश देणारा हा उपक्रम प्रेरणादायी असल्याची भावना अनेकांनी व्यक्त केली. डॉ. अपूर्वा व डॉ. विक्रांत मान्नीकर यांनी सर्वांचे स्वागत भेटवस्तू देऊन केले.

या कार्यक्रमात जयंत वाकोडकर, सेवानिवृत्त उपप्राचार्य डॉ. दीपक कासराळीकर, ज्येष्ठ पत्रकार प्रा.सु. मा. कुलकर्णी तसेच मानसी महिला पुरवणीच्या संपादक अनुजा शंतनू डोईफोडे यांनी डॉ. मान्नीकर कुटुंबीयांच्या वैद्यकीय, सामाजिक आणि मानवी मूल्यांनी समृद्ध अशा कार्याचा गौरव करणारी मनोगते व्यक्त केली. रुग्णसेवा, सामाजिक बांधिलकी आणि निसर्गाशी जपलेले नाते या त्रिसूत्रीमुळे मान्नीकर कुटुंब समाजासाठी प्रेरणादायी ठरल्याचे वक्तयांनी नमूद केले. कार्यक्रमाचा प्रारंभ पं. संजय जोशी यांच्या सुश्राव्य गुरुवंदनेने करण्यात आला

या प्रसंगी ज्येष्ठ पत्रकार प्रा.सु. मा. कुलकर्णी, डॉ.दीपक कासराळीकर, पं. संजय जोशी व सौ.जोशी, संतोष कुलकर्णी व डॉ. भाग्यश्री कुलकर्णी, अनुजा शंतनू डोईफोडे, भगवानराव व सौ. शामाताई देशमुख, मुकुंद व सौ. मोरोगीरी, चैतन्य व सौ. प्राजक्ता वाकोडकर, सौ. रजनी वाकोडकर, प्रकाश पत्तेवार यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी जयंत वाकोडकर व सौ. रजनी वाकोडकर यांचाही डॉ. मान्नीकर कुटुंबीयांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला.

आपुलकी, स्नेह, कृतज्ञता आणि सामाजिक बांधिलकी यांचा सुंदर संगम घडविणारा हा कौटुंबिक स्नेहसोहळा उपस्थितांच्या मनात दीर्घकाळ स्मरणात राहील, अशी भावना कार्यक्रमाच्या शेवटी सर्वांनी व्यक्त केली.

# लोकमनाचा नेता ; संतोष कुलकर्णी

गर्दीत चालणारा प्रत्येक माणूस नेता नसतो आणि खुर्चीवर बसणारा प्रत्येक नेता लोकांच्या मनात स्थान मिळवतोच असेही नसते. काही व्यक्तिमत्त्वांचे मोजमाप पदाने होत नाही; ते त्यांच्या दारातून रोज ये-जा करणाऱ्या माणसांच्या विश्वासाने होत असते.

संतोष लक्ष्मीकांत कुलकर्णी हे असेच एक व्यक्तिमत्त्व.

त्यांच्याबद्दलची मतं दोन टोकांची असू शकतात. कुणी त्यांच्यावर जीवापाड प्रेम करतं, तर कुणी कठोर टीकाही करतं. मात्र एक गोष्ट दोघांनाही मान्य करावी लागते-या माणसाकडे दुर्लक्ष करता येत नाही.



कारण काही व्यक्ती शब्दांनी प्रभाव निर्माण करतात, तर काही केवळ आपल्या उपस्थितीने.

गेली दोन दशके नगरपरिषदेच्या राजकारणात प्रभावी उपस्थिती राखताना त्यांनी लोकांच्या मनात विश्वासाचे स्वतंत्र स्थान निर्माण केले, असे त्यांना जवळून ओळखणारे सांगतात. पदे बदलली, परिस्थिती बदलली, राजकीय समीकरणे बदलली; मात्र माणसांशी जोडलेले नाते कायम राहिले. हीच त्यांच्या सार्वजनिक जीवनाची खरी ओळख ठरली.

राजकारणात दोन प्रकारचे खेळाडू असतात. एक सरळ रेषेत चालणारे आणि दुसरे बुद्धिबळातील नाईटसारखे. त्यांची चाल कधीच सरळ समजत नाही. ते वेगळ्या कोनातून डाव मांडतात. प्रतिस्पर्ध्याला वाटते खेळ संपला... आणि त्याच क्षणी पटावरची सर्वात अनपेक्षित चाल खेळली जाते. अनेकांना संतोष कुलकर्णी यांची राजकीय वाटचाल अशाच चालींची आठवण करून देते.

सार्वजनिक जीवनात टाळ्याही मिळतात आणि दगडही. कौतुकाचे हारही गळ्यात पडतात आणि आरोपांचे ओझेही खांद्यावर येते. पण प्रत्येक वादळानंतर पुन्हा उभे राहणे ही प्रत्येकाची ताकद नसते. म्हणूनच काहीजण त्यांच्या प्रवासाची तुलना फिनिक्स पक्ष्याशी करतात-राखेतून पुन्हा आकाश गाठणाऱ्या त्या अदम्य भरारीशी.

त्यांच्या व्यक्तिमत्त्वात एक विलक्षण विरोधाभास दिसतो. चेहऱ्यावर सहज हास्य, पण निर्णयात विलंब नाही. स्वभावाने विनम्र, पण स्वाभिमानाच्या बाबतीत तडजोड नाही. साष्टांग नमस्कार करण्याची संस्कृती आणि गरज पडल्यास कणा ताठ ठेवून उभे राहण्याचे धैर्य. मृदू शब्द, पण कठोर निर्णय.

लोकप्रतिनिधी म्हणून त्यांची ओळख आहे; मात्र अनेकांच्या आठवणीत ते मदतीला धावून येणारा माणूस म्हणून अधिक जिवंत आहेत. जयंती असो वा स्मृतिदिन, धार्मिक सोहळा असो वा सांस्कृतिक मेळावा, सामाजिक उपक्रम असो किंवा एखाद्या कुटुंबावर आलेले दुःख-सहभाग हीच त्यांची कार्यशैली असल्याचे त्यांना जवळून ओळखणारे सांगतात.

जीवनात काही जण संपत्ती कमावतात, काही सत्ता कमावतात; पण फार थोडे लोक विश्वास कमावतात. विश्वास ही अशी संपत्ती असते, जी कोणत्याही निवडणुकीत जिंकता येत नाही; ती वर्षानुवर्षे माणसं जोडूनच मिळवावी लागते.

कदाचित म्हणूनच त्यांच्याबद्दल बोलताना अनेकांच्या तोंडी एकच वाक्य ऐकू येते-फोन केला की उत्तर मिळतं, दार ठोठावलं की भेट मिळते आणि प्रश्न सांगितला की दिशा मिळते. सार्वजनिक जीवनात हीच प्रतिमा एखाद्या व्यक्तीची सर्वात मोठी ताकद ठरते.

राजकारण, व्यापार, उद्योग, शेती आणि समाजकारण-या भूमिका वेगवेगळ्या असल्या तरी त्या निभावणारा माणूस एकच असतो. त्या माणसाच्या स्वभावात माणुसकी जिवंत असेल, तर त्याच्या पदालाही खरा अर्थ प्राप्त होतो.

म्हणूनच वाढदिवस हा केवळ जन्मतारखेचा उत्सव नसतो; तो एका प्रवासाचा, संघर्षाचा, नात्यांचा आणि असंख्य आठवणींचा उत्सव असतो.

अध्यक्ष साहेब,

आपल्याला वाढदिवसानिमित्त मनःपूर्वक शुभेच्छा आणि हार्दिक अभिष्टचिंतन!


आयुष्याची प्रत्येक नवी पहाट नवे क्षितिज घेऊन यावी. कार्याची उर्मी अशीच अबाधित राहो. माणसं जोडण्याची ताकद अधिक वृद्धिंगत होवो. आणि कोणत्याही वादळानंतर पुन्हा भरारी घेणाऱ्या फिनिक्सप्रमाणे आपला प्रवास नवनव्या उंचीवर पोहोचत राहो.

कारण काही नावं इतिहासाच्या पानांवर लिहिली जात नाहीत... ती लोकांच्या मनात कायमची कोरली जातात.

**- वार्तांकन : शेख इलियास, बिलोली**

# ग्रामपंचायत ते विधानसभेची पायरी : जनसामान्यांचे लोकनेते आमदार आनंदराव पाटील बोंढारकर

भारतीय राजकारणात अनेक नेते उदयास येतात आणि काळाच्या ओघात विस्मृतीतही जातात. मात्र काही व्यक्तिमत्त्वे अशी असतात की, त्यांची ओळख केवळ राजकारणापुरती मर्यादित राहत नाही; ती जनतेच्या विश्वासाची, संघर्षाची आणि लोकसेवेची ओळख बनते. नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघाचे आमदार आनंदराव पाटील बोंढारकर हे असेच एक जनसामान्यांच्या मनात घर करणारे लोकनेते आहेत.



कोणतीही मोठी राजकीय पार्श्वभूमी नसताना, केवळ निस्वार्थ लोकसेवा, अथक परिश्रम आणि जनतेच्या आशीर्वादाच्या बळावर ग्रामपंचायतीच्या सदस्यपदापासून ते महाराष्ट्र विधानसभेपर्यंतचा त्यांनी केलेला प्रवास प्रेरणादायी आणि अनुकरणीय आहे.

**मातीशी जोडलेली नाळ - नेतृत्वाचा खरा पाया**

ग्रामीण भागातील सर्वसामान्य कुटुंबातून आलेल्या आनंदराव बोंढारकर यांनी सार्वजनिक जीवनाची सुरुवात गावाच्या विकासासाठी स्वतःला झोकून देत केली. गावातील प्रत्येक प्रश्न स्वतःचा समजून त्यावर उपाय शोधण्याची त्यांची वृत्तीच त्यांच्या नेतृत्वाचा पाया ठरली.

सुमारे २५ वर्षे बोंढार गावाचे सरपंच म्हणून त्यांनी विकासाचे नवे आदर्श निर्माण केले. पाणीपुरवठा, रस्ते, मूलभूत सुविधा, ग्रामविकास आणि पारदर्शक प्रशासन या क्षेत्रांत त्यांनी केलेल्या कामांमुळे ग्रामस्थांचा विश्वास दिवसेंदिवस दृढ होत गेला. एका सरपंचाने गावाचा सर्वांगीण विकास कसा साधावा, याचे आदर्श उदाहरण त्यांनी घालून दिले.

**विधानसभेत मतदारसंघाचा बुलंद आवाज**

विधानसभेत पोहोचल्यानंतरही त्यांच्यातील 'गावचा सरपंच' कधीच बदलला नाही. मतदारसंघातील रस्ते, पाणी, वीज, आरोग्य, शिक्षण, शेती आणि विकासाशी संबंधित विविध प्रश्न त्यांनी अभ्यासपूर्ण पद्धतीने मांडले. शासनाच्या दालनात सामान्य नागरिकांच्या हक्कासाठी सातत्याने आवाज उठवणारा नेता म्हणून त्यांनी स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली.

**अभिष्टचिंतन - प्रेरणादायी जीवनप्रवास**

आमदार आनंदराव पाटील बोंढारकर यांचा ग्रामपंचायत ते विधानसभेपर्यंतचा प्रवास हा केवळ एका राजकीय व्यक्तिमत्त्वाचा प्रवास नसून, तो संघर्ष, जिद्द, प्रामाणिकपणा आणि जनतेवरील निस्सीम प्रेमाचा इतिहास आहे. त्यांचा जीवनप्रवास प्रत्येक कार्यकर्त्याला आणि युवकाला प्रेरणा देणारा आहे. तो शिकवतो की-निष्ठा, प्रामाणिकपणा आणि सातत्यपूर्ण परिश्रम यांच्या जोरावर कोणतीही मोठी पार्श्वभूमी नसतानाही यशाचे शिखर गाठता येते.

आज अभिष्टचिंतनाच्या निमित्ताने त्यांच्या आतापर्यंतच्या कार्याचा गौरव करताना, त्यांच्या पुढील सार्वजनिक जीवनासाठी उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य आणि अधिक व्यापक जनसेवेच्या कार्यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा!

**- श्याम पाटील वानखेडे, शिवसैनिक नांदेड. मो. ९८९०३४४६३५**